CMYK

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १४ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ३८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### आज श्रीदत्त जयंती



### घसरणीतून सावरला बाजार

**मुंबई :** देशांतर्गत शेअर बाजारात शुक्रवारचा दिवस प्रचंड अस्थिरतेचा होता. बाजाराची सुरुवात घसरणीने झाली. दिवसभरात एका क्षणी तर निर्देशांक १०००हून अधिक अंकांनी खाली आला होता. मात्र, दिवसअखेरपर्यंत बाजार सावरला आणि निर्देशांकात ८४३ अंकांची वाढ झाली. निफ्टीही २१९ अंकांनी वाढून २४,७६८ वर बंद झाला. अमेरिकेत व्याजदर कपातीच्या वाढत्या अपेक्षांमुळे भारतीय शेअर बाजारात मोठी वाढ झाली.

# नागपुरात पार पडू शकतो मंत्रिमंडळाचा शपथविधी

### १५ तारखेला मंत्रिमंडळ विस्ताराची शक्यता

**मुंबई, १३ डिसेंबर**

महायुतीतील घटकपक्षांचे मंत्रिमंडळ विस्ताराबाबत अद्याप एकमत न झाल्याने, मंत्र्यांचा शपथविधी आता नागपुरात १५ तारखेला होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. असे झाल्यास ही विधिमंडळाच्या इतिहासात आगळी नोंद ठरेल.

विधिमंडळाच्या इतिहासात आजवर सत्तास्थापन प्रक्रिया झालेली नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री किंवा आमदार आदींचा शपथविधी समारंभ नागपूर विधानभवन किंवा राजभवनावर पार पडलेला नाही. यावेळी १६ डिसेंबरपासून नागपुरात हिवाळी अधिवेशन असल्याने, आता काही कारणास्तव लांबलेला



मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूर येथे होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात सुरू आहे. असे झाल्यास हा शपथविधी विधिमंडळाच्या रेकॉर्डमध्ये एक वेगळी नोंद असेल.

महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. शनिवारी महायुती सरकारमधील मंत्र्यांचा शपथविधी मुंबईत राजभवनात होणार असल्याचे बोलले जात होते. त्यासाठी राजवभनात लगबग सुरू झाली होती. पण, अचानक मंत्र्यांच्या शपथविधीचे ठिकाण आणि तारीख बदलली आहे. मुंबईऐवजी नागपुरात नव्या मंत्र्यांचा शपथविधी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

नागपुरात १६ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. त्यामुळे शनिवारी आणि रविवारी सगळे आमदार नागपुरात दाखल होतील. आमदारांची सोय व्हावी म्हणून शनिवारऐवजी रविवारी नागपुरात मंत्रिमंडळ विस्तार करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे दिसते. यासाठी नागपुरात जय्यत तयारीही सुरू झाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तारात सर्वाधिक भाजपाचे आमदार शपथ घेऊ शकतात. भाजपचे २१, शिवसेनेचे १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे १० आमदार मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे.

*(तभा वृत्तसेवा)*

# महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनवणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

**मुंबई, १३ डिसेंबर**

महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी विविध विकासांच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्याला देशातील ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनवणार आहोत. गेल्या वर्षी राज्याने अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केले आहे. आता २०२८ ते २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करू, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर, बिकेसी, वांद्रे येथे १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचा शुभारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाला.

मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच; मात्र भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक परिषदेने भारताच्या संस्कृतीवर आणि विविध क्षेत्रातील विकासाच्या तत्त्वावर आधारित वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. भारताच्या नेत्रदीपक प्रगतीने जगाला थक्क करून टाकले आहे. सर्वाधिक गतीने पुढे येणारा भारत जगात तिसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे. जगातील लोक म्हणत होते की, एवढे मोठी लोकसंख्या असलेला देश कशाप्रकारे प्रगती करू शकतो, पण देशातील कुशल मनुष्यबळ हेच विकासाचे महत्त्वाचे साधन असून, प्रत्येकाला विकासात सोबत घेऊन जात आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# पणन संचालकांनी घेतला मार्केट कमिटीच्या कामकाजाचा आढावा

### आज लिलावात प्रत्यक्ष सहभाग घेऊन करणार लिलावाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ डिसेंबर**

राज्याचे पणन संचालक विकास रसाळ हे दोन दिवस सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले आहेत. यावेळी मार्केट कमिटी प्रशासनाच्या वतीने प्रशासक तथा पणन उपसंचालक मोहन निंबाळकर यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ आणि सिद्धेश्वर महाराजांचे प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. या दौऱ्यात ते सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकीय कार्यालयास भेट देवून बाजार समितीच्या विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी शेतकरी, माथाडी कामगार आणि व्यापारी यांच्या विविध समस्या अडचणी बाबत चर्चा करण्यात आली. शेतकरी, कामगार आणि व्यापारी अशा विविध संघटनेच्या वतीने रसाळ यांना निवेदन देण्यात आले. त्यावर त्यांनी चर्चा करून विविध प्रश्नासंबंधी निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.



> राज्याचे पणन संचालक विकास रसाळ हे दोन दिवस सोलापूर दौऱ्यावर असून, त्या अनुषंगाने सर्व विभागवार बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. आढावा बैठक घेऊन विकास कामांची माहिती घेतलेली तसेच लिलावाची पाहणी करणार आहेत.
>
> **-मोहन निंबाळकर, पणन उपसंचालक तथा प्रशासक कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर.**

दरम्यान बाजार समिती मधील कांद्यासह विविध शेतमालांच्या लिलावांची पाहणी करून लिलावाची माहिती घेणार आहेत. त्यानंतर सोलापूर मधून नागपूर हिवाळी अधिवेशन ला मार्गस्थ होतील असे यावेळी सांगण्यात आले.

# व्यंगचित्रकार मनोहर सप्रे यांचे निधन

### कुटुंबीयांनी घेतला देहदानाचा निर्णय

**चंद्रपूर, १३ डिसेंबर**

'दै. तरुण भारत'चे स्तंभलेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंग्यचित्रकार, काष्ठ शिल्पकार, ज्येष्ठ लेखक तथा विचारवंत मनोहर सप्रे यांचे शुक्रवारी दुपारी १२ वाजता सहकारनगर येथील त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. सप्रे कुटुंबीयांनी त्यांच्या देहदानाचा निर्णय घेतला आहे.

१४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत त्यांचे पार्थिव अन्त्यदर्शनासाठी त्यांच्या निवासस्थानी ठेवले जाईल. त्यानंतर त्यांच्या देहदानाची प्रक्रिया केली जाईल, अशी माहिती आशिष देव यांनी दिली. त्यांच्या पश्चात पत्नी, मिलिंद व नितीन ही दोन मुले व बराच मोठा आप्तपरिवार आहे. आशिष देव त्यांचे मानसपुत्र आहेत.



मनोहर सप्रे हे येथील जनता महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. नोकरीचा राजीनामा देऊन ते पूर्णवेळ कला साधनेसाठी समर्पित झाले. त्यांनी निर्माण केलेल्या काष्ठशिल्पांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी मागणी होती. ते उत्तम लेखक आणि कमालीचे व्यंग्यचित्रकार होते आणि म्हणूनच 'व्यंग्य विनोद', 'व्यंग्यार्थी', 'हसा की' ही त्यांची पुस्तके अत्यंत गाजली. 'मनोहारी', 'दहिवर', 'अलस कलस' 'फरसाण' या पुस्तकांसह त्यांनी २००६ मध्ये 'तरुण भारत'मध्ये चालवलेल्या 'मनमौजी' या सदरातून लिहिलेल्या पत्रांच्या 'सांजी' व 'रुद्राक्षी' या पुस्तकांनीही उदंड प्रतिसाद मिळवून दिला.

'शेला पागोटे' या नावाने त्यांनी तरुण भारतात चालवलेल्या व्यंग्यचित्र सदराला तर वाचकांनी डोक्यावर घेतले होते. शिवाय ते उत्तम वक्ते होते आणि कामगार नेतासुद्धा होते. निळू फुले, जयदेव हट्टंगडी, डॉ. श्रीराम लागू, पु. ल. देशपांडे अशा थोरामोठ्यांशी त्यांचे अत्यंत घनिष्ठ मैत्रीचे संबंध होते.

चंद्रपूर प्रेस क्लबतर्फे त्यांना 'चंद्रपूर भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. यासह त्यांना विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

४ जानेवारी १९३३ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा येथे जन्मलेल्या सप्रेंची कर्मभूमी मात्र चंद्रपूर ठरली. येथील सर्वच क्षेत्रांतील कलासाधकांसाठी ते आधारस्तंभ होते. चंद्रपूरला वैश्विक नकाशावर घेऊन जाणाऱ्या काही मोजक्याच व्यक्तिमत्त्वात ते होते. तरुण भारततर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

*(तभा वृत्तसेवा)*



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### गोल्फपटू अजितेश संधू ठरला विजेता



**नवी दिल्ली** : चंदीगडचा गोल्फपटू अजितेश संधू याने शुक्रवारी एक अंडरचे कार्ड खेळून पाच शॉट्सने विजय मिळवून पहिल्या जागतिक समुद्र ओपनचे विजेतेपद पटकावले. संधू (६९-६७-६९-७१) याने एकूण १२ अंडर २७६ ची फटकेबाजी केली आणि ३० लाख रुपयांचा बक्षीस रकमेचा धनादेश जिंकला. संधूचे हे पाच वर्षांतील पहिले विजेतेपद आहे तर त्याचे हे सातवे व्यावसायिक विजेतेपद आहे. दिल्ली गोल्फ क्लबमधील हा त्याचा पहिला विजय आहे. बांगलादेशचा जमाल हुसेन ७ अंडर २८१ च्या एकूण गुणांसह उपविजेता ठरला आणि त्याने २० लाख रुपयांचे पारितोषिक पटकावले.

### गिलेस्पी यांचा पाकिस्तानच्या प्रशिक्षकपदाचा राजीनामा

**लाहोर** : पाकिस्तान कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक जेसन गिलेस्पी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने माजी वेगवान गोलंदाज आकिब जावेद यांची कसोटी संघाचे अंतरिम मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने गुरुवारी ही माहिती दिली. पीसीबीच्या काही निर्णयांवर गिलेस्पी खुश नव्हते. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी त्यांनी बोर्डाला याबाबत माहिती दिली. गिलेस्पी यांची या वर्षी एप्रिलमध्ये पाकिस्तानच्या कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली होती. पाकिस्तान संघ २६ डिसेंबरपासून सेंच्युरियनमध्ये पहिली कसोटी खेळणार आहे, तर दुसरी कसोटी ३ जानेवारीपासून केपटाऊनमध्ये खेळवली जाणार आहे. याआधी दक्षिण आफ्रिकेत तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळायची आहे. अलिकडेच पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आपले कर्णधार आणि मुख्य प्रशिक्षक निवडण्याचा अधिकार काढून घेतला होता. यामुळेच गॅरी कर्स्टन यांनी ऑक्टोबरमध्ये सहा महिन्यांनी हे पद सोडले होते.

### गुकेशसाठी सोडली वडिलांनी नोकरी

**चेन्नई** : चीनच्या डिंग लिरेनला पराभूत करून सर्वांत तरुण जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन बनलेल्या डी. गुकेशच्या पालकांनी पालनपोषण केले. त्यांच्या त्यागामुळेच गुकेशला त्याच्या कारकीर्दीत सर्वोच्च यश मिळवता आले. गुकेशने वयाच्या सातव्या वर्षी विजयाचे स्वप्न पाहिले आणि एका दशकापेक्षा कमी कालावधीत ते प्रत्यक्षात आणले. लिरेनला हरवून १८ वर्षीय खेळाडू सर्वांत तरुण जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन बनला. यासाठी त्याच्या पालकांनी अनेक गोष्टींचा त्याग केला. गुकेशचे वडील रजनीकांत हे ईएनटी सर्जन आहेत, तर आई पद्मा मायक्रोबायोलॉजिस्ट आहेत. रजनीकांत यांना २०१७-१८ मध्ये त्यांची वैद्यकीय प्रॅक्टिस थांबवावी लागली होती. त्यांनी आपली नोकरी सोडून आपल्या मुलाकडे पूर्ण लक्ष दिले. घरखर्च चालवण्यासाठी त्याच्या आईने सर्व जबाबदारी उचलली.

### पिकलबॉलला लवकरच ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळेल



**मुंबई** : अनेक ग्रँडस्लॅम विजेता माजी टेनिसपटू आंद्रे अगासी याने शुक्रवारी वेगाने वाढणारा रॅकेट स्पोर्ट 'पिकलबॉल' लवकरच ऑलिम्पिक खेळांच्या यादीत समाविष्ट होईल, असा आशावाद व्यक्त केला. अमेरिकेत टेनिसवर 'सकारात्मक परिणाम' झाला आहे. माजी जागतिक नंबर वन आणि अटलांटा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या अगासीने 'जगातील सर्वात कठीण रॅकेट स्पोर्ट' असे वर्णन केले. पिकलबॉल हा फार महागडा खेळ नाही आणि त्यासाठी फारशी तंत्रज्ञानाची गरज नाही, असे दिसते आहे की, या देशात पिकलबॉलची भर पडणार आहे. मला ते लवकरच ऑलिम्पिक खेळांचा भाग होताना दिसत आहे. १५-२१ जानेवारी २०२५ या कालावधीत होणाऱ्या पीडब्ल्यूआर, डीयूपीआर इंडिया लीगच्या लाँचिंगवेळी अगासी म्हणाला, मी टेनिसला नेहमीच जगातील सर्वात कठीण रॅकेट खेळ मानेन. या खेळासारखे काहीच नाही. यासाठी तुम्हाला शारीरिक, मानसिक आणि भावनिकदृष्ट्या खंबीर असायला हवे. यामध्ये कौशल्याचा मोठा वाटा आहे, असे अगासी म्हणाला.

# शेकडो चाहत्यांच्या उपस्थितीत स्वीकारला चषक

### गुकेश जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद विजेता

◆ **सिंगापूर, १३ डिसेंबर**

रात्रभर जागे राहिल्यानंतर त्याचे डोळे दुखत होते, परंतु शेकडो ऑटोग्राफवर स्वाक्षरी केल्यानंतर डी. गुकेशने कार्यक्रमाला उपस्थित राहत जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपदाचा चषक स्वीकारला तेव्हा तो भारावून गेला होता.

चेन्नईच्या १८ वर्षीय गुकेशने गुरुवारी गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेनचा पराभव करून ऐतिहासिक विजय नोंदवला. या विजयासह १८वा भारतीय आणि पाच वेळा विश्वविजेता विश्वनाथन् आनंद याच्यानंतरचा दुसरा भारतीय ठरला.

हे विजेतेपद पटकावणाऱ्या गुकेशला १.३ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ११.०३ कोटी रुपये) इतकी घसघशीत रक्कम मिळाली. दुसऱ्या दिवशी सकाळची सुरुवात त्याला चषकाची झलक पाहायला मिळाल्याने झाली. खरे तर त्याने चषकाला स्पर्श करण्यास नकार दिला होता. कारण त्याला संध्याकाळी समारोप समारंभ होईपर्यंत प्रतीक्षा होती.

चेन्नईचा १८ वर्षांचा ग्रँडमास्टर गुकेश चीनच्या डिंग लिरेनचा पराभव करून सर्वांत तरुण विश्वविजेता ठरला. अजिंक्यपदचा शेवटचा सामना सुमारे तीन आठवडे चालला.

इंटरनॅशनल चेस फेडरेशनचे अध्यक्ष अर्काडी ड्वोरकोविच यांनी चषक त्याच्या हातात दिल्यानंतर गुकेशने चषकाला स्पर्श केला. बुद्धिबळातील सर्वोच्च पदक आणि पारितोषिक रक्कम मिळाल्यानंतर गुकेश म्हणाला, हा क्षण मी लाखो वेळा जगल्यासारखा वाटतो. रोज सकाळी जेव्हा मी जागा होतो, तेव्हा हा क्षण माझ्या जागे होण्याचे कारण होता. हा चषक आणि हे वास्तव स्वीकारणे म्हणजे माझ्या आयुष्यातील कोणत्याही गोष्टीपेक्षा मोठे आहे.



फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपदाचा चषक स्वीकारताना भारताचा डी. गुकेश

#### स्वप्न पूर्ण झाले

फिडे समारोप समारंभात गुकेश म्हणाला, हा प्रवास स्वप्नापेक्षा कमी नव्हता. यात अनेक चढ-उतार आले, अनेक आव्हाने आली, पण मला त्यात एकही गोष्ट बदलायची नाही कारण माझ्यासोबत असलेल्या लोकांमुळे ती सुंदर झाली आहे. त्याने आव्हानासाठी त्याच्या प्रतिस्पर्ध्याचे, त्याच्या पालकांचे, त्याच्या संघाचे, यजमान देशाचे, गेल्या तीन आठवड्यात त्याला भेटलेल्या अनेक नवीन चाहत्यांचे आणि देवाचे आभार मानले.

तत्पूर्वी तो आपल्या चाहत्यांना भेटायला आणि अभिवादन करण्यासाठी गेला. त्यात तरुण, वृद्ध आणि लहान मुले होती. रांगेत उभ्या असलेल्या लोकांमध्ये केवळ भारतीय प्रवासीच नव्हते तर सिंगापूरचे स्थानिक लोकही होते ज्यांनी बुद्धिबळाचे बोर्ड आणले होते आणि त्यांना गुकेशचा ऑटोग्राफ हवा होता. (वृत्तसंस्था)

# सोलापूर महिला क्रिकेट संघ सुपरलीग मध्ये दाखल





### आर्या उमापच्या २६२ धावा, पूनम माशाळेचे 13 बळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

सोलापूरच्या १९ वर्षांखालील महिला संघाने चार विजयासह गटामध्ये अव्वल स्थान पटकावत सुपर लीग मध्ये प्रवेश केला.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन अंतर्गत १९ वर्षांखालील महिला संघाचे निवड चाचणी सामने छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी संपन्न झाले. सोलापूर महिला संघाने सातारा, अहमदनगर, हिंगोली व संभाजीनगर या चारही संघाचा पराभव केला. चार सामन्यात नाबाद राहत आर्या उमाप हिची सातत्यपूर्ण फलंदाजी आणि पूनम माशाळे हिने भेदक गोलंदाजी केली.

या संघाला स्नेहल जाधव, किरण मणियार, मानसी जाधव, सारिकायांचे मार्गदर्शन लाभले. संघाचे सोलापूर क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष रणजितसिंह मोहिते पाटील आणि सेक्रेटरी चंद्रकांत रेंबर्सू यांनी अभिनंदन केले.

**चार सामन्यातील खेळाडूंची एकूण कामगिरी** : आर्या उमाप (एक शतक व एक अर्धशतकासह २६२ धावा), प्रतिभा माशाळे (९२), कार्तिकी देशमुख (४६), प्रतीक्षा नंदर्गी (३७), भक्ती पवार (३५). पुनम माशाळे (१३ बळी), प्रतीक्षा नंदर्गी (८ बळी), विभावरी देवकते, भक्ती पवार (प्रत्येकी ७ बळी) स्नेहा शिंदे, प्रतिभा माशाळे व साक्षी लंबकाने (प्रत्येकी १ बळी).

# तिसऱ्या कसोटीत भारताचे विजयावर लक्ष

## आजपासून भारत-ऑस्ट्रेलिया तिसरी कसोटी

### इतिहासाची पुनरावृत्ती करण्याची आशा

◆ **ब्रिस्बेन, १३ डिसेंबर**





मालिका १-१ बरोबरीत राहिल्यानंतर ब्रिस्बेन कसोटी निर्णायक ठरू शकते. भारतीय गोलंदाजांना ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांच्या कमकुवतपणाचा फायदा घ्यायचा आहे. पण ट्रॅव्हिस हेड दुसऱ्या कसोटीत अडचणीत आणणारा ठरला. स्टीव्ह स्मिथ आणि कोहली या दोघांची कामगिरी सातत्यपूर्ण राहिली नाही.

या मालिकेत सर्वश्रेष्ठ गोलंदाज म्हणून भारताकडे जसप्रीत बुमराह आहे. मात्र, त्याला दुसऱ्या टोकाकडून अधिक पाठबळाची गरज आहे. त्याला मुक्तपणे गोलंदाजी करता यावी म्हणून रोहित आणि कोहलीसारख्या फलंदाजांकडून चांगल्या धावांची गरज आहे.

रोहित आणि कोहलीच्या खराब फॉर्मबद्दल सातत्याने चर्चा होत असून आधुनिक क्रिकेटच्या या दोन महान खेळाडूंसाठी ही कसोटी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. त्याच्या अनुपस्थितीत, भारत २०२१ मध्ये येथे परतला आणि नेत्रदीपक विजयाची नोंद केली. ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी बाऊन्स आणि सीम अशा दोन्ही प्रकारे आक्रमण केले आहे आणि येथेही खेळपट्टी चांगली सीम देईल अशी अपेक्षा आहे. रोहित आणि कोहलीत कर्तृत्वाची कमतरता नाही पण त्यांचा फॉर्म सध्या त्यांना साथ देत नाही.

पहिल्या डावातील निराशाजनक फलंदाजी ही भारतासाठी सर्वात मोठी समस्या आहे. गेल्या एका वर्षात भारतात आणि परदेशात सहा वेळा खेळल्या गेलेल्या कसोटीत पहिल्या डावात १५० किंवा त्याहून कमी धावसंख्या झाली आहे.

पर्थ कसोटीत कोहलीने शतक झळकावले पण कर्णधारपदाची खेळी रोहितकडून अपेक्षित आहे. रोहितकडे इतका अनुभव आहे की पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड सारख्या महान गोलंदाजांना प्रत्येक चेंडूचा तो चांगला सामना करू शकतो. हाताच्या दुखापतीमुळे ॲडिलेड कसोटीतून बाहेर पडल्यानंतर हेझलवूड संघात परतला आहे.

रोहित हा पांढऱ्या चेंडूचा बादशहा ठरला आहे पण जर त्याने गाबामध्ये चांगली खेळी खेळली तर त्याचे नाव महान क्रिकेटपटूंमध्ये सामील होईल. यासाठी सर्वप्रथम त्यांना त्यांचा फलंदाजीचा क्रम ठरवावा लागेल.

ऑफस्पिनर रवी आश्विन आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी पहिल्या दोन कसोटीत चांगली कामगिरी केली पण फलंदाजीत सखोलतेसाठी रवींद्र जडेजा हा एक चांगला पर्याय आहे.

ऑस्ट्रेलियाबद्दल बोलायचे झाले तर त्यांची फलंदाजीही चिंतेचे कारण आहे. आजकाल हेडची अवस्था ऋषभ पंतसारखी झाली आहे. स्टीव्ह स्मिथचा खराब फॉर्म चिंतेचा विषय आहे.

सामना ब्रिस्बेन क्रिकेट मैदानावर भारतीय वेळेनुसार पहाटे ५.५० वाजता सुरू होईल. सामन्याचे प्रक्षेपण स्टार स्पोर्ट चॅनेलवर होईल.

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत** : रोहित शर्मा (कर्णधार), जसप्रीत बुमराह, विराट कोहली, यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, अभिमन्यू ईश्वरन, देवदत्त पडिक्कल, शुभमन गिल, ऋषभ पंत, सरफराज खान, ध्रुव जुरेल, रवी आश्विन, रवींद्र जडेजा, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर.

**ऑस्ट्रेलिया** : पॅट कमिन्स (कर्णधार), जोश हेझलवूड, लेक्स कॅरी, ट्रॅव्हिस हेड, उस्मान ख्वाजा, मार्नस लॅबुशेन, नॅथन लियॉन, मिच मार्श, नॅथन मॅक्स्वीनी, स्टीव्ह स्मिथ, मिचेल स्टार्क. (वृत्तसंस्था)



# उमाबाई श्राविका विद्यालयास दुहेरी मुकुट

## शालेय शहर आट्यापाट्या स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

शालेय शहर आट्यापाट्या स्पर्धेत उमाबाई श्राविका विद्यालयाने १४ वर्षे मुले आणि १९ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. या दोन्ही विजयी संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विद्यालयाने १७ वर्षांखालील मुली आणि १९ वर्षांखालील मुलींच्या गटात उपविजतेपद संपादिले. १७ वर्षांखालील मुलांच्या गटात त्यांनी तृतीय क्रमांक संपादिला. त्यांचे श्राविका संस्थेचे सचिव हर्षवर्धन शहा, विश्वस्त यतिन शहा, अंजली शहा, डॉ. रोहिणी शहा, अतुल शहा, सीईओ देवई शहा, वरिष्ठ दिप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले. संघास क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

**संघ : १४ वर्षे मुले** : कृष्णा काकडे, श्रेयस भोसले, शरद कादे, आरोष घोडके, राजू कबाडे, हर्ष गायकवाड, नैतिक गायकवाड, हर्षल चौगुले, सुरज बर्डे, जयेश शिंदे, रुद्र होनराव, सोहम शिंदे.

**१९ वर्षं मुले** : राजवर्धन घैडकू, हर्षवर्धन घोडके, आदित्य होनपारखे, कृष्णा गजेली, आर्यन वाडकर, ऋतुराज मठे, सुदर्शन कादे, देविदास मेंगाने, आशिष बरडे, यशराज पोळ, केदार माळी, संकेत बोराडे.

**१७ वर्ष मुली** : अनुष्का केत, प्रिया शिंदे, अनिष्का टोणपे, दिव्या कसबे, धनश्री होणपारखे, सृष्टी रणदिवे, अमृता पवार, अंबिका गुंड, ऋतुजा सिरसट, समृद्धी जगताप, ईश्वरी शिंदे, अपूर्वा शिंदे,

**१९ वर्षं मुली** : किरण दराडे, अल्फिया शेख, समृद्धी कटबू, साक्षी मोरे, आरती जाधव, कार्तिकी बोराडे, आश्लेषा शिंदे, पूजा शिंदे, स्वप्नाली बनसोडे, स्नेहल भोसले, ज्योती घाटे, अंजली भोसले.

**१७ वर्षं मुले** : संभाजी शिंदे, तपन दास, कृष्णा दराडे, यश बळ्ळे, पियुष कोले, धीरज बरडे, ओम पवार, अथर्व साठे, हर्ष कोकरे, श्रेयस चट्टे, शुभम पोळ, आदित्य मुळकुटकर.

# भारताच्या भामिदीप्ती, यमलापल्ली यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

## ओऑसिस सोलापूर ओपन २५ हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १३ डिसेंबर-**

ओऑसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत ओऑसिस सोलापूर ओपन एमएसएलटीए - एसडीएलटीए २५हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉमध्ये श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती, सहजा यमलापल्ली या भारतीय खेळाडूंनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. तर, दुहेरीत भारताच्या आकांक्षा नित्तूरे व सोहा सादिक यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला.

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथीली एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या पाचव्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिने फ्रांसच्या तिसऱ्या मानांकित टियांसोआ सारा राकोटोमांगा राजोनाहचा ६-२, ४-६, ७-६(५) असा संघर्षपूर्ण पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली. भारताच्या दुसऱ्या मानांकित सहजा यमलापल्लीने रशियाच्या सहाव्या मानांकित एकतेरिना याशिनाचा ६-३, ६-० असा सहज पराभव करून आगेकूच केली. कझाकस्तानच्या चौथ्या मानांकित झिबेक कुलंबायेवा हीने लात्वियाच्या आठव्या मानांकित डायना मार्सिन्केविकाचे आव्हान ६-०, ६-४ असे संपुष्टात आणले. थायलंडच्या बुन्यावी थामचैवतने रशियाच्या क्वालिफायर इवा गरकुशाचा ३-६, ७-६(५), ६-४ असा पराभव केला.



बुन्यावी थामचैवतने (थायलंड)



झिबेक कुलंबायेवाल (कझाकिस्तान)



सहजा यमलापल्ली (भारत)



श्रीवल्ली रश्मिका (भारत )

#### दुहेरीत नित्तूरे व सोहा सादिक अंतिम फेरीत

दुहेरीत उपांत्य फेरीत भारताच्या आकांक्षा नित्तूरे व सोहा सादिक यांनी थायलंडच्या व्हिएरा डीपर्म व भारताच्या मधुरिमा सावंत यांचा टायब्रेकमध्ये ७-६(४), ५-७, १०-८ असा तर, दुसऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीत थायलंडच्या थासापोर्न नाकलो व बुन्यावी थामचैवत यांनी भारताच्या वैष्णवी आडकर व सहजा यमलापल्ली यांचा ७-५, ६-४ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, १४ डिसेंबर २०२४ |
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ही 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### नीट-पीजी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने (एनएमसी) पुढील वर्षी होणाऱ्या नीट-पीजी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. १५ जून २०२५ रोजी ही परीक्षा होणार आहे. एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप पूर्ण करण्याची अनिवार्य तारीख ३१ जुलै निश्चित करण्यात आली आहे. यंदा नीट-पीजीच्या जागांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. २०२५ मध्ये नीट-पीजीच्या २००० जागा वाढू शकतात. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आता ७५ हजार जागा आहेत. नीट-पीजी ही भारतातील नॅशनल बोर्ड ऑफ मेडिकल एक्झामिनेशन्सद्वारे घेतली जाणारी पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश परीक्षा आहे. ही देशातील सरकारी किंवा खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये डॉक्टर ऑफ मेडिसिन (एमडी), मास्टर ऑफ सर्जरी (एमएस), पीजी डिप्लोमा, डिप्लोमा ऑफ नॅशनल बोर्ड (डीएनबी), डॉक्टरेट ऑफ नॅशनल बोर्ड यासारख्या पदव्युत्तर वैद्यकीय कार्यक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाते.



# महाकुंभमेळा एकतेचा महायज्ञ : पंतप्रधान मोदी

## प्रयागराज येथे ५,५०० कोटींच्या विकास कामांचे लोकार्पण | कलश पूजनाने भव्य महाकुंभाचा शानदार शुभारंभ



प्रयागराज येथे पुढील वर्षी आयोजित कुंभमेळ्याच्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी येथील संगमात जलाभिषेक केला. यानंतर त्यांनी विविध विकास कामांचा शुभारंभ आणि काही प्रकल्पांचे लोकार्पणही केले

**प्रयागराज, १३ डिसेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी प्रयागराज येथे गंगा पूजन करून महाकुंभाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते ५,५०० कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे लोकार्पण करण्यात आले. महाकुंभ मेळ्यातील १६७ विकास प्रकल्पांचे उद्घाटन तसेच अक्षयवत, हनुमान मंदिर, सरस्वती विहीर, भारद्वाज आश्रम आणि श्रृंगवरपूर धाम कॉरिडॉरचे उद्घाटनदेखील पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले.

पंतप्रधान म्हणाले, महाकुंभ हे आपल्या देशाच्या हजारो वर्षांपूर्वी चालत आलेल्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक प्रवासाचे जिवंत प्रतीक आहे. कुंभ हे कोणत्याही बाह्य प्रणालीपेक्षा मनुष्याच्या आंतरिक चेतनेचे नाव आहे. ही जाणीव आपोआप जागृत होते. ही जाणीव भारताच्या कानाकोपऱ्यातून लोकांना संगमाच्या काठावर खेचते. त्यामुळे हा महाकुंभ म्हणजे एकतेचा महायज्ञ असल्याचे मी पुन्हा एकदा सांगतो. यात प्रत्येक प्रकारच्या भेदभावांचा त्याग केला जातो.

**वेदांच्या श्लोकांमध्ये 'प्रयागराज'ची स्तुती**

पंतप्रधान म्हणाले, हा केवळ तीन पवित्र नद्यांचा संगम नाही. प्रयागबद्दल असे म्हटले आहे की, सूर्य जेव्हा मकर राशीत प्रवेश करतो, तेव्हा सर्व दैवी शक्ती, सर्व तीर्थयात्री, सर्व ऋषी, महान ऋषी प्रयागात येतात. हे असे स्थान आहे, जिच्या प्रभावाशिवाय पुराण पूर्ण झाले नसते. प्रयागराज हे असे स्थान आहे, ज्याची वेदांच्या श्लोकांमध्ये स्तुती करण्यात आली आहे. आपला भारत हा पवित्र स्थळे आणि तीर्थक्षेत्रांचा देश आहे. गंगा, यमुना, सरस्वती, कावेरी, नर्मदा अशा असंख्य पवित्र नद्यांचा देश आहे. या नद्यांच्या प्रवाहाचे पावित्र्य, या असंख्य तीर्थक्षेत्रांचे महत्त्व आणि महानता, त्यांचा संगम, त्यांचे संयोजन, त्यांचा प्रभाव, त्यांचे वैभव, हा प्रयाग आहे. प्रयाग म्हणजे जिथे प्रत्येक पायरीवर पवित्र स्थाने आहेत, जिथे प्रत्येक पायरीवर पुण्य क्षेत्र आहेत.

**पंतप्रधान मोदी जगातील सर्वांत लोकप्रिय नेते : आदित्यनाथ**

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उपस्थितांना संबोधित केले. योगी म्हणाले की, जगातील सर्वांत लोकप्रिय नेते नरेंद्र मोदी आहेत. गंगा, यमुना आणि सरस्वती या त्रिवेणीच्या पूजन विधिनंतर पंतप्रधान मोदींच्या आगमनाने महाकुंभाची सुरुवात झाल्याचे सांगितले. (वृत्तसंस्था)

**पंतप्रधानांनी अनेक प्रकल्पांचे केले लोकार्पण**

पंतप्रधान मोदी यांनी महाकुंभसाठी विविध प्रकल्पांचे लोकार्पण केले. यात पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी आणि प्रयागराजमध्ये अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी १० नवीन रोड ओव्हर ब्रिज किंवा फ्लायओव्हर, कायमस्वरूपी घाट आणि रिव्हरफ्रंट रस्ते यासारख्या विविध रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांचा समावेश आहे. पंतप्रधान मोदी यांनी हनुमान मंदिर कॉरिडॉर, भारद्वाज आश्रम कॉरिडॉरसह ५५ कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन केले.


**प्रयागराजमध्ये घडत आहे नवा इतिहास**

पंतप्रधान मोदींनी संगमाला अभिवादन केले आणि म्हणाले, येथे रात्रंदिवस काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आणि सफाई कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो. जगातील एवढा मोठा कार्यक्रम, दररोज लाखो भाविकांच्या स्वागताची व सेवेची तयारी, सलग ४५ दिवस चालणारा महायज्ञ, नव्या महानगराच्या स्थापनेची भव्य मोहीम, प्रयागराजच्या भूमीवर नवा इतिहास रचला जात आहे.

## न्यायमूर्तींनी संतांसारखे जीवन जगावे

**नवी दिल्ली, १३ डिसेंबर**

न्यायव्यवस्थेत दिखाऊपणाला स्थान नाही. न्यायमूर्तींनी संतांसारखे जीवन जगावे. परिश्रमपूर्वक काम करावे आणि समाज माध्यमाचा वापर टाळावा. न्यायाधीशांना खूप त्याग करावा लागतो. त्यांनी फेसबुक अजिबात वापरू नये, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.



न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. एन. कोतीश्वरसिंह यांच्या न्यायासनाने हे मत नोंदवले. जून २०२३ मध्ये मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या सहा महिला न्यायाधीशांना निलंबित करण्याच्या प्रकरणावर न्यायालय सुनावणी करीत होते. मध्यप्रदेश सरकारने २३ मे २०२३ रोजी सरिता चौधरी, रचना अतुलकर जोशी, प्रिया शर्मा, सोनाक्षी जोशी, अदिती कुमार शर्मा आणि ज्योती बारखेडे या सहा महिला न्यायाधीशांना बडतर्फ करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने जानेवारीमध्ये या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली होती. सप्टेंबरमध्ये सर्वोच्च न्यायालयाने आदिती कुमार शर्मा आणि सरिता चौधरी वगळता सर्व न्यायाधीशांना नोकरी बहाल करण्याचा आदेश दिला होता. उपरोक्त दोघींच्या प्रकरणांची स्वतंत्रपणे सुनावणी होईल, नसे न्यायालयाने स्पष्ट केले होते. यावर नुकतीच सुनावणी झाली. (वृत्तसंस्था)

## संसद हल्ल्यातील हुतात्म्यांना आदरांजली

**नवी दिल्ली :** संसदेवर लष्कर-ए-तोयबाच्या अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याला आज २३ वर्षे पूर्ण झाली. या भीषण हल्ल्यात संसदेचे आणि संसद सदस्यांचे रक्षण करताना प्राणाहुती देणाऱ्या जवानांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनकड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली. सीमेपलीकडून सुरू असलेला दहशतवाद चिरडण्याचा आमचा ठाम निर्धार आहे. दहशतवादाविरोधात देश एकजुटीने उभा आहे, असे राष्ट्रपती मुर्मू यांनी एक्स या समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले आहे. २००१ मध्ये आजच्याच दिवशी तोयबाच्या पाच दहशतवाद्यांनी संसदेवर हल्ला केला होता. यात नऊ जणांचा मृत्यू झाला होता तसेच सुरक्षा दलाच्या जवानांनी हा हल्ला परतावून लावताना सर्व पाचही दहशतवाद्यांना ठार केले होते. उपराष्ट्रपती जगदीप धनकड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या हल्ल्यात हुतात्मा झालेल्या जवानांना आदरांजली अर्पण केली.

# संविधानावरील चर्चेत लोकसभेत खडाजंगी

## काही लोक फक्त खिशात संविधान ठेवतात



**नवी दिल्ली, १३ डिसेंबर**

राज्यघटना कवळ कायदेशीर दस्तावेज नसून, ती लोकांच्या आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. काँगेसने संविधानाची अवहेलना करून त्यावर सत्ता निवडली. त्यांचा एक नेता तर फक्त खिशात संविधान ठेवतो. ते त्यांच्या पूर्वजांकडून एवढेच शिकले आहे, अशा शब्दांत संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी राहुल गांधींचे नाव न घेता टीका केली.

अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या गदारोळानंतर राज्यघटनेवर चर्चा सुरू झाली. पहिले भाषण राजनाथसिंह यांचे होते. ते म्हणाले, ७५ वर्षांपूर्वी संविधान सभेने संविधानाचा मसुदा तयार करण्याचे काम पूर्ण केले होते. ही राज्यघटना केवळ कायदेशीर दस्ताऐवज नसून, ती लोकांच्या आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. संविधानाच्या माध्यमातून देशात खऱ्या अर्थाने लोकशाही लागू झाली आहे. आपली राज्यघटना सहकारी लोकशाहीची खात्री देते आणि राष्ट्राची एकात्मताही सुनिश्चित करते. राज्यघटना हा देशाचा अभिमान प्रस्थापित करण्याचा आराखडादेखील आहे. सावरकर आणि भगतसिंग यांच्यासारख्या संविधान सभेचा भाग नसलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या विचारांनीही राज्यघटना मजबूत केली. (वृत्तसंस्था)

## संविधानामुळे मिळालेले सुरक्षा कवच तोडण्याचा प्रयत्न



**नवी दिल्ली, १३ डिसेंबर**

भारताचे संविधान आमचे सुरक्षा कवच आहे. संविधान सुरक्षेची हमी देते. त्यामुळे जनतेला न्याय, एकता, आर्थिक संरक्षण मिळाले आहे. परंतु, सत्ताधाऱ्यांनी हे सुरक्षा कवच तोडण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. खाजगीकरण करून आरक्षण कमकुवत करण्याचे काम सुरू आहे, असा आरोप काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा यांनी लोकसभेतील आपल्या पहिल्याच भाषणात केला.

लोकसभेत संविधानावर चर्चा करताना त्या बोलत होत्या. त्या म्हणाल्या, भारताला चर्चा आणि संवादाची परंपरा आहे. परंतु, सत्ताधारी जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यास तयार नाहीत. लोकसभा निवडणुकीत असा निकाल लागला नसता, तर सत्ताधाऱ्यांनी संविधान बदलले असते. संविधानामुळे महिलांना लढण्याची हिंमत मिळते. त्यामुळे संविधान बदलण्याची भाषा जनता सहन करणार नाही, असा इशारा प्रियांकांनी दिला. या निवडणुकांमधून त्यांना कळून चुकले आहे की, या देशाची जनता जिकत असताना संविधान सुरक्षित ठेवेल. या निवडणुका जवळजवळ हरल्याने त्यांना हे समजले आहे की, संविधान बदलण्याच्या चर्चा या देशात चालणार नाहीत, असे त्या म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

# अविश्वास प्रस्तावावरून प्रचंड गदारोळ

## राज्यसभा सोमवारपर्यंत स्थगित

**नवी दिल्ली, १३ डिसेंबर**

राज्यसभेचे सभापती जगदीप धनकड यांच्यावर विरोधकांनी दाखल केलेल्या अविश्वास प्रस्तावावरून शुक्रवारी सभागृहात प्रचंड गदारोळ झाला. विरोधी पक्षांचे सदस्य आणि सत्ताधारी सदस्यांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप झाले. या गदारोळातच सभागृहाचे कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आले.

संसदेच्या वरिष्ठ सभागृहात अविश्वास प्रस्ताव सादर करताना विरोधकांनी धनकड यांच्यावर हल्लाबोल केला. धनकड हे प्रचंड पक्षपाती आहेत, ते फक्त सरकारचे प्रवक्ते म्हणून काम करीत असल्याने, त्यांना या पदावरून हटविण्यात यावे, अशी मागणी विरोधी पक्षांच्या सदस्यांनी केली. सत्ताधारी



बाकांवरील सदस्यांनी विरोधकांच्या आरोपांना त्याच भाषेत प्रत्युत्तर दिले. विरोधी सदस्य सातत्याने धनकड यांचा अपमान करीत असतात. धनकड हे शेतकरी कुटुंबातील आहेत आणि त्यांचा वारंवार अपमान होत असतो. ते एका घटनात्मक पदावर विराजमान आहेत आणि त्यांचा अपमान म्हणजे घटनेचा अपमान आहे, असा आरोपही सत्ताधारी सदस्यांनी केला.

या गदारोळातच सभापती धनकड यांनी सभागृहातील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांना बोलण्याची परवानगी दिली. यावेळी खडगे यांनी धनकड यांच्यावर पक्षपात करण्याचा आरोप केला. तुम्ही फक्त सत्ताधारी सदस्यांनाच जास्त वेळ बोलण्याची संधी देता आणि काँग्रेसच्या सदस्यांचा अपमान करता, असा आरोप खडगे यांनी केला.

यावेळी धनकड यांनी मल्लिकार्जुन खडगे आणि सभागृहाचे नेते जे. पी. नड्डा यांना या स्थितीवर तोडगा काढण्यासाठी कामकाज संपल्यानंतर आपल्या कक्षात येण्याची सूचना केली.

आज लोकसभेतही सुरुवातीला अदानी आणि सोरोस मुद्यांवरून प्रचंड गदारोळ झाला. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांनी एकमेकांवर आरोपांच्या जोरदार फैरी झाडल्या. अदानी मुद्यावरून देशाचे लक्ष विचलित करण्यासाठीच सरकारने सोरोसचा मुद्दा आणला, असा आरोप विरोधकांनी केला. यानंतर स्थिती शांत झाली आणि संविधानावरील चर्चेला सुरुवात झाली (वृत्तसंस्था)

# तेलंगणातील महिला नातेवाईकांच्या स्वाधीन

## मेहकर पोलिसांची कामगिरी



हरवलेल्या महिलेस नातेवाईकांच्या स्वाधीन करताना मेहकर पोलिस

**मेहकर, १३ डिसेंबर**

तेलंगणातील हरवलेल्या ३३ वर्षीय महिलेची ओळख पटल्यानंतर मेहकर पोलिसांनी तिला नातेवाईकांच्या स्वाधीन केले. ११ डिसेंबर रोजी रात्री १ वाजता येथील पोलिस हवालदार सुखदेव ठाकरे व अंमलदार शिवानंद तांबेकर गस्त घालत असताना बसस्थानकावर एक महिला थंडीत कुडकुडत असल्याचे आढळून आले.

पोलिसांनी तिला नाव-गाव विचारले. मात्र, ती तेलुगू भाषेत बोलत होती. अंमलदारांनी पोलिस निरीक्षक भाऊराव घुगे यांना माहिती दिली. रात्री कर्तव्यावर असलेल्या महिला अंमलदार सोफिया पठाण यांना घटनास्थळी बोलावले व विचारपूस केली. तिला महिला कक्षात बसवून महिला अंमलदार राणी जामदार, अंमलदार करीम शहा यांनी तिच्याकडील पिशवीची पाहणी केली. त्यात महिलेचे आधार कार्ड आढळले. त्यावर शोभा यलमा रा. करमपेल्ली, तेलंगणा अशी नोंद आढळली. त्यावरील भ्रमणध्वनी क्रमांकावरून ड्युटी अधिकारी शिवानंद केदार, ठाणे अंमलदार पोलिस हवालदार राजेश जाधव यांनी संपर्क साधला. तिची पूर्ण ओळख पटल्यानंतर कर्मचाऱ्यांनी तिच्या नातेवाईकांना पोलिस स्टेशन मेहकर येथे बोलावून घेतले. महिलेची माहिती नातलगांना मिळताच त्यांनी १२ डिसेंबर रोजी सायंकाळी मेहकर पोलिस स्टेशन गाठले. आलेले लोक हे त्या महिलेचे नातेवाईकच असल्याची खात्री पटल्यानंतर तिला त्यांच्या स्वाधीन करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

# 'मुंबई मेट्रो वुमन' आता थेट मंत्रालयात

## अश्विनी भिडे यांची मुख्यमंत्री कार्यालयात बदली

**मुंबई, १३ डिसेंबर**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांची बदली थेट मुख्यमंत्री कार्यालयात करण्यात आली आहे.

अश्विनी भिडे यांची मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधानसचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अश्विनी भिडे यांना त्वरित या पदाचा कारभार हाती घेण्याचा आदेश देण्यात आला असून, पुढील आदेशापर्यंत मेट्रोच्या व्यवस्थापकीय पदाचा कार्यभार सांभाळण्याची सूचनाही त्यांना देण्यात आली आहे.

यापूर्वी मुख्यमंत्री कार्यालयाचा पदभार ब्रिजेशसिंह पाहात होते. त्यांच्या जागी आता अश्विनी भिडे यांची नियुक्ती करण्यात आली. राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. यात देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली असून, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. त्यानंतर काही अधिकाऱ्यांच्या बदल्या होत असल्याचे पाहायला मिळत आहे. (वृत्तसंस्था)

**१९९५ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी**



अश्विनी भिडे या १९९५ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी आहेत. त्यांना सनदी सेवेतील २५ वर्षांचा अनुभव आहे. मुंबई मेट्रोचे जाळे निर्माण करण्यात त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे त्यांना 'मुंबई मेट्रो वुमन' म्हणून ओळखले जाते.

# 'पुष्पा २' फेम अभिनेता अल्लू अर्जुनला अटक



अल्लू अर्जुनला अटक करून नेताना पोलिस

## हायकोर्टाने दिला जामीन

**हैदराबाद, १३ डिसेंबर**

तेलुगू चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेता अल्लू अर्जुन याला पोलिसांनी अटक केली आहे. वैद्यकीय तपासणीनंतर त्याला न्यायालयात हजर केले असता, त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली. यानंतर लगेच पोलिसांनी त्याची तुरुंगात रवानगी केल्यानंतर हायकोर्टाने त्याला जामीन मंजूर केला.

हैदराबादमध्ये ४ डिसेंबर रोजी 'पुष्पा' चित्रपटाच्या प्रीमियरमध्ये घडलेल्या चेंगराचेंगरीप्रकरणी पोलिसांनी ही कारवाई केली. या घडामोडींमुळे चित्रपटसृष्टीला धक्का बसला आहे. या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाला होता. या महिलेचा मुलगा रुग्णालयात असून, त्याची प्रकृती गंभीर आहे.

या चेंगराचेंगरीप्रकरणी पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यांमध्ये कलम १०५ (जीवघेणे कृत्य) आणि कलम ११८ (जाणूनबुजून इतरांना इजा पोहोचवणे) या कलमांची नोंद एफआयआरमध्ये करण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी अल्लू अर्जुन, संध्या थिएटर व्यवस्थापन आणि अल्लू अर्जुनच्या सुरक्षा पथकाविरोधात गुन्हा दाखल केला. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्लू अर्जुन आणि त्याची टीम संबंधित थिएटरवर 'पुष्पा २' चित्रपटाच्या प्रीमियरसाठी येणार असल्याची कोणतीही माहिती पोलिसांना देण्यात आली नव्हती. (वृत्तसंस्था)

# भारताची 'गगनयान' मोहीम होतेय् साकार

**बंगळुरू, १३ डिसेंबर**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमच्या दिशेने शुक्रवारी महत्त्वाचे पहिले यशस्वी पाऊल टाकले आहे. या संदर्भातील माहिती इस्रोने अधिकृत एक्स अकाऊंटवरून दिली. इस्रोने यात म्हटले आहे की, भारताच्या महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमेने पहिल्या सॉलिड मोटर सेगमेंटचे प्रक्षेपण संकुलात यशस्वी स्थलांतर केले आहे.

मानवी अंतराळ उड्डाणासाठी भारताच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सज्ज असलेल्या एचएलव्हीएम३ जी१ उड्डाणाच्या तयारीसाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. त्यामुळे भारताचे मानवी अंतराळ उड्डाणाचे स्वप्न आता आकार घेत असल्याचे इस्रोने म्हटले आहे.

इस्रोच्या नेतृत्वाखाली गगनयान मोहिमेचे उद्दिष्ट क्रू-अवकाश यशस्वी करण्याची भारताची क्षमता प्रदर्शित करणे आहे. हे मानव-रेटेड लाँच व्हेईकल (एचएलव्हीएम३) अंतराळवीरांना पृथ्वीच्या खालच्या कक्षेत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. पहिले क्रू-अवकाश मोहीम २०२६ च्या अखेरीस नियोजित आहे. तत्पूर्वी सॉलिड मोटर सेगमेंट ट्रान्सफर हे रॉकेटच्या पहिल्या टप्प्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे, असे इस्रोने सांगितले आहे.




**'गगनयान मोहीम', भारतासाठी ऐतिहासिक झेप**

ही यंत्रणा सुरळीत कार्यान्वित झाल्यानंतरच मानवी अंतराळ उड्डाण करण्यात येणार आहे. यात गगनयान अंतराळयान ४०० किलोमीटर उंचीवर तीन अंतराळवीरांना घेऊन जाईल आणि पृथ्वीभोवती फिरत राहील. हे अभियान भारतासाठी एक महत्त्वपूर्ण तांत्रिक आणि पायाभूत सुविधांमध्ये ऐतिहासिक झेप असल्याचेअंतराळ संशोधकांनी म्हटले आहे.

**२०२५ अखेरीस गगनयानाच्या मनुष्य विरहित चाचण्या**

इस्रो या ऐतिहासिक मोहिमेकडे सातत्याने प्रगती करीत आहे. व्यापक अंतराळवीर प्रशिक्षण, प्रणोदन प्रणाली चाचण्या आणि प्रक्षेपणदरम्यान सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी डिझाईन केलेल्या क्रू एस्केप सिस्टीमचे एकत्रीकरण या सर्व गोष्टी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेकडून चालू आहेत. भारताचा गगनयान कार्यक्रम २०२५ च्या अखेरीस क्रू नसलेल्या चाचणी उड्डाणाने सुरू आहे, त्यानंतर अतिरिक्त क्रू नसलेल्या मोहिमा सुरू होतील. (वृत्तसंस्था)

# चकमकीत दोन नक्षल्यांचा खात्मा

**बिजापूर, १३ डिसेंबर**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात शुक्रवारी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलाच्या जवानांनी दोन नक्षलवाद्यांना ठार केले.

नेंद्रा आणि पुन्नूर गावांच्या दरम्यान असलेल्या जंगलात काही नक्षलवादी आले असल्याची माहिती मिळाल्यानंतर जवानांनी जंगलाला वेढा घातला आणि शोध मोहीम सुरू केली, अशी माहिती बिजापूरचे पोलिस अधीक्षक जितेंद्र कुमार यादव यांनी वृत्तसंस्थेला दिली. जवानांना पाहताच नक्षलवाद्यांनी गोळीबार केला. यावेळी झडलेल्या चकमकीत दोन नक्षलवादी ठार झाले. त्यांच्या जवळून रायफल्स आणि इतर स्फोटके जप्त करण्यात आली, असे यादव यांनी सांगितले. यावर्षीच्या जानेवारीपासून आतापर्यंत छत्तीसगडमधील चकमकींमध्ये २१७ नक्षलवाद्यांना ठार मारण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# सावधान, रात्र वैऱ्याची आहे...

भारत देश आपल्या शेजारी देशांच्या तुलनेत खूप सुखी, समृद्ध आणि प्रगतिशील आहे. त्यामुळे अस्वस्थ, अस्थिर आणि अविकसित अशा शेजारी देशांना नेहमीच भारताचा हेवा वाटत असतो. शेजारी देशांमध्ये पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, मालदीव आणि अन्य देशांचा समावेश आहे. मात्र यापैकी एकाही देशातील वातावरण सुरळीत आणि सौहार्दाचे नाही. आपल्या बहुतांश शेजारी देशांची आंतरिक सुरक्षा धोक्यात आली आहे, विघटनवादी शक्तींनी या साऱ्या देशांना ग्रासले आहे. तेथील सरकारेही अस्थिर आहेत. अर्थव्यवस्थेच्या आघाडीवरही आनंदीआनंद आहे. त्या तुलनेत आपण आपल्या देशाचा विचार केला तर आपला देश खूपच सुखी आणि समृद्ध आहे. आपल्या अंतर्गत सुरक्षेला कोणताही धोका नाही, विघटनवादी शक्ती अधूनमधून डोके वर काढण्याचा प्रयत्न करत असतात, पण त्यात त्यांना अपेक्षित यश येत नाही. आपली अर्थव्यवस्थाही सुदृढ आहे. आपल्या देशातील सरकारही शेजारी देशांच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या स्थिर आहे. याचे कारण आपल्या देशाला लाभलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दूरदृष्टीचे आणि विकासाभिमुख नेतृत्व. यामुळेच शेजारी देश आपल्यावर नेहमीच जळत असतात, दातओठ खाऊन असतात. 'उसकी कमीज मेरे कमीज से सफेद क्यो', असा त्यांना वाटत असते. यामुळेच आपल्या देशात अस्थिरता आणि अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न गेल्या काही वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. याआधी देशविरोधी शक्तींनी आधी पंजाब आणि जम्मू-काश्मीरला हाताशी धरले. १९९० च्या दशकात पंजाबमध्ये दहशतवादाने थैमान घातले होते. या दहशतवादाची झळ पंजाबमधील क्रीडा, आर्थिक, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक आणि पत्रकारिता क्षेत्राला बसली होती. पंजाबमधील एकही क्षेत्र यातून सुटले नव्हते. यामुळे फक्त पंजाबचीच नाही तर संपूर्ण देशाची अपरिमित अशी हानी झाली. पंजाब विकासाच्या बाबतीत अनेक वर्ष मागे फेकला गेला. पंजाबमध्ये अनेक राजकीय नेत्यांची, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांची दहशतवाद्यांनी हत्या केली. देशाबाहेरील विघटनवादी शक्तीचा पंजाबमधील दहशतवादी कारवायांना पाठिंबा होता. पंजाबमधील तरुणांची या विघटनवादी शक्तींनी दिशाभूल केली, त्यांचे माथे भडकवण्याचा प्रयत्न केला. त्यांना देशाच्या मुख्य राष्ट्रीय प्रवाहातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पंजाबमधील त्यावेळची परिस्थिती हाताबाहेर गेली होती. याची परिणती ऑपरेशन ब्ल्यू स्टारमध्ये झाली होती, सुवर्ण मंदिरात लष्कर घुसवावे लागले होते. याची किंमत भारताचे तत्कालीन लष्करप्रमुख जनरल अरुण वैद्य यांना आपल्या निवृत्तीनंतर चुकवावी लागली होती. दहतवाद्यांनी पुण्यात त्यांची हत्या केली. एवढेच नाही तर ऑपरेशन ब्ल्यू स्टारची किंमत तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना पदावर असताना चुकवावी लागली. सुरक्षारक्षक माथेफिरू लष्करी जवानांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. यानंतर देशभर शीखविरोधी दंगली झाल्या. हजारो शिखांचे शिरकाण करण्यात आले. खूप लवकर म्हणता येणार नसले तरी कालांतराने पंजाबमधील दहशतवादाच्या या राक्षसाचे निर्दालन करण्यात आपल्याला यश आले.

पंजाब पूर्ववत् झाला, मात्र जम्मू-काश्मीरमधील विघटनवादी कारवाया कधी थांबल्याच नाही. त्या कालही सुरू होत्या, आजही सुरू आहेत. कदाचित उद्याही सुरूच राहतील. त्याची तीव्रता कमी-जास्त होत गेली. आज जम्मू-काश्मीरमधील घातपाती आणि विघटनवादी कारवायांचे प्रमाण कमी झाले असले तरी पूर्णपणे संपलेले नाही. याला जम्मू-काश्मीरची भौगालिक रचना आणि आपल्या देशातील आतापर्यंत होऊन गेलेले काँग्रेसी शासनकाळातील बुळे आणि कुचकामी नेतृत्व जबाबदार म्हणायला हरकत नाही. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जम्मू-काश्मीरला ३७० कलमाची जी भेट आणि देणगी दिली, त्यामुळे जम्मू-काश्मीर कधी मनापासून स्वतःला भारताचा भाग समजतच नव्हता. जम्मू-काश्मीरला आतापर्यंत मिळालेल्या भारतद्वेषी आणि पाकधार्जिण्या नेतृत्वामुळेच फक्त जम्मू-काश्मीरचेच नाही तर देशाचेही कधीही भरून न निघणारे नुकसान झाले. जम्मू-काश्मीरमधील राजकीय नेतृत्वाचे वर्णन गळ्यात मंगळसूत्र एकाच्या नावाने घालायचे आणि फिरायचे दुसऱ्यासोबत, असे केले तरी ते चूक ठरणार नाही. जम्मू-काश्मीरमधील रोगाचे निदान देशातील आतापर्यंत एकाही पंतप्रधानाला करता आले नाही. वा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्याने या रोगाचे निदान जाणीवपूर्वक केलेच नाही. कारण रोगाचे निदान बरोबर केले तर पुढील उपचार करावे लागतात. जी करण्याची आपल्या देशातील राजकीय नेतृत्वाची हिंमत नव्हती. ती पहिल्यांदा दाखवली ती आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी. जम्मू-काश्मीरला अनेक वर्षांपासून भेडसावणाऱ्या राजकीय आजारावर मोदी यांनी जबरदस्त अशी शस्त्रक्रिया केली. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील विशेष कलम ३५ ए आणि ३७० निष्प्रभ करण्याची हिंमत मोदी यांनी दाखवली. मोदी यांच्या या हिमतीचे तसेच राजकीय धडाडीचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. जम्मू-काश्मीरला लाभलेला राजकीय अस्थिरतेचा शाप ३७० कलम निष्प्रभ झाल्यामुळे आपोआप संपुष्टात आला. मात्र यामुळे देशविघातक शक्तींचा प्रभाव कमी झाला असला तरी त्यांनी पूर्णपणे हार मानली नाही. भारताला अस्थिर करणाऱ्या ज्या शक्ती आहेत, त्यात प्रामुख्याने मुस्लिम संघटना जास्त आहेत, नव्हे त्याच सक्रिय आहेत. वेगवेगळ्या मार्गाने भारतात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न या सर्व संघटनांनी थांबवले नाही. याचे प्रत्यंतर राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) नुकत्याच देशातील पाच राज्यांत घातलेल्या १९ ठिकाणाच्या छाप्यावरून दिसून आले. यात जैश-ए-मोहम्मदच्या समर्थकांना अटक करण्यात आली. विशेष म्हणजे यातून महाराष्ट्रही सुटला नाही. महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरपासून अगदी जवळ असणाऱ्या अमरावती येथून पाकिस्तानशी संबंध असल्याच्या तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले. एनआयएने ज्यांना ताब्यात घेतले, ते सर्व मुस्लिम आहेत. कोणताही धर्म कधीच कोणाला चुकीचे शिकवत नाही, हे खरे असले तर धर्माच्या आडून काही लोक एका धर्माविरुद्ध दुसऱ्या धर्माच्या लोकांना भडकवत असतात, ही वस्तुस्थिती आहे. गुन्हेगाराला जात आणि धर्म नसतो, हे वाक्य सुविचार म्हणून चांगले वाटत असले तरी विशिष्ट प्रकारच्या गुन्हेगारी कारवाया करणारे, विशेषतः दहशतवादी कारवायात गुंतलेले सर्व एकाच धर्माचे कसे असतात हे कोडे कधीच न उमगणारे नाही. यात संशयाची सुई मुस्लिम धर्मावरच का स्थिरावत असते. सर्व मुस्लिम अतिरेकी नसले तरी पडकलेले सर्व अतिरेकी हे मुस्लिमच असतात, याकडे कोणी दुर्लक्ष करू शकत नाही. एनआयएने आपल्या देशव्यापी छाप्यात पकडलेले लोक पाहिले तर याची खात्री पटते. त्यामुळेच हा अतिशय चिंतेचा विषय म्हटला पाहिजे. देशातील जी राज्ये सध्या शांत दिसतात, तेथील शांतता ही भविष्यातील धोका ठरणार नाही, याची काळजीही आपल्याला घ्यावी लागणार आहे. देशाला असलेला धोका आज वाढला आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात देशाने सर्वच क्षेत्रांत केलेली नेत्रदीपक प्रगती डोळे दिपवणारी आहे. यामुळे या देशविघातक शक्तीचा मोदींच्या नेतृत्वावर तसेच त्यांच्या नेतृत्वातील चौफेर प्रगती करत असलेल्या देशावर राग असणे स्वाभाविक आहे. याची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. देशाच्या अनेक भागांत घातपाती कारवाया जाणीवपूर्वक घडवल्या जात आहे. मणिपूर दीड-दोन वर्षापासून जळत आहे. कमी-जास्त असले तरी देशाच्या सर्व भागांत विघटनवादी शक्तींच्या अशा कारवाया सुरू आहेत. याचा वेळीच बीमोड करायला पाहिजे. देशाचा काही भाग शांत असला तरी तेथील शांतता ही वादळापूर्वीची शांतता ठरू नये. देशातील सुरक्षा यंत्रणा या आव्हानांचा सामना करण्यासाठी सज्ज आहे. ही समाधानाची बाब म्हणायला पाहिजे. मात्र रात्र वैऱ्याची आहे, याचा विसर आम्ही पडू देऊ नये. ▮


## यंगिस्तान

# मुंबईचा किंग कोण?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

मन तळ्यात, मळ्यात अशी अवस्था उद्धव ठाकरे यांची झाली आहे. लोकसभेत काही बऱ्या जागा मिळाल्यामुळे हवेत तरंगणाऱ्या उबाठा गटाला मराठी माणसाने विधानसभेत धूळ चारली. मुंबईतील मुसलमान मतदारांनी मात्र उद्धव ठाकरे यांचे बुडणारे जहाज सावरले. आता मुंबई पालिकेच्या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर उबाठा गटामध्ये अस्वस्थता पसरू लागली आहे. उबाठा गटातील काही नेत्यांचे म्हणणे असे आहे की विधानसभेत आपला पराभव दोन कारणांमुळे झाला, एकतर लोकसभेत मिळालेल्या जागांमुळे वाढलेला फाजिल आत्मविश्वास आणि आघाडीतील पक्षांशी मैत्री. जर उबाठा गट आघाडीत सामील झाला नसता तर त्यांना चांगल्या जागा मिळाल्या असत्या, असं त्यांचे नेते मंडळी म्हणू लागली आहेत. मात्र संजय राऊत अजूनही आघाडी करण्याच्या मुद्यावर ठाम असून त्यांनी पराभवाचं खापर ईव्हीएमवर ढकललं आहे. शिवसेनेतून बेदखल झाल्यामुळे ठाकरेंना उबाठा गट स्थापन करावा लागला. आता त्यातही दोन मतप्रवाह निर्माण होत असल्यामुळे उद्धव ठाकरे भलतेच अडचणीत सापडले आहेत. खरं पाहता भाजपाशी युती तोडणं ही उद्धव ठाकरेंची मोठी चूक नव्हती. पण स्वतःला हिंदुत्वापासून दूर नेत आघाडीत सामील होणं ही ठाकरेंची घोडचूक होती. उद्धव ठाकरे भाजपापासून वेगळी चूल मांडून त्यांचं हिंदुत्व पुढे घेऊन जाऊ शकत होते. असं झालं असतं तर कदाचित एकनाथ शिंदे यांना बंड करण्याची संधी मिळाली नसती. पण उद्धव ठाकरेंनी हिंदुत्वाशी फारकत घेऊन एकनाथ शिंदे यांच्या बंडाला एक वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिलं, असं गमतीने म्हणावं लागेल.

विधानसभेत दारुण पराभव झाल्यानंतर आता ठाकरेंसमोर मुंबई पालिका निवडणूक जिंकण्याचं आव्हान आहे. पालिकेची निवडणूक जिंकणं हा ठाकरेंसाठी केवळ राजकीय मुद्दा नसून हा त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. गेली सुमारे २५ वर्षे पालिकेवर सत्ता असलेल्या ठाकरे कुटुंबाला आता भीती वाटत आहे की जशी महाराष्ट्रातून आपली पीछेहाट झाली तशी मुंबईतलं आपलं नाव पुसून जाऊ शकतं. उबाठा गटाने कोकण पूर्णपणे गमावलं असून, उर्वरित महाराष्ट्रातील त्यांची ताकद संपुष्टात येत आहे. मुंबई हा एकमेव किल्ला आता त्यांच्याकडे शाबूत आहे. हा किल्ला त्यांना गमवायचा नाही. पण किल्ला पुन्हा मिळवताना त्यांची वैचारिक दमछाक होत आहे. ६ डिसेंबर २०२४ रोजी वादग्रस्त ढांचा पतनाच्या दिवशी उबाठा गटाने बाबरी पतनाचे समर्थन करणारे पोस्टर्स सोशल मीडियावर झळकवले होते. म्हणून समाजवादी पार्टीने आघाडीतून माघार घेतली. ठाकरे गट जर जुन्या मुद्याकडे वळणार असेल आणि आघाडीतले घटक पक्ष त्यांचे कान धरणार नसतील तर अशा आघाडीत का राहावे, असं म्हणत त्यांनी आघाडीतून काढता पाय घेतला आणि आपण मुस्लिमांचे तारणहार असल्याचे पुन्हा एकदा त्यांनी दाखवून दिलं. मुंबईतील दोन जागांपेक्षा उत्तर प्रदेशातील सत्ता त्यांना अधिक प्रिय आहे.



उद्धव ठाकरे जेव्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना केवळ चांगलेच नव्हे तर कोणतेच काम करता आले नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात काम न करणारा, घरी बसून मुख्यमंत्री म्हणून त्यांची नकारात्मक ओळख निर्माण झाली. अर्थात ही ओळख विरोधकांनी केली नसून, त्यांनीच करून घेतली आहे. राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की मुख्यमंत्री होण्यासाठी शरद पवारांनीच अट घातली होती की ठाकरेंनी कार्यालयात येऊ नये. खरे खोटे या दोघांनाच ठावूक. मात्र त्यांचं कर्तृत्वहीन व्यक्तिमत्त्व लपवण्यासाठी ठाकरे मुख्यमंत्री असताना दर तीन महिन्यांनी बेस्ट सीएम सर्व्हे केला जात होता आणि उद्धव ठाकरे हे भारतातील सर्वोत्तम मुख्यमंत्री असल्याचे घोषित केले जात होते. त्यांना असं वाटलं होतं की असले खोटे सर्व्हे करून महाराष्ट्राच्या जनतेला आपल्या बाजूने करता येईल. पण देवेंद्र फडणवीसांचं एक सुंदर वाक्य आहे. ते म्हणाले होते की विरोधक जातीवरून, कुटुंबावरून टीका करतात. पण त्याने काही फरक पडत नाही. उद्या जेव्हा महाराष्ट्रातील विकासकामांची यादी काढायला घेतली तर या कामांच्या मागे देवेंद्र फडणवीस म्हणून कुण्या माणसाचा हात होता हे अधोरेखित केले जाईल. खोट्या प्रचारापेक्षा काम बोलतं. आपलं नाणं खणखणीत असेल तर ते वाजतंच. चंदनाला कुठे जाहिरात करावी लागते? म्हणूनच ठाकरेंना आता मुंबईच्या जनतेसमोर कोणत्या तोंडाने आणि कोणते प्रश्न घेऊन जावे हा प्रश्न पडला आहे.

ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हा एका लेखात मी उल्लेख केला होता की, भविष्यात उद्धव ठाकरेंवर मोठे भ्रष्टाचाराचे आरोप लागतील ज्याप्रमाणे मॅकबेथचं राजमुकुट त्यासाठी शाप ठरलं हीच परिस्थिती ठाकरेंवर येऊ शकते. आणि झालंही तसंच... ठाकरेंसाठी मुख्यमंत्री पदाची खुर्ची काटेरी ठरली. त्यांचं राजकीय करीअर धोक्यात आलं. म्हणून राजकारणात अति घाई करू नये. उद्धव ठाकरेंचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांचं वाक्य ते विसरले. प्रबोधनकार म्हणायचे, एखाद्याला जर आपटायचं असेल तर आधी त्याला उचलावं लागतं. याचा विसर त्यांना पडला होता. मग आता मुंबईच्या जनतेसमोर कोणते मुद्दे मांडणार, हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. म्हणूनच उबाठा गटात दोन गट पडले असून एका गटाला असं वाटतं आहे की बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा उद्धव ठाकरेंनी पुढे न्यावा आणि हा वारसा पुढे न्यायचा असेल तर सर्वांत आधी काँग्रेस व शरद पवार गटासोबतची आघाडी, मैत्री तोडावी लागेल. पण उद्धव ठाकरेंचे सकाळचे लाऊड स्पीकर संजय राऊत स्वतःला महाविकास आघाडीचे जनक समजत असल्यामुळे त्यांना ही आघाडी हवी आहे. मग यातून मार्ग काढण्यासाठी ठाकरे मराठी माणूस आणि गुजराती व इतर परप्रांतीय असा मुद्दा पुन्हा उपस्थित करू शकतात. त्याचबरोबर हिंदुत्वाची फोडणी देण्यासाठी त्यांनी अयोध्येतील वादग्रस्त ढांचा पतनाला पुन्हा समर्थन दिलं आहे.

मुंबईत विविध भाषिक राहतात. तरीही मुंबईतला मराठी माणूस सुखी आहे. मुंबईत कोणावरच अन्याय होत नसून, ही कष्टकऱ्यांची नगरी मानली जाते. आता आधुनिक युगात स्मार्ट वर्क करणाऱ्यांना ही मुंबई नेहमीच यश देते. अशा परिस्थितीत 'मुंबई तोडण्याचा डाव, मुंबई मराठी माणसाची, परप्रांतीय' इत्यादी मुद्दे काम करणार नाहीत. त्याचबरोबर गमावलेले हिंदू मतदार उबाठाकडे इतक्या जलदगतीने परत येणार नाहीत. त्यासाठी त्यांना भाजपा व शिवसेनेपेक्षा मोठे हिंदुत्ववादी असल्याचे सिद्ध करावे लागेल. उद्धव ठाकरे मराठी लोकसंख्या अधिक असलेल्या विभागांवर लक्ष केंद्रित करतील. पण सर्वच मराठी जनता ठाकरेंना मतदान करते ही अंधश्रद्धा आहे. भाजपाला मतदान करणारे महाराष्ट्रद्रोही अशी प्रतिमा याच उबाठा गटाने निर्माण केली होती. आता मतदारांच्या या नकारात्मक प्रतिमेचा त्यांना विधानसभेत फटका बसला आहे. पालिकेच्या निवडणुकीतही हा फटका बसल्याशिवाय राहणार नाही. पण संजय राऊत एका वेगळ्याच फेजमध्ये वावरत असून ते उबाठा गटाला आणखी खोलात नेण्यासाठी सिद्ध झाले आहेत. आता पाहायचे आहे की वरील विश्लेषणानुसार त्यांचे जुने मुद्दे कामी येणार नाहीत, तर मन तळ्यात, मळ्यात अशी अवस्था असलेले उद्धव ठाकरे कोणते नवे मुद्दे आणि नवे डावपेच शोधून काढतील मुंबईकरांचं मन जिंकण्यासाठी, मुंबईचा किंग होण्यासाठी... ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

# समरसतेचा भाव दृढ व्हावा

**नीलेश जोशी**

संघटित हिंदू शक्तीचा हुंकार नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूक निकालातून प्रकट झाला. जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांना या निकालाने चोख उत्तर दिले. त्याचा आनंद वाटत असतानाच पुन्हा जातीय तेढ निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या दोन घटना महाराष्ट्रात घडल्या. त्यातील एक घटना बीड जिल्ह्यातील तर दुसरी परभणी येथील आहे. सामाजिक स्वास्थ्य निकोप राहावे यासाठी धडपडणाऱ्या, सामाजिक समरसता हा समाजाचा स्वभाव व्हावा म्हणून प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक संस्था, व्यक्तीचे मन विषण्ण करणाऱ्या या घटना आहेत. पण ज्या-ज्या वेळी हिंदू समाज संघटित होतो त्या-त्या वेळी नेमक्या अशा घटना का घडतात, हा निव्वळ योगायोग की षडयंत्र असा स्वाभाविक प्रश्न आता निर्माण झाला आहे.

परभणी येथे एका माथेफिरूने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केली. संविधानावर श्रद्धा असलेल्या प्रत्येकाचेच मन या घटनेने संतप्त झाले. संतप्त जनांची तत्काळ प्रतिक्रियाही उमटली. पोलिस प्रशासनाने देख?ील संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान करणाऱ्या माथेफिरूला लगेचच अटक केली. त्यानंतरही या घटनेमुळे प्रक्षुब्ध झालेल्या विविध संघटनांनी बंद पुकारला. अवघ्या परभणीत या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद होता, असे असतानाही दुपारच्या सुमारास परभणी येथे तोडफोड, जाळपोळ करण्यात आली. हा विध्वंस करणारे नेमके कोण असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

दुसरी घटना बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात घडली. तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला. त्यामुळे तेथील नागरिक चिडले. त्यांनी रास्ता रोको करीत न्यायाची मागणी केली. या दोनही घटना अत्यंत निंदनीय आहेत. या घटनांमध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई शक्य तितक्या लवकर व्हावी यात कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण या घटनांआडून समाजात जातीय तणाव निर्माण करण्याचा कुणाचा प्रयत्न आहे का? याचाही सखोल आणि सूक्ष्म तपास करण्याची गरज आहे. खरं म्हणजे गत काही वर्षांत राज्यात जाती-जातीत संघर्ष, तेढ निर्माण व्हावा अशी षडयंत्रे रचली जात असल्याचे विविध घटनांवरून दिसून येते. हिंदू समाजात मराठा, ओबीसी, दलित असा भेद गडद व्हावा, संघटित हिंदू विभाजित व्हावा असे प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांमध्ये कथित पुरोगामी, स्वयंघोषित लिबरल, सर्वधर्मसमभावाचे पुरस्कर्ते म्हणवणाऱ्या राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग असल्याचे दिसून येते. हिंदुत्व विचार असणारी शक्ती सत्तेत येऊ नये यासाठीच या साऱ्यांची धडपड सुरू होती. त्यांच्या कृतीमुळे महाराष्ट्रातील समाज जीवनावर किती विपरीत आणि दूरगामी परिणाम होऊ शकतात हे कळत असूनही केवळ द्वेषभावनेतून हे सारे प्रयत्न हेतुपुरस्सर केले गेल्याचे अनेकवेळा उघड झाले. कोरेगाव भीमा प्रकरणात न्यायालयाने नोंदविलेले निरीक्षण, या प्रकरणातून समोर आलेले अर्बन नक्षल नेटवर्क हे सर्वांच्याच स्मरणात असेल.

महाराष्ट्र नेहमीच देशाची वैचारिक आणि सांस्कृतिक भूमिका घट्ट करण्यात अग्रेसर राहिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासह अनेकांनी देव, देश आणि धर्म हा विचार रुजविण्यासोबतच अठरा पगड जातींचे संघटन उभारून कृतीतून सामाजिक समसरतेचा भाव दृढ केला. या समरसतेच्या विचाराला नख लावल्याशिवाय आपली पोळी भाजता येणार नाही याची कल्पना असलेले अनेक जण आणि या राष्ट्राचा सर्वांगीण विकास होऊ नये, असे वाटणाऱ्या विदेशी शक्ती नेहमीच जातीय विद्वेष पसरविण्याचा प्रयत्न करतात. पण संघटित हिंदुत्वाच्या शक्तीने उभारलेले राममंदिर आणि याच शक्तीच्या आधारावर गत १० वर्षांपासून राष्ट्राच्या विकासासाठी धडपडणारे केंद्र शासन ही या विरोधी शक्तींना मिळालेली चपराक आहे. त्यातच लोकसभेला थोड्याशा यशाने हुरळून जाऊन व्होट जिहादसह जातीय विद्वेष पसरवून यश मिळेल असे वाटणाऱ्यांचे मनसुबे संघटित हिंदूंनी धुळीस मिळविले. कदाचित म्हणूनच पुन्हा जातीय तेढ निर्माण करणाऱ्या शक्ती काही षडयंत्र तर रचत नाही ना अशी शंका निर्माण व्हावी अशा घटना घडत आहेत. मात्र, समाजाने या शक्तींना उत्तर देण्यासाठी समरसता हा भाव अधिक दृढ करून हिंदुत्वाची, राष्ट्रीयत्वाची ज्योत प्रखर करण्याची गरज आहे. ▮

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

# खरंच लाज वाटली पाहिजे!

**नागेश दाचेवार**

निकाल लागून कित्येक दिवस लोटले आणि अजूनही सरकार स्थापन केले जात नाही, सरकार स्थापन होऊन कित्येक दिवस लोटले आणि अजूनही मंत्रिमंडळाचा विस्तार नाही, गृहमंत्री नसल्याने राज्यातली कायदा व सुव्यवस्था बिघडली असल्याचा आरोप, शिल्लक सेनेचे अर्थात उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आणि त्यांच्या पगारी नोकराने केले असून, जरा जरी लाज लज्जा शरम शिल्लक असेल तर, बांगलादेशातील हिंदूंवर सुरू असलेल्या अत्याचारावर सरकारने काय केले ते सांगावे, असे आव्हान देखील त्यांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिले आहे.

२०१९ मध्ये महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचे निकाल २४ ऑक्टोबर २०१९ ला लागले होते. यावेळी भाजपाला १०५ आणि शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या होत्या. त्यात १० अपक्षांचा पाठिंबाही होता. त्यामुळे सरकार स्थापन होण्यात कुठल्याही अडचणी नव्हत्या. पण तरीदेखील महाराष्ट्राचं सरकार २८ नोव्हेंबर २०१९ रोजी अस्तित्वात आलं. यावेळी मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांनी शपथ घेतली आणि त्यांच्यासह एकनाथ शिंदे, सुभाष देसाई, जयंत पाटील, छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात आणि नितीन राऊत या सहा लोकांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती. मात्र, मंत्रिपदाची शपथ घेतलेले सहा मंत्री हे तब्बल १५ दिवस बिनाखात्याचे मंत्री होते. ठाकरेंनी अडीच वर्षांत मंत्रालयात केवळ दोनवेळा जाण्याचा आणि घरी बसून सरकार चालविण्याचा जसा रेकॉर्ड केलाय्, तसाच राज्याच्या राजकीय इतिहासात बिनखात्याचे मंत्री ठेवण्याचा बहुमानदेखील तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना प्राप्त आहे.

मंत्रिपदाची शपथ घेतल्याच्या १५ दिवसांनंतर अर्थात १३ डिसेंबर रोजी तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय उद्धव ठाकरे साहेब यांनी आपल्या सहा मंत्र्यांना खाते वाटप केलं होतं. महत्त्वाची बाब म्हणजे ३० डिसेंबर रोजी मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार करण्यात आला होता. २८ नोव्हेंबरला मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणाऱ्या उद्धव ठाकरेंनी ३० डिसेंबरला आपलं मंत्रिमंडळ बनवलं होतं. अर्थात तब्बल महिन्याभरानं सरकार स्थापन झालं आणि सरकार स्थापन होऊनही १५ दिवस राज्याला गृहमंत्री नव्हता आणि त्याच्या महिनाभरानंतर पूर्ण मंत्रिमंडळ स्थापित झाले होते. हे येथे आवर्जून अधोरेखित केलं पाहिजे. असे सगळे विश्वविक्रम यांच्याच नावाने असताना, उलट रेकॉर्ड होल्डरच इतरांच्या नावाने ''निकाल लागून पंधरवडा उलटला आणि अजूनही सरकार स्थापन केले जात नाही, सरकार स्थापन होऊन कित्येक दिवस लोटले, मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेऊन बराच काळ लोटला असूनही, मंत्रिमंडळाचा विस्तार नाही, गृहमंत्री नसल्याने राज्यातली कायदा व सुव्यवस्था बिघडली'' असल्याप्रकारचा थयथयाट करताना दिसत आहेत. हा प्रकार खरंच लाज विकल्याचं किंवा लाज, लज्जा, शरम उरली नसल्याचं द्योतक म्हणावे लागेल.

### आता आठवला हिंदू

केंद्र सरकार देशातल्या प्रश्नांबाबत गंभीर नाही असा आरोप करत, बांगलादेशात हिंदूंवर हल्ले सुरू आहेत. त्यांच्यावर अत्याचार केले जात आहे. मंदिरं तोडली जात आहेत. इस्कॉन मंदिर जाळलं गेलं. मंदिराच्या प्रमुखांना अटक केली जात आहे. असा स्थितीत आपले विश्वगुरू हे अत्याचार का पाहात बसले आहेत, असा सवाल उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना केला. पंतप्रधान बांगलादेशबाबत निर्णय का घेत नाही असा प्रश्नही त्यांनी या निमित्ताने उपस्थित केला. त्याचबरोबर केंद्राने बांगलादेशमध्ये हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराबाबत काय पावलं उचलली आहेत हे स्पष्ट करावे अशी मागणीदेखील उद्धव ठाकरे यांनी केली आहे. 'एक है तो सेफ है' पण इथं मंदिरच सेफ कुठे आहेत. त्यामुळे लाज लज्जा शरम शिल्लक असेल तर भाजपा आणि मोदींनी बांगलादेशबाबत बोलावं असे आव्हान ठाकरे यांनी दिलं आहे.

बरं वाटलं उद्धव ठाकरेंना हिंदूंची देखील काळजी वाटते हे ऐकून. कारण मागील काळात ठाकरे स्वतः मुख्यमंत्री असताना, पालघर येथे एका समूहाने पोलिसांच्या उपस्थितीत दोन साधू-संतांची हत्या केली. तेव्हा बांगलादेशातील हिंदूंचा कळवळा आलेल्या उद्धव ठाकरेंच्या चेहऱ्यावर जराही लवलेश दिसला नाही. त्यावेळी हेच उद्धव ठाकरे म्हणाले, हिंदू साधूंची हत्या चोर असल्याच्या गैरसमजातून झाली. अमरावतीत सर तन से जुदा म्हणत मेडिकल शॉप चालविणारे उमेश कोल्हेंची कट्टरपंथीयांनी गळा कापून निघृण हत्या केली. तेव्हा आमचे हिंदूचे कैवारी उद्धव साहेब राज्याचे मुख्यमंत्री होते. आणि हा प्रकार दरोडा टाकण्याच्या प्रयत्नात झाल्याचा बनाव करण्यासाठी अमरावतीच्या पोलिस आयुक्तांवर त्यांनी दबाव टाकला होता. कर्जतच्या प्रतीक पवारने नूपुर शर्मा यांची पोस्ट शेअर केली त्यामुळे शांतिदूतांनी प्रतीकवर हल्ला केला. तेव्हाही आपले उद्धवसाहेबच मुख्यमंत्री होते. अनंत करमुसेचं अपहरण करून उद्धव साहेबांच्या एका मंत्र्यानं बिहारप्रमाणे कृत्य करत बंगल्यावर आणून मारहाण केली, समाजमाध्यमांवरील पोस्ट शेअर केली म्हणून, निवृत्त नेव्ही ऑफिसरला बेदम मारहाण करत त्यांचा डोळा फोडणारे साहेबांचे कायकर्ते होते, उखाड दिया म्हणत कंगना राणावत यांचे उद्धव साहेबांच्या सरकारने विशेष आदेश देत घर पाडले, यांचे वसुलीचं पितळ उघडं पडू नये म्हणून मनसुख हिरेण यांची हत्या यांच्याच पोलिसांनी केली. हिरेण, कंगना, करमुसे, प्रतीक, उमेश आणि दोन साधू हे सगळे पीडित हिंदूच होते. आणि हा सगळा अत्याचार हिंदूंवर उद्धव साहेबांच्या नेतृत्वातील सरकारच्या काळात झाला. कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी ही राज्य सरकारची असते. त्या सरकारचे प्रमुख उद्धव साहेब स्वतः होते. ज्यांना आपल्या राज्यात हिंदूंना सुरक्षा देता आली नाही. जे आपल्या भाषणाची सुरुवात ''माझ्या तमाम हिंदू बांधवांनो आणि भगिनींनो आणि मातांनो'' अशा शब्दांनी करणारे उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसल्यानंतर ''माझ्या तमाम देशभक्त, देशप्रेमी बंधूंनो, भगिनींनो आणि मातांनो'' अशा शब्दाने सुरुवात करू लागले. आम्ही हिंदुत्व सोडलं नाही असं सातत्यानं सांगत दुसरीकडे स्वतःच्या वडिलांना सन्मानानं या महाराष्ट्राच्या जनतेनं दिलेली हिंदुहृदयसम्राट ही पदवी देखील त्यांच्या नावासमोर लावण्याची हिंमत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचा मंच सामायिक करताना करू शकत नसलेल्या उद्धव ठाकरेंना, बांगलादेशातील हिंदुत्वाचा अचानक कळवळा आल्याचा देखावा करणाऱ्या उद्धव ठाकरेंना स्वतः लाज, लज्जा, शरम वाटणे अपेक्षित आहे. आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे थेट पंतप्रधानांवर बोलण्याची लायकी किंवा औकात ठाकरेंची नाही, हे त्यांनी जाणून घेतलं पाहिजे. ▮

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### महाराष्ट्राचे समर्थ नेतृत्व

महाराष्ट्राच्या राजकारणात अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या यादीत आता देवेंद्र फडणवीस यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. संकटांना न भिता सर्वसामान्य गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करणारा, शून्यातून जग निर्माण करणाऱ्या व्यक्तीला महाराष्ट्र लक्षात ठेवतो अगदी कायमस्वरूपी आणि असे महाराष्ट्राला लाभलेले दुर्मिळ नेतृत्व म्हणजे देवेंद्र फडणवीस होय. अगदी राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भरलेले व्यक्तिमत्त्व आहे. राम जन्मभूमी आंदोलनातला कारसेवक, काश्मीरमधील श्रीनगरच्या लाल चौकात पाकड्यांनी तिरंगा जाळल्याच्या घटनेने प्रक्षुब्ध होऊन काश्मीर आंदोलनात सहभागी होत लाल चौकात तिरंगा ध्वज फडकविण्याचा देशभक्तीचा अभिमानाचा साक्षीदार देवेंद्र फडणवीस होते. गेल्या दोन-तीन दशकापासून राजकीय क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. मुख्यमंत्री पदाचा मान मिळाल्यावर महाराष्ट्राच्या विकासाची दिशा समृद्धीच्या मार्गावर आणली. प्रगतीची महाराष्ट्र नवनिर्माणाची वाटचाल प्रारंभ झाली. छत्रपती शिवरायांच्या विचारावर निष्ठा ठेवून समृद्धी महामार्ग, अटल सेतू, कोस्टल रोड, मुंबई-पुणे-नागपुरातील मेट्रो प्रकल्प, जलयुक्त शिवार असे लोकाभिमुख प्रकल्प उभारण्याचे श्रेय केवळ फडणवीसांना जाते. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि त्यांचे पक्ष अगदी टोकाच्या पातळीवर वैयक्तिक हल्ले करीत होते. जरांगे आणि इतर जातीवरून अगदी खालच्या पातळीवर टार्गेट करून फडणवीसांना घेरण्याचा प्रयत्न केला जात होते, विरोधकाला पुरून उरणारे अजिंक्य ठरले देवेंद्र. विरोधकांचे आव्हान, मोठी संकटे, संघर्षाचा सामना करून स्वराज्याच्या रक्षणासाठी कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्वाच्या यादीत देवेंद्र फडणवीस यांचे नाव सुवर्ण अक्षराने नोंदविले गेले आहे.

**अमोल तपासे**/नागपूर

●● ●●

### निवडणूक आणि ईव्हीएम

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीचा खूप मोठ्या प्रमाणात विजय झाला आणि महाविकास आघाडीचा खूप मोठा पराभव झाला. या आघाडीने आपल्या कर्माचे मूल्यमापन न करता बदनाम केले ईव्हीएमला. आणि जनतेने दिलेला कौल मान्य केला नाही. लोकमताची कदर केली नाही.



ज्यांनी विजय प्राप्त करून दिला त्याची आणि ज्यांनी त्यांना हरवले त्यांची देखील! त्यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये ईव्हीएम नको, मतपत्रिकांवर मतदान घ्या असे आंदोलन केले असते तर त्यांचा प्रामाणिक उद्देश जनतेने मान्य केला असता. आता मतदार जागृत झाले आहे. नाहीतर त्यांनी महायुतीला कशाला निवडून दिले असते? कारण महाविकास आघाडी, त्याचे नेते कसे आहेत, याची त्यांना माहिती होती. या नेते मंडळींच्या मनाच्या मशीनमधून कधी काय बाहेर पडेल काही सांगता येत नाही. राजकीय पक्षाच्या मशीनने लोकशाहीमधील एका चांगल्या मतदान मशीनला बदनाम करण्याचा प्रयत्न चालू केला आहे, ही गोष्ट महाराष्ट्रामधील मतदारांना लक्षात आली आहे. निवडणुकीमध्ये पराभव झाला की आपल्या चुकांचा विचार न करता मशीनमधील चुका शोभून काढून, निवडून आलेल्या राजकीय पक्षाला बदनाम करण्याचे मशीन सुरू करणे आणि लोकशाही प्रदूषित करणे हाच त्याचा प्रयत्न असतो, याची पूर्ण माहिती मतदारांना आहे. आता मतदार अधिक सावध झाले आहेत, असे त्यांच्याशी चर्चा करताना लक्षात येते.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

●● ●●

### एक देश, एक निवडणुकीने मतदानाची टक्केवारी वाढेल

'एक देश एक निवडणूक' या धोरणामुळे मतदानाची टक्केवारी वाढणार आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगर पालिका, विधानसभा, लोकसभा या निवडणुका एकावेळी होतील तेव्हा एकेका बुथवर एका मतदाराकरिता ६ ते ७ ईव्हीएम लावाव्या लागतील. एवढ्या मोठ्या प्रमाणावर मशीनची व्यवस्था करावी लागेल. हे झाले प्रशासनाचे काम. निवडणुकांच्या संदर्भात असा अनुभव आहे की लोकसभा, विधानसभा, या निवडणुकांत पक्षाचा कार्यकर्ता मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करीत नाही, जेव्हा ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगर पालिका या निवडणुका लोकसभा, विधानसभांबरोबर होतील तेव्हा स्थानिक कार्यकर्ता सुद्धा निवडणुकीत उमेदवार असेल त्या परिस्थितीत स्थानिक उमेदवार स्वतः निवडून येण्याकरिता घरोघरी जाऊन मतदार घराबाहेर काढेल आणि मतदान करायला लावेल. अशा स्थितीत मतदान ८५ ते ९० टक्क्यांपर्यंत वाढू शकते. याचा फायदा लोकसभा, विधानसभा यांना नक्की होईल. ▮

**डॉ. जयंत ओक**/९७६४६४८३८३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### उपचारादरम्यान वृद्ध महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि.१३ डिसेंबर-**

राहत्या घरी तोल जाऊन पडल्याने केशरबाई हनुमंत रोकडे (वय ७५, रा. अपसिंगा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांना बारा नोव्हेंबर रोजी उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले होते. मात्र त्यांच्यावर उपचार सुरू असताना १३ नोव्हेंबर रोजी सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास त्यांचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### गळफास घेतलेल्या तरुणाचा उपचारावेळी मृत्यू

**सोलापूर, दि.१३ डिसेंबर-**

वैराग येथील अभिजीत रामभाऊ पतंगे (वय ३१, रा. वैराग, ता. बार्शी) यांनी दहा डिसेंबर रोजी अज्ञात कारणावरून कापडी रेबीनच्या साह्याने लोखंडी अँगलला गळफास घेण्याचा प्रयत्न केला होता. त्याला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले होते. मात्र त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याचा १३ नोव्हेंबर रोजी दीड वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि.१३ डिसेंबर-**

घरी झोपले असताना नातेवाईकांनी उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र तो उठत नसल्याने समशान जेम्स देवनूर (वय ४९, रा. सिद्धेश्वर पेठ) याला बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### फसवून लग्न केल्याच्या आरोपातून प्रकाश जानगवळींची निर्दोष मुक्तता

**सोलापूर, दि.१३ डिसेंबर-**

फसवून लग्न केल्याच्या आरोपातून न्यायालयाने प्रकाश जानगवळींची निर्दोष मुक्तता केली आहे. याबाबत पत्रकार परिषदेत प्रकाश जानगवळी यांनी अधिक माहिती दिली. याप्रकरणी जोडभावी पोलिस स्टेशन येथे गुन्हा प्रकाश महादेव जानगवळी (रा. गवळी वस्ती श्रीदेवी नगर एम आय डी सी सोलापूर) यांच्या विरूद्ध पत्नीनी मिळून दाखल करण्यात आला होता. तीने तीच्या फिर्यादीमध्ये प्रकाश जानगवळी याचे पूर्वी झालेले दोन लग्ने लपवून ठेऊन फसवणूक करून फिर्यादी सुरेखा हिचे बरोबर विवाह करून रक्कम घेतली. रक्कमेची मागणी केली. शारिरीक, मानसिक छळ केला म्हणून जाच हाट आणि फसवणूक केली म्हणून फिर्याद दिलेली होती. पोलिस अधिकारी यांनी गुन्ह्याचा तपास करून कोर्टात दोषारोप पत्र दाखल केले होते. प्रस्तुतचा खटला सुनावणी करीता प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी विनायम रेडकर यांच्या समोर आला असता सरकार तर्फे फिर्यादीचा भाऊ गणेश झारखंडे तीन साक्षीदार व तपास अंमलदार यांना तपासण्यात आले. आरोपीतर्फे वकील ॲड. अजमोद्दीन शेख यांनी फिर्यादीनेच कायदेशीर घटस्फोट न घेता आरोपीची फसवणूक करून लग्न केले आहे. आरोपीने कोर्टातून घटस्फोट मिळवून विवाह केलेला आहे. विवाहपूर्व माहेरच्या लोकांना आरोपी बद्दल माहिती देण्यात आली होती. फिर्यादीस फिर्याद दाखल करण्याचा अधिकार नाही असा युक्तीवाद मांडला असता सुरेखा हिचा पहिला विवाह झालेला होता. त्याच्याशी न्यायालयातून घटस्फोट न घेता आरोपी प्रकाश महादेव जानगवळी यांच्या बरोबर विवाह लावून दिला व तीचा भाऊ यांनी देखील उलट तपासामध्ये फिर्यादीचा कोर्टामार्फत घटस्फोट झालेला नाही असे मान्य केले. फिर्यादी सुरेखा ही कायदेशीर पत्नी होत नसल्याने भा.द.वि कलम ४९८ अ प्रमाणेही दोषी धरता येणार नाही असे मत नोंदवून सोलापूर येथील प्रथम वर्ग न्यायादंडाधिकारी विनायक रेडकर यांनी नोंदवून प्रकाश जानगवळी यांची निर्दोष मुक्तता केली. याकामी ॲड. अजमोद्दीन शेख, ॲड. सैफोद्दीन शेख यांनी काम पाहिले.



### जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी आठ जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

सोलापूर पुनम गेट,जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आंदोलन करण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून परवानगी घेतली नाही, जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी युवा भिमसेनेच्या आठ जणांवर सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. महेंद्र उर्फ महेश विलास डोलारे (रा सरवदे नगर), विकास अमोगसिध्द गायकवाड (रा. कमला नगर), हुसेन सहमीबक्ष बागवान (रा.किसन नगर), जुबेर शफिक शेख (रा अक्कलकोट रोड), संगीता भोसले रा सुतमिल, मल्लु कांबळे (रा मंद्रुप), परशुराम आयगोळे रा मंद्रुप, मुमताज तांबोळी (रा विजापूर रोड)अशी गुन्हा नोंद झालेल्यांची नावे आहेत. युवा भिमसेनेच्यावतीने महिंद्र डोलारे यांच्या नेतृत्वाखाली परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ मुख्यमंत्र्यांचा पुतळा दहन केला. मात्र निषेध आंदोलन करण्यासाठी पोलिस आयुक्तांची परवानगी घेतली नाही. जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले,एकत्रित येवून आंदोलन करून घोषणाबाजी केली. याप्रकरणी झाकीर शेख(नेम सदर बझार)यांनी फिर्याद दिली.निषेध आंदोलन करणाऱ्यांवर भारतीय न्यास संहिता कलम २२३,१८९(२)व पोलिस कायदा कलम १३५प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

## निधन वृत्त...

### डॉ. शिवप्पा अमाणे



**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

शेळगी भागतील डॉ. शिवप्पा जयप्पा अमाणे यांचे वयाच्य ८१ व्या वर्षी अल्पशा आजाराने दि. १३ डिसेंबर रोजी पहाटे साडेपाच वाजता निधन झाले आहे रुद्रभूमी स्मशानभूमी तुळजापूर वेस येथे अंत्यसंस्कार झाले. त्यांनी पंचवीस वर्ष उत्तर कसब्यामध्ये रुग्णांची सेवा केली त्यानंतर १९९२ नंतर शेळगी परिसरात व चंडक हॉस्पिटलमध्ये रुग्णांची सेवा केली. त्यांच्या पश्चात एक मुलगा व दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### रामकृष्ण कैरमकोंडा



**सोलापूर, दि.१३ डिसेंबर-**

जुने विडी घरकुलनजीकच्या पद्मशाली शिक्षक सोसायटीमधील रहिवाशी व कुचन हायस्कूलचे माजी कार्यालय अधीक्षक रामकृष्ण (हरीभाऊ) देविदास कैरमकोंडा (वय ७७) यांचे शुक्रवार, दि. १३ डिसेंबर रोजी दुपारी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, दोन मुले व नातवंडे असा परिवार आहे.

# असंघटित कामगारांच्या नोंदणीसाठी सामाजिक बांधिलकी ठेवून काम करा



### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

कामगार विभाग अंतर्गत कामगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे असंघटित क्षेत्रातील कामगारांची नवीन नोंदणी करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी प्रमुखांनी त्यांच्या विभागाची कामे करणाऱ्या ठेकेदाराच्या तालुका निहाय बैठका घेऊन त्यांच्याकडून कामगारांची संख्या व त्यांची माहिती घ्यावी. जेणेकरून अशा कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देणे सुलभ होणार आहे. सर्व संबंधित विभागांनी सामाजिक बांधिलकी ठेवून या कामाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे नोंदणी करण्याच्या अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत इशाधीन शेळकंदे, सहायक कामगार आयुक्त श्री. गायकवाड, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्ह्यात एकूण बाराशे ठेकेदार असून त्यांच्याकडे हजारोच्या संख्येने कामगार असू शकतात त्या कामगारांची संख्या व माहिती प्रशासनाला उपलब्ध होण्यासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी तालुका व विभाग स्तरावर ठेकेदारांच्या बैठका घेऊन त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करून घ्यावी. संबंधित कामगार आयुष्यमान भारत कार्ड, पोर्टेबल रेशन कार्ड, पीएम जीवन ज्योती बीम योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आदी योजनांचा लाभ घेत आहेत का याची माहिती घ्यावी. जे कामगार योजनांचा लाभ घेत नाहीत अशा सर्व कामगारांना कामगार कल्याण मंडळाच्या संकेतस्थळावर नव्याने नोंदणी करून उपरोक्त योजनेचा लाभ देणे शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्व शासकीय यंत्रणा व सर्व संबंधित ठेकेदार यांनी असंघटित क्षेत्रातील कामगाराप्रती सामाजिक बांधिलकी ठेवून त्यांची माहिती व्यवस्थितपणे एकत्रित करून प्रशासनाला सादर करावी. सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी तालुका व विभाग स्तरावरील बैठकामध्ये उपस्थित राहणाऱ्या ठेकेदार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना कामगारांची संख्या व त्यांची माहिती ही कामगारांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी असल्याचे सुचित करावे. त्यानंतरही जिल्ह्यातील जे ठेकेदार कामगारांची संख्या व माहिती देणार नाहीत अशा ठेकेदाराविरोधात सामाजिक सुरक्षा कायदा २००८ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे निर्देश ही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. प्रारंभी उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठा योजना कार्यालय जिल्हा परिषद यंत्रणा सोलापूर महापालिका सार्वजनिक बांधकाम विभाग नगरपालिका या सर्व यंत्रणांकडे जवळपास १२०० ठेकेदार यांची नोंद आहे व त्यांनी कळविलेली कामगारांची संख्या ३ हजार ७६२ इतकी आहे. परंतु कामगार मंडळाकडे नोंदणीकृत कामगारांची संख्या नगण्य असून सर्व यंत्रणांनी अत्यंत गतीने कामगारांची नोंदणी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणीसाठी कामगारांना बांधकाम कामगार म्हणून ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र तसेच आधार कार्ड महत्त्वाचे असल्याची माहिती कामगार विभागाचे सहाय्यक आयुक्त गायकवाड यांनी दिली.

# पंडीत भिमण्णा जाधव पिता-पुत्रांना सुंद्रीवादनासाठी तानसेन समारोहाचे निमंत्रण

**सोलापूर, दि.१३ डिसेंबर-**

कालजयी संगीत सम्राट तानसेन संगीत समारोहाचे मध्यप्रदेश सरकारकडून पंडीत भिमण्णा जाधव मास्टर व्यंकटेशकुमार यांना सुंद्रीवाद्य वादन करिता निमंत्रण आलेल्याची माहिती जागतीक कीर्तीचे सुंद्रीवादक पंडीत भिमण्णा जाधव यांनी दिली. व्यंकटेशकुमार येथील दमणी विद्या मंदिर येथे इ. ८वी वर्गात शालेय शिक्षण पूर्ण करत आहे.

या समारोहाचे शताब्दी वर्षनिमित्त भारत देश्यातील अनेक कलावंताना निमंत्रीत करण्यात आले आहे. हा समारोह १४ ते १९ डिसेंबर संपन्न होणार आहे पंडीत भिमण्णा जाधव हे सुंद्रीसम्राट पंडित सिद्राम जाधव यांचे नातू तर वडील पंडित चिदानंद जाधव यांचे चिरंजीव होय. वयाच्या ७ व्या वर्षी त्यांनी युवावाणी ऑल इंडिया रेडिओसाठी प्रसारक म्हणून सार्वजनिक पदार्पण केले सोलापूर सुंदरी हे दुर्मिळ आणि अद्वितीय वाद्य आहे. ज्यांचे पालनपोषण शोधण्याचा आणि सामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केवळ जाधव कुटुंबापुरता मर्यादित नाही पंडित भीमण्णा यांनी या वाद्याचा भारताच्या सीमेपलीकडे गौरव केला आहे, त्यांनी फ्रान्स आणि बेल्जियममध्ये आपली कला सादर करून आपल्या कुटुंबाची स्वप्ने साकार केली आहेत.

व्यंकटेशकुमार जाधव गुरुवर्य वडील पंडित भिमण्णा जाधव यांच्याकडून सुंद्री वाद्य वादनाचे प्रशिक्षण घेत आहेत. सुद्रीसम्राट पंडित सिद्राम जाधव यांचे परंतु पंडित





चिदानंद जाधव यांचे नातू जाधव घराण्याची ५वी पिढीतील कलाकार सुंद्रीसारख्या दुर्मिळ वाद्याचा प्रसार करताना व्यंकटेशकुमार आकाशवाणीने दूरदर्शन, भीमपलासी धारवाड, ८५ अखिल भारतीय कन्नड साहित्य संमेलन गुलबर्गा, सुरसिगार संस्था मुंबई, बाल गंधर्व संगीत महोत्सव सोलापूर, संगीत संजे बिजापूर,कलबुर्गी, कल्याण कर्नाटक फेस्टिव्हल,सगीत नाटक अकादेमी आयोजित वर्ल्ड म्युझिक डे फेस्टिव्हल दुर्मिळ समारोह नवी दिल्ली, सुंदरी सम्राट संगीत महोत्सव सोलापूर सगीतभूषण पंडीत राम मराठे सगीत महोत्सव ठाणे, रामकृष्ण आश्रम स्वामी विवेकानंद फेस्टिवल कोलकत्ता,आणि भारतातील विविध राज्ये अनेक म्युझिक वर्कशॉप्स म्युझिक फेस्टिव्हलमध्ये भाग घेतला आहे. भारत सरकारचा मिनिस्ट्री ऑफ कल्चरल माध्यमातून संस्कृतीक स्तोत्र एवं प्रशिक्षण केंद्रचा दुर्मिळ वाद्या करिता भारतातून प्रथम स्कॉलरशिप अवॉर्ड, पदमविभूषण हरिप्रसाद चौरसिया राष्ट्रीय फेलोशिप सन्मान प्राप्त आहे.

# पोलीस आयुक्तालयातील श्वान पथक द्वितीय



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

पुणे येथे राज्य पोलीस कर्तव्य मेळावा स्पर्धेत पोलीस आयुक्तालयातील श्वान पथकाने द्वितीय क्रमांक पटकविला. ''स्नुफी या श्वानास घेवून पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. त्याचा गौरव पोलिस आयुक्तांच्या हस्ते करण्यात आला.

१९ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा, पुणे येथे आयोजित केला होता. या स्पर्धेस पोलीस आयुक्तालय, सोलापूर आस्थापनेवरील ''स्नुफी या श्वानास घेवून पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. या स्पर्धेत श्वान पथकातील ''स्नुफी या श्वानाने ''वस्तुच्या वासावरून गुन्हेगारास शोधून आणणे व वासावरून गुन्हेगाराला ओळखपरेड मध्ये ओळखणे'' या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्र राज्यामध्ये व्दितीय क्रमांक पटकावला आहे. उत्कृष्ट कामगिरी पोलिस आयुक्त राज कुमार, पोलिस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, सहा पोलिस आयुक्त राजन माने, मार्गदर्शनाखाली श्वान पथक लक्ष्मण गणगे, शिवानंद कलशेट्टी व रतन गनुरे यांनी केली आहे.

**CHANGE IN NAME**

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME **TRUPTI ARVINDRAO GIRGAONKAR** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **MANASI MADHAV JOSHI** KINDALY NOTE THE SAME.

**CHANGE IN NAME**

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME **NAZIYA BEGUM SAYYED SHUKUR SHAIKH** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **NAZIYA MAHEBOOB ALI PATHAN** KINDALY NOTE THE SAME.

# वाहनाच्या धडकेत मोटरसायकलस्वार जागीच ठार

**सदाशिवनगर, दि. १३ डिसेंबर-**

चारचाकी वाहनाची जोरदार धडक बसल्याने मोटरसायकलस्वार हेमंत गोविंद फुले (वय १९, रा. दहिगाव) हा ठार झाल्याची घटना आज माळशिरस बायपास रस्त्यावर साठ फाटा नजीक घडली.

याबाबतची हकीकत अशी टाटा जेस्ट कंपनीची लाल रंगाची कार (क्र. एम. एच. १२/ एल. जे. १४३४) ही कार पंढरपूरहून पुण्याकडे भरधाव वेगाने जात असता माळशिरस बायपास येथील अंडरपासवरती हेमंत गोविंद फुले हा आपल्या मोटरससायकल (क्र. एम. एच. ४५/ पी. ४७२२) या मोटरसायकलवरून घरी जात असताना त्यास पाठीमागून जोराची धडक दिली. त्यामध्ये हेमंत फुले हा गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. याबाबत माळशिरस पोलिसात फिर्यादीचे वडील गोविंद भीमराव फुले यांनी दिलेली आहे. मयत हेमंत फुले हा पानीव येथील कॉलेजमध्ये शिक्षण घेत होता.



## लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सोलापूर सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर

### जाहिर प्रकटन क्रमांक. १ सन २०२४

सोलापूर पाटबंधारे विभागाच्या, कार्यक्षेत्रातील खालील प्रकल्पांच्या जलाशय, को.प.बंधारे, नदी, नाले, ओढे वरील मंजूर उपसा परवाना धारकांना उभ्या पिकांना रब्बी हंगाम सन २०२४-२५ करीता पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. इच्छुक लाभधारकांनी विहीत नमुन्यात (नमुना नं.७) पाणी अर्ज दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत आपल्या हद्दीतील शाखा कार्यालयात सादर करण्यात यावी.

**अ) पाणी पुरवठ्याचे लाभक्षेत्राचा तपशील**

| अ. क्र. | प्रकल्पाचे नांव | तालुका | संबधीत शाखा कार्यालयाचे नांव व ठिकाण |
|---|---|---|---|
| अ | मध्यम प्रकल्प | | |
| | १) एकरुख | उत्तर सोलापूर | होटगी पाटबंधारे शाखा, सोलापूर |
| | २) बोरी | अक्कलकोट | बोरी पाटबंधारे शाखा, अक्कलकोट. |
| | ३) जवळगाव | बार्शी | पाटबंधारे शाखा, जवळगाव. |
| | ४) हिंगणी (पा.) | बार्शी | पाटबंधारे शाखा, वैराग. |
| | ५) पिंपळगांव (ढाळे) | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र. २, बार्शी. |
| | ६) मांगी | करमाळा | पाटबंधारे शाखा, क्र.१ करमाळा |
| ब | लघु पाटबंधारे तलाव | | |
| | १) होटगी | द. सोलापूर | होटगी पाटबंधारे शाखा, सोलापूर |
| | २) रामपूर | द. सोलापूर | होटगी पाटबंधारे शाखा, सोलापूर |
| | ३) बीबी दारफळ | उत्तर सोलापूर | होटगी पाटबंधारे शाखा, सोलापूर |
| | ४) हणमगांव | द. सोलापूर | होटगी पाटबंधारे शाखा, सोलापूर |
| | ५) बोरगांव | अक्कलकोट | पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| | ६) भुरीकवठे | अक्कलकोट | पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| | ७) पाथरी | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.१ बार्शी |
| | ८) कोरेगांव | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.१ बार्शी |
| | ९) काटेगांव | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.१ बार्शी |
| | १०) चारे | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.१ बार्शी |
| | ११) वालवड | बाशी | पाटबंधारे शाखा क्र.१ बार्शी |
| | १२) कळंबवाडी | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.१ बार्शी |
| | १३) बाभुळगांव | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.१ बार्शी |
| | १४) ममदापूर | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.२ बार्शी |
| | १५) गोरमाळे | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.२ बार्शी |
| | १६) तावडी | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.२ बार्शी |
| | १७) कारी | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र. २ बार्शी |
| | १८) वैराग | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.२ बार्शी |
| | १९) शेळगांव (आर) | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र. २ बार्शी |
| | २०) राजुरी | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र. २ करमाळा |
| | २१) पारेवाडी | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र.२ करमाळा |
| | २२) वडशिवणे | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र.२ करमाळा |
| | २३) कोंढेज | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र. २ करमाळा |
| | २४) कुंभेज | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र.२ करमाळा |
| | २५) हिंगणी (के) | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र.२ करमाळा |
| | २६) म्हसेवाडी | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र.२ करमाळा |
| | २७) वीट | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र.२ करमाळा |
| क | को.प. बधारे भोगावती नदीवर | | |
| | १) तडवळे | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.२ बार्शी |
| | २) घाणेगांव | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र.२ बार्शी |
| | ३) ईर्ले | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र. २ बार्शी |
| | ४) देगांव | बार्शी | पाटबंधारे शाखा वैराग |
| | ५) डिकसळ | बार्शी | पाटबंधारे शाखा वैराग |
| | ६) भोयरे | बार्शी | पाटबंधारे शाखा वैराग |
| ड | को.प.बंधारे बोरी नदीवरील | | |
| | १) किणी नं.२ | अक्कलकोट | बोरी पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| | २) निमगांव | अक्कलकोट | बोरी पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| | ३) अक्कलकोट | अक्कलकोट | बोरी पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| | ४) मिरजगी | अक्कलकोट | बोरी पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| | ५) संगोळगी | अक्कलकोट | बोरी पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| | ६) सातनदुधणी | अक्कलकोट | बोरी पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| | ७) रुद्देवाडी | अक्कलकोट | बोरी पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| | ८) बबलाद | अक्कलकोट | बोरी पाटबंधारे शाखा, अक्कलकोट |
| ड | को.प. बंधारे सीना नदीवरील | | |
| | १) तरटगांव | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र.१ करमाळा |
| | २) संगोबा | करमाळा | पाटबंधारे शाखा क्र.१ करमाळा |
| इ | नदी व नाले | | |
| | १) एकरुख ओढा | उ. सोलापूर | पाटबंधारे शाखा, होटगी (सोलापूर) |
| | २) सिना नदी | माढा | पाटबंधारे शाखा क्र.१ कुर्डुवाडी |
| | ३) भोगावती नदी | बार्शी | पाटबंधारे शाखा क्र. २ बार्शी |
| | ४) नागझरी नदी | बार्शी | पाटबंधारे शाखा जवळगांव (वैराग) |
| | ५) दारफळ बंद नाला | माढा | पाटबंधारे शाखा क्र.२ कुर्डुवाडी |
| | ६) माढा बेंद नाला | माढा | पाटबंधारे शाखा क्र.२ कुर्डुवाडी |

**ब) पाणी पुरवठयाचे धोरण :-**

१) रब्बी हंगाम सन २०२४-२५ मध्ये हंगामी भुसार पिकांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे.
२) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील उभ्या पिकांना प्राधान्याने हंगामी स्वरुपाने नमुना नंबर ७ वर मंजूर देण्यात येईल. रब्बी हंगामात उपलब्ध पाण्यानुसार शेतीला पाणीपुरवठा करण्यात येईल. परंतु पाणीपुरवठ्या बाबतची हमी देता येणार नाही.

**क) मुख्य अटी व शर्ती :-**

१. पाणी मागणी अर्ज नमुना नंबर. ७ मध्ये ७/१२ उतारा सहीत संबंधीत शाखा अभियंताकडे दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत दिले पाहिजे.
२. ज्या लाभधारकाकडे अद्यावत खाते पुस्तीका आहेत त्यांनी पाणी अर्जातील नोंदी शाखाधिकारी यांच्या कडून तपासून प्रमाणीत करून घ्यावेत.
३. पाणीपट्टी थकबाकीदारानी १/३ थकबाकी व चालू हंगामाची पाणीपट्टी रोखीने भरली पाहिजे.
४. दिनांक ३१/१२/२०२४ नंतर उशिराचे अर्ज एक महिना उशीराचे सव्वापट (१.२५) दराने मंजूर केले जातील व १ महिनापेक्षा जास्त उशिराचे अर्ज दीडपट (१.५०) दराने मंजूर केले जातील.
५. भरणे सोयीचे असले पाहिजे.
६. शेतचारी दुरूस्ती केली असली पाहिजे.
७. मागणी केलेले जमिन वहिवाटीस असली पाहिजे.
८. मागणी क्षेत्र उडाप्याचे नसले पाहिजे.
९. पाणी परवान्याची मुदत संपलेली असल्यास त्याचे नुतनीकरण करून घेतले असले पाहिजे.
१०. चालू हंगामातील नगदी पिकांचा अर्ज भरल्यास त्याचा रोख भरणा केला पाहिजे.
११. पाटमोट संबंध नसावा.

वरीलपैकी ज्या प्रकल्पामध्ये सिंचनासाठी समाधानकारक उपलब्ध पाणीसाठा असेल त्या प्रकल्पावरील पाणी अर्ज मंजूर करण्यात येतील.

वरील धोरणानुसार व शर्ती नुसार पाण्याचे पास धारण करूनच पाण्याचा वापर नियमाप्रमाणे करणे बंधनकारक राहील. कोणत्याही प्रकारे जोपासलेली अनधिकृत पिके शासन नियमा नुसार दंडनीय आकारणीस पात्र राहतील व त्याचे पंचनामे प्रत्येक पाणी पाळीत केले जातील तेंव्हा पासा खेरीज पाणी घेऊ नये. कोणत्याही नैसर्गीक अथवा अनैसर्गीक कारणाने पाणी पुरवठा खंडीत झाल्यास अथवा मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडून प्रकल्पामधील पाणी पिण्यासाठी आरक्षण केल्यास या कार्यालयाकडून कोणतीही पुर्व सुचना न देता पाणी पुरवठा खंडीत करण्यात येईल. त्यामुळे पिकाचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई मिळणार नाही. तसेच ज्या प्रकल्पावर सिंचना करीता पाणी उपलब्ध नाही अशा प्रकल्पा वरील नमुना नंबर.७ चे पाणी अर्ज स्विकारले जाणार नाहीत. परंतू रब्बी हंगामात पाऊस पडून पाणीसाठा प्राप्त झाला तर संबंधीत तलावावर उशीराचे म्हणून पाणी अर्ज स्विकारण्याचा विचार होऊ शकेल.

तरी सर्व प्रकल्पा वरील व सिंचन विभागाच्या कक्षेतील लाभधारकांनी वेळेवर पाणी अर्ज भरून सहकार्य करावे ही विनंती.

जा.क्र.सोपावि/सिंचन/३७३४/सन २०२४
सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर
दिनांक : ०९/१२/२०२४.

शिक्का

सही/- (मो.ता.जाधवर)
कार्यकारी अभियंता,
सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर.

विमाका-पुणे-जाहि-२८९-२०२४-२५



# कृषी विशेष...



शनिवार, १४ डिसेंबर २०२४

सोलापूर तरुण भारत

www.tarunbharat.org

## कृषी पुरवणी विषयी जाहीर आवाहन

दैनिक तरुण भारतच्या तमाम वाचकांना दर शनिवारी आम्ही कृषी विशेष पुरवणी देत आहोत. आपल्या भागातील कोणत्याही शेतकऱ्यांनी वैशिष्ट्येपूर्ण आणि अत्याधुनिक पध्दतीने शेती केली असल्यास त्यांची 'यशस्वी गाथा' आणि आपले लेख, कविताही या पुरवणीद्वारे विनामुल्य प्रकाशित करु.

दैनिक तरूण भारत / पुरवणी संयोजक
मो. नं. ९४२११८७६३४०




**विशेष मुलाखत/ अविनाश गायकवाड**

**शेतकरी बांधवांच्या आर्थिक उन्नतीसाठी १९३३ साली सोलापुरात कोरडवाहू संशोधन केंद्राची निर्मिती इंग्रज सरकारनेच केली होती. त्यांनी निर्माण केलेल्या केंद्रात भरीव अशी सुधारणा करून काही शेती संशोधक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आणि आजतागायत अनेक वाणांचे संशोधन या केंद्रातून झाले असून, शेतकरीभिमुख संशोधन करणे हेच आमचे ध्येय असल्याची स्पष्टोक्ती सोलापूर येथील विभागीय कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ तथा सहयोगी संशोधन संचालक डॉ. नितीनकुमार रणशूर यांनी खास दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना आज (दि. १४) दिली.**

# 'शेतकरीभिमुख संशोधन' हेच आमचे ध्येय!



सोलापुरातील या कोरडवाहू संशोधन केंद्राविषयी विस्तारीत माहिती देताना डॉ. रणशूर म्हणाले की, आपल्या सोलापुरातील या कोरडवाहू संशोधन केंद्राकडे ५६ हेक्टर क्षेत्र आहे. तर याच केंद्राच्या अधिपत्याखाली जेऊर, मोहोळ, पंढरपूर येथेही कोरडवाहू संशोधन केंद्रांची निर्मिती केली आहे. या सर्व केंद्राद्वारे विविध वाणांचे संशोधन केले जाते. इतकेच नाहीतर अवघ्या राज्यातील कोणत्याही जिल्ह्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठाद्वारे संशोधित केलेल्या वाणांची प्रस्तावित माहिती आपल्या केंद्राद्वारेच शासनाकडे पाठविली जाते. यामुळे संपूर्ण राज्याचे कोरडवाहू समन्वयक म्हणून आपल्या सोलापूर येथील केंद्राकडे पाहिले जाते.

सोलापुरातील या कोरडवाहू संशोधन केंद्राद्वारे राष्ट्रीय पातळीवरील ३ योजना राबविल्या जातात. यामध्ये अखिल भारतीय समन्वयित कोरडवाहू कृषी संशोधन प्रकल्प, अखिल भारतीय समन्वयित कोरडवाहू कृषी हवामान शास्त्र प्रकल्प आणि अखिल भारतीय समन्वयित कोरडवाहू करडई संशोधन प्रकल्प राबविले जातात. यातील कृषी संशोधन प्रकल्पाद्वारे मृदविज्ञान, कृषीविद्या आणि कृषी अभियांत्रिकीचे नियोजन करण्यात आले आहे. तर कृषी हवामान शास्त्राद्वारे राज्यातील रोजच्या हवामानाचा बळीराजाच्या उत्पादित होणाऱ्या पिकांवरील परिणाम आणि त्यांनी करावयाच्या उपाययोजना याबाबत नोंदी घेवून याचे अहवाल शासनाच्या कृषी विभागाकडे पाठविले जातात; म्हणजेच कृषी सल्ला दिला जातो. तर करडईचे सखोल संशोधन करून त्याचे विकसित वाण, शेतकऱ्यांना करडईचे दर्जेदार उत्पन्न कसे घेता येईल, फळबागा, पीक संरक्षणाबाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविण्यात येतो. शासन संबंधित कृषी विभागामार्फत पुढील नियोजन करते आणि नवनवे वाण विकसित होतात.

### नाविण्यपूर्ण अन् अती उत्पादित बियाणांची निर्मिती

राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या दहा जिल्ह्यांत विस्तारलेले आहे. कृषी विद्यापीठाचे प्रमुख उद्दिष्ट कृषीशिक्षण, कृषीसंशोधन आणि कृषीविस्तार कार्य आहे. कृषी साक्षरतेसाठी विद्यापीठामार्फत कृषी पदविका, कृषी पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवीचे शिक्षण दिले जाते.शेतीशी निगडित संशोधन करण्यासाठी विद्यापीठाची २८ संशोधन केंद्रे आहेत. विद्यापीठाने अन्नधान्य, फळे-फुले, चारा-पिके यांचे २०० पेक्षा जास्त वाण विकसित केले असून, मृद् व जलसंधारण, पीक लागवड पद्धती यांविषयी सखोल संशोधन करून १००० पेक्षा अधिक महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. राज्यातील या नवनव्या संशोधनाच्या शिफारसी आमच्या कार्यालयामार्फत हैद्राबाद येथील सेंट्रल रिसर्च इस्टिट्युट ऑफ ड्राय लॅन्ड अॅग्रीकल्चर या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविले जातात. त्यांच्याकडून हे अहवाल दिल्ली येथील मुख्य कार्यालयाकडे जातात आणि त्यानंतर केंद्रीय आणि राज्यस्तरीय कृषी विभाग या वाणांना म्हणजेच नवनिर्माणाचा प्रचार, प्रसार करतात.

### विद्यापीठांचे पिकांचे विविध वाण देशातील शेतकऱ्यांमध्ये प्रचलित

राहूल कृषी विद्यापीठाने विकसित केलेले विविध पिकांचे वाण संपूर्ण देशातील शेतकऱ्यांमध्ये प्रचलित आहेत. फुले २६५ या उसाच्या वाणाने उत्पादनाचे नवे उच्चांक गाठले असून क्षारयुक्त जमिनीत ते शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न देत आहे. गव्हाचे त्रिबक, नेत्रावती हे वाण, ज्वारीचे रेवती, चित्रा, सुचित्रा हे वाण, कोरडवाहू फळबागांसाठी वरदान ठरलेला आंब्याचा केशर वाण यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. हरभऱ्याच्या विजय, विशाल, दिग्विजय, विराट या वाणांनी देशातील शेतकऱ्यांची मने जिंकली आहेत. फुले त्रिवेणी या संकरित गायीत दुसरी धवलक्रांती आणण्याची ताकद आहे. बदलते हवामान, जैविक-अजैविक ताण, पाणीटंचाई या दरवर्षी निर्माण होणाऱ्या समस्यांवर संशोधन करून विद्यापीठ त्यांचे निष्कर्ष वेळोवेळी शेतकऱ्यांसाठी प्रसिद्ध करते. विस्तार शिक्षण संचालनालयामार्फत दरवर्षी विद्यापीठ आपल्या कार्यक्षेत्रात शेतकरी, कृषी अधिकारी आदींसाठी विविध प्रशिक्षण वर्ग, शेतकरी मेळावे, प्रात्यक्षिके यांचे आयोजन करते. याव्यतिरिक्त आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्रे, मासिके आदींमधून हंगामनिहाय, क्षेत्रनिहाय, शेतीविषयक तंत्रज्ञान व विविध कार्यक्रम प्रसारित करते. या फायदा कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांना आणि विशेषत: शेतकरी बांधवांना होतो.

# रब्बी पेरणी लांबल्याने गहू, हरभरा, मका पेरा वाढला

- ज्वारीचा टक्का यंदा कमी मात्र निघणार भरघोस उत्पन्न
- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांचा निर्वाळा
- जिल्ह्यात १०० टक्केच्याही वर होणार रब्बीचा पेरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

'ज्वारीचे कोठार' म्हणून ओळख असलेल्या मंगळवेढ्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात यंदा लांबलेल्या पावसामुळे ज्वारीची पेरणी ७३ टक्के एवढीच झाली असली तरीही यंदा मुबलक पाऊस झाल्याने ज्वारीचे उत्पन्न भरघोस निघणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली. तर जिल्ह्यात यंदा गहू, हरभरा, ऊस आणि फळबागांचे प्रमाण वाढले असून, यंदा अजूनही काही तालुक्यात पेरण्या सुरुच असल्याने सरासरीच्या १०० टक्के क्षेत्रावर पेरण्या होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरवर्षी मंगळवेढा तालुक्यात ज्वारीची पेरणी मोठ्या प्रमाणात असते. यंदा परतीच्या पावसाचा मुक्काम वाढल्याने ही पेरणी कमी झाली आहे. मात्र त्या बदल्यात शेतकऱ्यांनी गहू, हरभरा पेरणी अधिकची केली आहे. कारण ज्वारीची पेरणी नोव्हेंबर अखेरपर्यंतच करतात मात्र गहू, हरभरा डिसेंबर एन्डपर्यंत पेरतात. तर चोहीकडे पाणीच पाणी असल्याने यंदा ऊस आणि फळबागांचे क्षेत्रही वाढले आहे. ऊस वाढल्याने आगामी वर्षात साखर कारखाने मोठ्या क्षमतेने आणि दीर्घकाळ चालणार आहेत.

तसं तर मंगळवेढ्याच्या मालदांडी ज्वारीची खमंग, खरपूस अशी भाकरी घास मोडल्याबरोबर तोंडात विरघळते. देशभर मागणी असलेल्या या ज्वारीला यापूर्वीच जीआय मानांकन मिळाले आहे. मुबलक प्रमाणात उत्पादन होणारी येथील ज्वारी केवळ भाकरी आणि खुसखुशीत हुरड्यापुरती नाही, तर त्यापासून अन्य उपपदार्थांसाठी नावारूपाला आली आहे. याच धर्तीवर भूम तालुक्यातील माणकेश्वर पट्ट्यातील ज्वारीची मागणीही सध्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मंगळवेढ्याप्रमाणेच माणकेश्वर पट्ट्यातील ज्वारी देशासह विदेशातही निर्यात होते.



या दोन्ही भागात जमिनीचा पट्टा सपाट, कसदार, पूर्णतः खोलवर काळ्याभोर मातीचा आहे. थोड्याशा पावसाने येथे ज्वारीचे उत्पादन भरघोस मिळते. रब्बी हंगामात आपल्या जिल्ह्यातील केवळ मंगळवेढा तालुक्यात ज्वारीचे सरासरी पेरणी क्षेत्र ३० हजार हेक्टरपर्यंत आहे. परंतु यंदा परतीचा पाऊस मोठ्या प्रमाणात पडला आणि यामुळे जमिनीचा वापसाच झाला नाही. त्यामुळे उशिरापर्यंत शेतात वापसा तयार न झाल्यामुळे ज्वारीची पेरणी अनेक दिवस खोळंबून राहिली. ऑक्टोबरपर्यंत केवळ ३० टक्क्यांपर्यंत पेरणी झाली. त्यानंतर उशिराने का होईना शेतकऱ्यांनी ज्वारीची पेरणी केली. यामुळे पेरणीचा टक्का वाढला.

आपल्या जिल्ह्यात खरीप हंगाम संपताच साधारणतः सप्टेंबर ते नोव्हेंबरच्या प ह ि ल य ा आठवड्यापर्यंत रब्बी ज्वारीची पेरणी होते. तर जानेवारीमध्ये शेतात हुरडा तयार होतो. हुरड्याचा हंगाम संपताच परिपक्व झालेल्या ज्वारीची काढणी होते. तथापि, यंदा लांबलेल्या पावसाबरोबरच वाढलेली शेतमजुरी, बी-बियाणे-पेरणीचा वाढलेला खर्च, आंतर मशागतीचा खर्च आणि मालाला हमीभाव नसल्यामुळे या भागातील शेतकरीवर्गात शेती कशी करावी, असा यक्षप्रश्न आहे.

सोलापूर जिल्ह्यात खरीप हंगामात ज्वारीचे सरासरी क्षेत्र तीन लाख १८ हजार ५७ हेक्टर एवढे असून, त्यांपैकी २ लाख ३७ हजार १४१ हेक्टर क्षेत्रात (७३.५३ टक्के) ज्वारीचा ७५ टक्के पेरा झाला आहे. तर गव्हाचे क्षेत्र सरासरी ४२ हजार ५८८ इतके असते तर यंदा ४३ हजार ४८५ हेक्टर म्हणजे १०२ टक्के पेरणी झाली आहे. जिल्ह्यात मका क्षेत्र सरासरी ३६ हजार ४९३ हेक्टर असते तर मका पेरणी ५६ हजार०२१ हेक्टर क्षेत्रावर १५४ टक्के पेरणी झाली आहे. तर रब्बी तृणधान्य सरासरीच्या १८ टक्के पेरा झाला आहे. हरभरा पिकाचे क्षेत्र ५९४१२ हेक्टर असते तर यंदा ६१ हजार ९३५ हेक्टरवर १०४ टक्के पेरणी झाली आहे. करडई पिकाचे जिल्ह्यात १२१५ हेक्टरवर पेरणी झाली असून, ही पेरणी सरासरीच्या ६० टक्केच आहे. जवस ४३ हेक्टरवर पेरणी झाली आहे. तीळ १२ हेक्टर, सुर्यफुल १६ हेक्टरवर पेरणी झाली आहे.

### आजतागायत सरासरीच्या ८७ टक्के रब्बी पेरणी

जिल्ह्यात रब्बी हंगामासाठी ४ लाख ६० हजार ९१८ हेक्टर इतके सरासरी क्षेत्र असून, या पैकी ४ लाख ४३२ हेक्टर क्षेत्रावर सरासरीच्या ८७ टक्के पेरणी झाली आहे. तालुकानिहाय ही पेरणी पाहिली तर उत्तर सोलापूर ९३.७१ टक्के, द. सोलापूर ८५.१३, बार्शी ११२.२९, अक्कलकोट ९०.३७, मोहोळ ६७.६, माढा ७६.९८, करमाळा ५९.७२, पंढरपूर ९६.७३, सांगोला ९२ टक्के, माळशिरस ९२.१४ आणि मंगळवेढा ९९.२५ टक्के इतकी पेरणी झाली आहे.



# कृषी संशोधन केंद्रात जागतिक मृदा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत विभागीय कृषी संशोधन केंद्र,सोलापूर येथे जागतिक मृदा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त चालू वर्षाच्या मृदा दिन संकल्पनेच्या अनुषंगाने मातीची काळजी: मोजमाप, निरीक्षण,व्यवस्थापन या विषयावर जनजागृती करण्यासाठी सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी संशोधन केंद्रातील कर्मचारी व वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषी तंत्र विद्यालय सोलापूर येथील विद्यार्थी व शिक्षक वृंद तसेच दयानंद कॉलेज सोलापूर येथील प्राणीशास्त्र विषयाचे विद्यार्थी व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नितीनकुमार रणशूर, प्रमुख शास्त्रज्ञ व सहयोगी संशोधन संचालक, सोलापूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जागतिक मृदा दिन साजरा करण्याची पार्श्वभूमी, अन्नसुरक्षेमध्ये मृदेचे महत्त्व, जमिनीचा सर्वांगीण विकास होण्याकरिता आणि जमिनीची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी एकात्मिक अन्नद्रव्यवस्थापन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

दरम्यान, जमिनी खराब होण्याची जी दोन महत्त्वाचे कारणे आहेत त्यामध्ये पाण्याचा अतिवापर व असंतुलित खतांचा वापर याविषयी माहिती दिली. तसेच डॉ. रणशूर यांनी संतुलित खत वापरासाठी माती परीक्षण करूनच पिकास खते द्यावीत, जेणे करून जमिन खराब होणार नाही असे प्रतिपादन केले. डॉ. प्रशांत पवार यांनी शेतीसाठी हरितक्रांतीमध्ये जमिनीचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. सुहास उपाध्ये यांनी जल व मृदेचे संवर्धन, जमिनीची धूप कशी थांबवावी, जमिनीच्या धूप होण्याच्या विविध प्रकारांची सविस्तर माहिती देऊन जमिनीची धूप पावसाच्या एका थेंबापासून चालू होऊन नाल्या काठच्या धूतीपर्यंत कशी पोहोचते याविषयी सविस्तर माहिती दिली. वाहणाऱ्या माती व पाण्याबरोबर अनेक अन्नद्रव्ये वाहून गेल्यामुळे जमिनीचा सुपीकता नष्ट होते म्हणून आपण जमिनीची होणारी धूप थांबविली पाहिजे व पडणारे पावसाचे पाणी जमिनीत साठविले पाहिजे, असे सांगितले. डॉ. शशीशेखर खडतरे यांनी नैसर्गिक साधनांचा वापर करून मृदेचे जतन कसे करावे याबद्दल आपले विचार मांडले. तसेच डॉ. सुभाष घाडगे यांनी जमिनीची सुपीकता टिकविणेसाठी काय उपाय योजना कराव्यात याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सेवानिवृत्त प्राध्यापक व सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ, डॉ. देवेंद्रप्पा इंडी यांनी माती व सूक्ष्मजीव यांचा संबंध या विषयावर उपस्थिताना माहिती देताना जमिनीच्या सुपीकतेमध्ये जैविक घटकांचे महत्त्व स्पष्ट केले. सूत्रसंचालन डॉ. अर्चना पवार, मृदा पदार्थ विज्ञानवेत्ता यांनी केले तर भानुदास राठोड यांनी आभार मानले.

# अवकाळी जोरात बरसला तरच द्राक्षबागांना फटका



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

मागील आठवड्यात दोन-चार दिवस पावसाळी वातावरण तयार झाल्याने जिल्ह्यातील द्राक्ष बागायतदार शेतकरी चिंताग्रस्त झाल्याचे दिसून येत होते. दरम्यान, अशा येणाऱ्या आभाळामुळे अवकाळी पाऊस झाला तर हा पाऊस ज्वारी, गहू, मका पिकासाठी पोषकच असून, द्राक्ष बागांसाठी व इतर फळबागांसाठी मारक असल्याचे सांगण्यात येत आहे. कारण ऐन बागांच्या बहरात अवकाळीचा मोठा पाऊस पडला तर द्राक्ष बागांची मोठी हानी होण्याची भीती जाणकार शेतकरी वर्तवित होते. मात्र, शहर-जिल्ह्यात अवकाळी पावसाच्या हलक्या सरी पडून पुन्हा गुलाबी थंडी सुरू झाली असल्याने बागायतदार शेतकऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

मध्यंतरी तयार झालेले ढगाळी वातावरण द्राक्ष, हरभऱ्याला घातक तर ज्वारी, गहू, मका या पिकांसाठी पोषक असल्याचे सांगण्यात येते. यावेळी मोठा पाऊस पडण्याचा इशाराही हवामान विभागाकडून देण्यात आला होता. त्यावेळी तापमानाचा पारा १४.६ सेल्सियसच्या घरात आला होता. आभाळ रोजच येवू लागल्याने अक्षरशः थंडी गायब झाल्याचे चित्र दिसून येत होते.

या ढगाळी वातावरणामुळे थंडी गायब झाली असून, पुन्हा पंखा लावून झोपायची वेळ शहर, जिल्हा वासीयांवर आली होती. शेतकऱ्यांनी द्राक्ष बागेची ऑक्टोबर छाटणी केली होती. बागेमध्ये घड तयार व्हायला सुरुवात झाली होती. या ढगाळ वातावरणामुळे तयार होत असलेल्या बारीक मन्यामध्ये कूज अर्थात मर हा रोग निर्माण होतो. हरभऱ्यावर घाटा अळीचा प्रादुर्भाव वाढतो, असे शेतकऱ्यांतून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, अशा पावसामुळे ज्वारी, हरभरा, गहू आदी पिकांना फायदाही होणार असल्याचे सांगण्यात येते.

# राज्यांतर्गत पीक स्पर्धेमुळे उत्पन्नात होते भरीव वाढ

- ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत
- शेतकऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

राज्यात पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग होऊन उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमदीने नवनवीन, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. रब्बी हंगाम सन २०२४ पीक स्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यांनी केले आहे.

कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पीकस्पर्धेसाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पिकांसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२४ आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.३०० व आदिवासी गटासाठी रक्कम रु. १५० राहील. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वत: कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. तसेच पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकास शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.



### ५० हजाराचे पहिले बक्षीस

**सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी पीक निहाय राज्य पातळी प्रथम क्रमांक ५०००० रुपये, द्वितीय क्रमांक ४०००० रुपये, तृतीय क्रमांक ३००००, जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक १०००० रुपये, द्वितीय क्रमांक ७००० रुपये, तृतीय क्रमांक ५०००, व तालुका पातळीवरील प्रथम क्रमांक ५००० रुपये, द्वितीय क्रमांक ३००० रुपये, तृतीय क्रमांक २००० रुपये असे बक्षिसाचे स्वरुप राहणार आहे.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



## निसर्गसेवा फाउंडेशन 'एक थैली एक थाळी' आवाहनास प्रतिसाद

**अक्कलकोट, दि. १३ डिसेंबर-**

पर्यावरण संरक्षण गतिविधि व निसर्गसेवा फाउंडेशन अक्कलकोट यांच्यामार्फत १३ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या हिंदू समाजाच्या कुंभमेळ्या साठी पर्यावरण गतिविधिमार्फत 'एक थैली एक थाळी' असे आवाहन करण्यात आले होते या आव्हानाला प्रतिसाद म्हणून सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. अक्कलकोट येथे श्री वटवृक्ष स्वामी समर्थ मंदीर समितीकडून कुंभमेळ्यासाठी थैली व थाळी श्री स्वामी समर्थ वटवृक्ष समिती अध्यक्ष महेश इंगळे यांनी पर्यावरण गतिविधि यांना सुपूर्द केले. यावेळी सोलापूर जिल्हा पर्यावरण धार्मिक मंडळ सदस्य महेश वागदारे, ग्राम विकास जिल्हा मंडळ सदस्य संदीप कटकदौंड, मल्लामा पसारे, सुशील हिरस्कर, पर्यावरण समिती पालक तम्मामामा शेळके, छत्रपती शिवाजी महाराज समिती संस्थापक अध्यक्ष मंडळ अक्कलकोट आनंद खजूरगीकर, निसर्ग फाउंडेशन तालुका पर्यावरण संयोजक सुनील बिराजदार, सहसंयोजक विद्याधर गुरव, श्री. देवरमनी, श्री. लोकपूरे ऋषिकेश लोणारी आदी उपस्थित होते.



## सांगोल्यातील उत्कर्ष प्राथमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात


**सांगोला, दि.१३ डिसेंबर-**

आपल्या मराठी संस्कृतीचा वारसा जपणारे मराठी महिने व त्यातील सण यावर आधारित नृत्य प्रकारांचे दमदार सादरीकरण करून सांगोल्यातील उत्कर्ष प्राथमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. मराठी नववर्षाची चैत्राची गुढी उभारून वैशाखा जोतिबाचा चांगभलं करून गुलाल खोबरं उधळून इयत्ता पहिलीच्या मुलांनी प्रत्यक्ष ज्योतिबाचे दर्शन त्यांच्या नृत्यातून घडविले. जेष्ठात मृग नक्षत्राची पेरणी करायला कुऱ्या रानात गेल्या, त्याचबरोबर आनंदाची विठुलाची आषाढी वारी साधुसंतांची शिकवण गुरु शिष्यांची ओळख दाखवणारी गुरुपौर्णिमा इयत्ता दुसरीच्या मुलांनी त्यांच्या नृत्यातून घडवले. श्रावणाची सर व दहीहंडी फोडायला येणारा गोविंदा, बहिण भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेली राखी पौर्णिमा, तोच भाद्रपदातील श्री गणेश बाप्पांचे आगमन डम डम डमरू वाजे या नृत्याने जल्लोष निर्माण केला. अश्विन मासात येणारी अंबाबाई माऊलीचा इयत्ता तिसरीच्या आराधी वेशभूषेत असलेल्या मुलांनी गोंधळ घातला. कार्तिक मासात दिवाळीचा दीपोत्सव, मार्गशीर्ष महिन्यात गड जेजुरीचा राजा श्री खंडेरायाचा येळकोट येळकोट जय मल्हार म्हणत आई जगदंबे या गीताने देवीची नऊ रूपे नृत्यातून साकारली. माघ महिन्यातील श्री शंकराला योगा व सूर्यनमस्कारातून इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी वंदन केले. कार्यक्रमाचा शेवट फाल्गुन महिन्यातील रंगाची उधळण करत मराठी वर्षाला निरोप देऊन नववर्षाला सज्ज झाला. यावेळी प्रबोधनपर व इंग्रजी नाटिका सादर करून भाषेवरील प्रेम दाखवण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे निवेदन मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे व शुभांगी कवठेकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी आणि विश्रांती मागाडे यांनी केले.

## नातेपुते येथे श्रीदत्त प्रतिष्ठानच्या वतीने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**नातेपुते, दि. १३ डिसेंबा-**

नातेपुते येथील श्रीदत्त प्रतिष्ठानच्या वतीने श्री दत्त जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाच्या वर्षी या उत्सवाला ३० वर्ष पूर्ण होत आहेत. नातेपुते येथील श्रीपर्वतेश्वर मंदिर येथे दत्त मंदिरात श्रीदत्त जयंती सोहळा दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जाणारा असल्याची माहिती श्रीदत्त प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आली, मार्गशीर्ष पौर्णिमा शनिवार दि, १४ डिसेंबर रोजी पहाटे श्री चरणी महाअभिषेक दुपारी आरती सायं ४ ते ६ यावेळेत फुलांचे किर्तन हभप भाऊसाहेब महाराज कदम भिसे यांचे होऊन किर्तन नंतर महाप्रसाद होईल तरी सर्व भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आहवान श्रीदत्त प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.




## तडवळ येथील ओंकार कारखाना अन् शेतकऱ्यांमध्ये अखेर समेट

**अक्कलकोट, दि.१२ डिसेंबर-**

तालुक्यातील तडवळ येथील ओंकार साखर कारखाना आणि शेतकरीमध्ये एफआरपी ३५०० रुपयाप्रमाणे उसाचे बील देण्याबाबत चालू असलेला संघर्ष अखेर दक्षिण पोलिसांच्या मध्यस्थीने मिटला. येत्या दहा दिवसांत बिलाचे योग्य दर जाहीर करण्याची हमी कारखान्याकडून देण्यात आल्याने शेतकऱ्यांनी तात्पुरते आंदोलन स्थगित केले आहे. सोलापूर जिल्ह्यातील विठ्ठल सहकारी कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी ऊसाचे दर ३,५०० रुपयांप्रमाणे जाहीर केले आहे. पहिली उचल एक रक्कमी देण्याचे कबूल केले आहे. त्याप्रमाणे ओंकार साखर कारखान्यांनी ३,५०० रुपये दर तात्काळ जाहीर करावे. तालुक्यातील शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवून शेतकऱ्याला चालू गळीत हंगामातील ऊस बील एफआरपीप्रमाणे ३,५०० रुपये जाहीर करावे. अन्यथा ओंकार कारखाना बंद पाडून आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे व शेतकऱ्यांनी दिला आहे.

# संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना; देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

### सर्वत्र जाहीर निषेध; वंचित बहुजन आघाडी, रिपाइंसह अन्य संघटना, पदाधिकाऱ्यांची प्रशासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

परभणी शहरातील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर संविधानाच्या प्रतिकृतीची माथेफिरूने तोडफोड केल्याची घटना दहा डिसेंबरला घडलेली होती. या घटनेचा सर्वत्र निषेध व्यक्त करण्यात येत असून, वंचित बहुजन आघाडी, रिपाइंसह अन्य संघटना आणि पक्षांच्या वतीने निवेदनाद्वारे आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### रिपाइं, अक्कलकोट

**अक्कलकोट :** परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधानच्या विठबांना करणाऱ्या आरोपी व त्यांच्या मागच्या सूत्रधाराना शोधून कडक कारवाई करण्यात यावे, अन्यथा रिपाइंच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा अविनाश मडिखांबे व त्यांचे सहकारी एका निवेदनाद्वारे तहसीलदार मगर यांना दिले आहे. मागणीचे निवेदन तहसिलदार विनायक मगर यांना देण्यात आले.



यावेळी रिपाइं आठवले अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, रिपाइं सोलापूर जिल्हा युवक आघाडी सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरू, रिपाइं आठवले अक्कलकोट शहर अध्यक्ष अजय मुकणार, शहार सरचिटणीस शुभम मडिखांबे, शहर उपाध्यक्ष सुरेश सोनकांबळे, सुरेश गायकवाड, शहर संघटन सचिव अंबादास शिंगे, तालुका सरचिटणीस राजु भगळे, युवक तालुका सरचिटणीस तमा धसाडे, तालुका कोशाध्यक्ष अंबादास गायकवाड, विलास गायकवाड, तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे, यमनाप्पा शिंगे, शरणु बनसोडे,सुरज सोनके, शिवानंद धोडमनी, कटय्याप्पा मणुरे, आदेवाडी सरपंच रमेश दोडमनी, संगोळगी सरपंच बसवराज निम्मे, गवळी, दत्ता मडिखांबे, भारत सोनकांबळे, विजकुमार बाळशंकर, रोमित मडिखांबे, नितेश मडिखांबे, विजय मडिखांबे, नागेश मडिखांबे, विक्रम सोनकांबळे, अजय मडिखांबे, तानाजी मडिखांबे, दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, महेदिमिया जिडगे, लक्ष्मण निंबाळ, उमेश शिवशरण, सुनिल मनिकडे, राजु गायकवाड, महीबुब शेख, नागेश मडिखांबे, आशीष दांगोलिकर, राजु शिंदे, निंगप्पा निबळसह इतर पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### बहुजन वंचित आघाडी, बार्शी

**बार्शी :** परभणी जिल्ह्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या व्यक्तीवर देशद्रोहाचा गुन्हा व कठोर कारवाई करुन या घटनेमागे असलेल्या खऱ्या मास्टरमाईंडचा शोध घेण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. विवेक गजशिव यांनी तहसीलदार एफ.आर. शेख यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. या निवेदनात ॲड. गजशिव यांनी या मागील खऱ्या सूत्रधाराचा शोध घ्या व संबंधित विटंबना करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करा. महाराष्ट्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे असणाऱ्या ठिकाणी सुरक्षा वाढवा, असे प्रकार आम्ही यापुढे खपवून घेणार नाही, असा इशारा दिला. यावेळी रोहित बोकेफोडे, तालुका उपाध्यक्ष भैरवनाथ शिंदे, स्वप्निल लंकेश्वर, तालुका महासचिव शशिकांत पाचकुडवे, सुरज भालशंकर, ॲ. स्वप्निल खंडागळे, ॲड. जगदीश दगडे, ॲ. कपिल भोसले, ॲड शुभांगी गायकवाड, वामन आहिरे, मोहसीन तांबोळी, निलेश मस्के, अरबाज शेख, इब्राहिम शेख, निलेश शिंदे, गणेश वाघमारे, आनंद ननवरे, लक्ष्मण पालके, अश्वकुमार अहिरे आदी उपस्थित होते.

### वंचित बहुजन आघाडी, अक्कलकोट

**अक्कलकोट :** परभणी जिल्ह्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या शेजारी असलेल्या संविधान शिल्पाची काही जातीयवादी समाजकंटकांनी तोडफोड करण्यात आली होती परभणीच्या कार्यकर्त्यांनी त्या आरोपीस पकडून प्रशासनाच्या हवाली दिल्यानंतर त्या घटनेच्या निषेधार्थ परभणी जिल्हा आंबेडकर याच्या वतीने मोठ्या प्रमाणात मोर्चा निघाला आणि सदर संविधानशील फोडणाऱ्या व्यक्तीच्या पाठीमागे षडयंत्र करणारा कोण आहे त्याला अटक करा, अशी मागणी तिथल्या समुदायाची आहे. सोलापूर वंचित बहुजन आघाडी शहर व जिल्ह्याच्या वतीने आंबेडकरी जनतेवर खोटा गुन्हा दाखल केला तो तुरंत वापस करून घ्यावा,, संविधान शिल्प तोडणार याचा केस फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालावा,, या पाठीमागे जे कोणी षडयंत्र रचलेला आहे त्याला सुद्धा तुरंत



अटक करावा अशा पद्धतीच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांच्या नेतृत्वाखाली माननीय जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना निवेदन ण्यात आला. याप्रसंगी शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार जिल्हा महासचिव अनिरुद्ध वाघमारे शहर सचिव विनोद इंगळे,, उत्तर तालुका अध्यक्ष जालिंदर चंदनशिवे, दक्षिण तालुका अध्यक्ष सुरेश देशमुख, दक्षिण युवक आघाडी तालुकाध्यक्ष अमर दुरके, सोलापूर लोकसभा उमेदवार आतिश भैय्या बनसोडे, विधानसभा मध्ये चे उमेदवार श्रीनिवास संगे पाग, महिला शहराध्यक्ष सुरवसे, महासचिव गायकवाड, कामगार संघटनेचे जिल्हा महासचिव सुरज आरकराव, भारिपचे माजी जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड, यशवंत शेठ इंगळे उत्तरचे महासचिव सोनावणे, राजकुमार इंगळे, कृष्णा इंगळे यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



## परभणी घटनेचा सांगोला भाजपाकडून निषेध

**सांगोला :** परभणी शहरातील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर संविधानाच्या प्रतिकृतीची माथेफिरूने तोडफोड केल्याची घटना दहा डिसेंबरला घडलेली होती. सदर घडलेली घटना दुर्दैवी आहे. याचा आम्ही जाहीर निषेध करत आहोत. या घटनेतील मुख्य सूत्रधार कोण आहेत हे प्रशासनाने शोधून काढून तात्काळ अटक करावी व देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. तसेच शहरातील जनजीवन सुरळीत करावे अशी मागणी भारतीय जनता पार्टी, सांगोला यांच्यावतीने करण्यात आली. याबाबतचे निवेदन सांगोला पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांना देण्यात आले. यावेळी भाजपचे प्रवीण जानकर, डॉ.मानस कमलापुरकर, महेश चौधरी, दिपक काशीद, गणेश फुले, प्रवीण इंगवले, माणिक सकट, तानाजी कांबळे, दगडू कांबळे, विशाल बनसोडे, आनंद ओवाळ, रोहित बनसोडे, विक्रांत सावंत, परमेश्वर जगधने, दिलीप सावंत, रुपेश कसबे, उमेश मंडले, सागर निमकर उपस्थित होते.

## आयुक्त ॲक्शन मोडवर; सोमवारपासून सोलापुरात अतिक्रमण हटाव मोहीम

### अतिक्रमणे स्वतःहून काढून घेण्याच्या सक्त सूचना

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महानगरपालिकेने अतिक्रमणांवर सुरू केलेली कारवाई आणखी तीव्र करण्यात येणार आहे. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी कठोर भूमिका घेत अतिक्रमणधारकांना दोन दिवसांचा अल्टिमेटम देत अतिक्रमणे स्वतःहून काढून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. सोमवारपासून सर्व भागात पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण हटाव मोहीम तीव्र करण्यात येणार असल्याचे आयुक्त डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

दिल्लीगेट ते चौपाटी कारंजा ते चितळे रोड, नेता सुभाष चौक, कापड बाजार, मोची गल्ली, बालिकाश्रम रोड, उपनगरातील एकविरा चौक प्रोफेसर चौक, भिस्ताबग चौक, सक्कर चौक, मार्केट यार्ड परिसर, बोल्हेगाव, केडगाव, लिंक रोड, अंबिका नगर बस स्टॉप, कोठला स्टँड परिसर, झेंडीगेट, मुकुंदनगर, अकबर नगर या परिसरात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर अतिक्रमणे झाल्याचे आयुक्तांनी केलेल्या पाहणीत आढळून आले. तसेच, जिल्हा रुग्णालय समोरील गवळीवाडा येथे जनावरे रस्त्यावर सोडली जातात व रस्त्यावर बांधली जात असल्याचे दिसून आले आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी अतिक्रमण निर्मूलन विभाग व प्रभाग अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सोमवारपासून पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. ज्यांची अतिक्रमणे आहेत, त्यांनी ती दोन दिवसात काढून घ्यावीत, अन्यथा कठोर कारवाई करेल, असा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

## कंत्राटी कर्मचाऱ्यांची गटविकास अधिकाऱ्यास मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १३ डिसेंबर-**

कामावरुन काढून टाकल्याचा राग मनात धरुन जिल्हा परिषद कर्मचाऱ्याने घरात घुसून माळशिरस पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यास काठीने मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी देत खिशातील पाच हजाराची रोकड जबरदस्तीने काढून घेतली.

ही घटना माळशिरसमधील पंचायत समिती वसाहतीत घडली. आबासाहेब हरी पवार असे मारहाण झालेल्या गटविकास अधिकाऱ्याचे नांव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमोल बाबासाहेब पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल बाबासाहेब पाटील हे जि.प.मध्ये सेवेस असून तो नेमूणक दिलेली कामे व्यवस्थीत करत नव्हते या कारणामुळे जि.प.उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई करुन त्यास नोकरीवरुन कमी केले होते. याचा राग मनात धरुन काल सायंकाळी त्यानी आपल्या घरात घुसून शिवीगाळ करत मारहाण करुन जखमी केले. तसेच जबरदस्तीने खिशातील पाच हजाराची रोकड काढून घेतली. तुमच्यामुळे माझी नोकरी गेली जर मला परत कामावर घेतले नाही तर तुम्हास जिवंत ठेवणार नाहीत. येथे कशी नोकरी करतो हेच पहातो असं धमकावल्याचही फिर्यादीत म्हंटल आहे.

## राजेरावरंभा शेतकरी कंपनीच्या सभासदांना ठिबक खरेदीवर ५ हजार अनुदान

### योजनेचा लाभ घेण्याचे अध्यक्ष डॉ. विकास वीर यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१३ डिसेंबर-**

केंद्र सरकारच्या १० हजार शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याच्या धोरणांतर्गत करमाळा तालुक्यामध्ये राजे रावरंभा शेतकरी प्रोडूसर कंपनीची स्थापना झालेली असून नाबार्डच्या अर्थसहाय्यातून या कंपनीची यशस्वी वाटचाल सुरू आहे.अवघ्या २ वर्षाच्या कालावधीमध्ये कंपनीने २ कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल केलेली आहे.वॉटर शेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या प्रयत्नांमधून व वॉलमार्ट फाउंडेशनच्या निधीमधून कंपनीच्या सभासदांसाठी प्रोराईस हा संयुक्त भागीदारी प्रकल्प



तालुक्यामध्ये राबविला जात असून या प्रकल्पांतर्गत विषमुक्त भाजीपाला व विषमुक्त शेती करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

याच प्रकल्पामधून कंपनीच्या सभासदांनी पाणी बचतीचे तंत्र आत्मसात करावे यासाठी प्रोत्साहन पर ५ हजार अनुदान जाहीर करण्यात आले आहे. ठिबक सिंचन किंवा स्प्रिंकलर खरेदी केल्यास सभासदांना शासकीय अनुदानाव्यतिरिक्त थेट ५ हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. कंपनीच्या एका सभासदाला १ एकर साठी ५ हजार रुपये अनुदान असणार आहे. एकापेक्षा जास्त एकर साठी ठिबकची खरेदी केली तरी अनुदान एकच एकरचे दिले जाणार आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर अनुदान देणे हा या प्रकल्पाचा उद्देश असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ.विकास वीर यांनी दिली. याविषयी अधिक माहिती देताना ते म्हणाले की, सध्या कंपनीचे जे सभासद आहेत ते या अनुदानाचा लाभ घेऊ शकतात.या व्यतिरिक्त कंपनीने दुसऱ्या टप्प्यातील शेअर्स विक्री सुरू केली असून जे सभासद नव्याने शेअर्स घेतील त्यांना सुद्धा या अनुदान योजनेचा लाभ घेता येणार आहे. ठिबक हे जैन कंपनीचे आयएसआय मार्क असलेलेच ठिबक सभासदांनी खरेदी करणे बंधनकारक असणार आहे. कंपनीचे महिला सभासद कमी असल्यामुळे दुसऱ्या टप्प्यांमध्ये नाबार्डच्या धोरणानुसार महिला सभासदांसाठी फक्त २१०० हे सभासद मूल्य ठेवले असून त्याचा फायदा महिला शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

### श्वानांवर विषप्रयोग

## अक्कलकोटमधील श्वानांचे मारेकरी मोकाटच!

### तपास कामातील त्रुटी दोषींना पूरक; प्राणीप्रेमींमधून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ डिसेंबर-**

अक्कलकोट शहरामध्ये प्रथमच मुक्याप्राण्यानां न्याय देण्यासाठी कॅंडल मार्च काढण्यात आला. २५ पेक्षा अधिक श्वानाची हत्या झाली. मात्र फक्त दोनच श्वानांचे शवविच्छेदन प्रक्रिया झाली. इतर मृत श्वान शवविच्छेदन का करण्यात आले नाही? श्वानाचे मारेकरी कुठेही पळून गेले नाहीत ते अक्कलकोटमध्येच आहेत. असे पाल निमल फौन्डेशनचे रोषन पाठक यांनी म्हटले आहे. तर मग अक्कलकोटच्या पोलीसांना मारेकरी का सापडत नाहीत? पोलीसांचा आदर्श तपास कशा पद्धतीने चालू आहे. तपास कामातील त्रुटी दोषीना पोषक असल्या च्या संतप्त प्रतिक्रिया प्राणीप्रेमी अक्कलकोटवासीयातून व्यक्त होत आहेत.

**दोषींना शिक्षा व्हावी**

दोषीना शिक्षा व्हावी अशा पद्धतीने तपास करून संपूर्ण महाराष्ट्राच्या इतिहासात अक्कलकोट पोलीसांची शान वाढवावी मुक्या प्राण्यांना ही निर्दयपणे विषप्रयोगाद्वारे संपविणाऱ्यांना समर्थाच्या नगरीत थारा नाही हे कृतीतून अक्कलकोट पोलीसांनी दाखवून देण्याची मोठी संधी आहे. यामध्ये अक्कलकोट पोलीस यशस्वी झाल्यास महाराष्ट्र नक्कीच या पोलीसांचा मोठा गौरव करणार हे निश्चित आहे.

श्वानापेक्षा वफादार प्रामाणिक प्राणी दुसरा भेटणार नाही. माणसापेक्षाही इमानदार प्राणी म्हणून श्वानाचा उल्लेख केला जातो. धर्मराजा युधीष्ठीरदेखील स्वर्गात जाताना सोबत श्वानालाही घेतले. श्वानाला स्वर्गात प्रवेश नाकारताच श्वानासह स्वर्गात प्रवेशाचा आग्रह धरून प्रवेश केला, अशी मोठी थोरवी श्वानाची आहे. पोलीस तपास कामात श्वानाची मदत घेतात. मात्र आता श्वानाची विष प्रयोगाद्वारे हत्या करणाऱ्या दोषीना शोधण्यात पोलीस कुणाची मदत घेणार? की जाणून बुजुन शहरात मारेकरी मोकाट असताना पोलीस आदर्श तपास कसा करीत आहेत अशी उलट सुलट चर्चा व्यक्त होताना दिसत आहे.

**तपासात प्रगती नाही**

श्वान मालकांनीही पोलीसांत तक्रार दाखल केली. मात्र तपासामध्ये प्रगती नसल्याची खंत आतिष कटारे यांनी व्यक्त केलीआहे.

मोठया प्रमाणात श्वानांना खाद्य पदार्थामध्ये कुठला तरी विषारी द्रव्य घालून हत्या झाली घटना होऊन अनेक दिवस झाली. मारेकरी अक्कलकोटमध्ये मोकाट फिरत असल्याचा पाल निमल वेलफेअर फौडेशनचे रोशन पाठक यांनी जाहिरपणे बोलले आहे. मात्र त्यांनी पोलीस तपास करीत आहेत . पोलीसांनी आम्हाला खुप सहकार्य केल्याचे म्हटले होते रोशन पाठक यांचे अक्कलकोट पोलीसाबद्दलचे चांगले मत अधिक गौरवपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे. अक्कलकोट पोलीसानां त्यांची कामगिरी कसौटीवर उतरविण्याचे आव्हान आहे. श्वानांचे मारेकरी अक्कलकोटमध्येच असताना पोलीस त्यांना शोधू शकत नाहीत याला फारच दिरंगाई होते. दोनच श्वानाचे शवविच्छेदन इतर मृत श्वानाचे काय झाले ? श्वानाची मृत संख्या बद्दल पुरावे अहवाल विल्टेवाट असे अनेक तपास कामात त्रुटी व दोषीना अभय मिळेल का? असे अनेक प्रश्न अक्कलकोट येथील प्राणी मित्रांनी व्यक्त केले आहेत. यामुळे या घटनेचा योग्य तपास करावा दोषीना पळवाटा शोधण्याची संधी मिळू नये अशा पद्धतीने तपास अक्कलकोट पोलीसांनी करावा.

## संक्षिप्त वृत्त



### प्रज्ञायोगी आचार्य गुप्तीनंदी व मुनी संघाचे सोलापुरात आगमन

**आत्मोन्नतीचा दिला कानमंत्र**

**सोलापूर, दि.१३ डिसेंबर-**

सोलापुरातील आदिनाथ दिगंबर जैन मंदिरात परमपूज्य १०८ प्रज्ञायोगी आचार्य गुप्तीनंदी महाराज, मुनीश्री विमल गुप्त महाराज, आर्यिका अस्थाश्री माताजी, धन्यश्री माताजी, तीर्थश्री माताजी, दीक्षार्थी व ब्रम्हचारिणी वैशाली दीदी यांचे आगमन झाले. यावेळी मंदिराचे अध्यक्ष धर्मानुरागी सुनिल गांधी, कासार मंदिर अध्यक्ष विलास कंदले, बाबुराव तंगा, प्रा. धन्यकुमार बिराजदार, नंदकुमार कंगळे, रवी कटके, रविकिरण मैंदर्गे यांच्या हस्ते पाद प्रक्षालन करण्यात आले. यावेळी मुनीश्री विमल गुप्त महाराजांनी धर्मामुळे शिवसुख प्राप्त होतो, संयमाचे महत्त्व कळते व आत्मोन्नती होते असा संदेश दिला. गणिनी आर्यिका अस्थाश्री माताजींनी सोलापूरविषयी गौरवोद्गार काढले. आचार्य गुप्तीनंदी महाराजांनी णमोकार महामंत्र महात्म्य सांगत चैतन्य प्रतिमा निर्मिती, चातुर्मास महत्त्व, मुनी दर्शन लाभ, कषाय जिंकण्याने होणारे लाभ यावर प्रकाश टाकला. यावेळी सुभाषचंद्र वनकुद्रे, प्रा. मनीष शहा, जिनपाल बिराजदार, रेखा बिराजदार, केतन शहा, दर्शना शहा, सोनाली पालिया, शोभा कळसकर, महेश नळे, राजेंद्र पाटणे, गुलाबचंद कासलीवाल व समाज बांधव उपस्थित होते.



### सफाई कामगाराचा प्रामाणिकपणा; ५७ हजार ऐवज असलेली बॅग परत

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

रेल्वे स्टेशन परिसरात एका प्रवाशाचे बॅग सफाई कामगारास सापडली, ती बॅग त्या कर्मचारी महिलेने गुन्हे शाखेच्या पोलिसांच्या स्वाधीन करीत प्रामाणिकपणा दाखवला. त्यामध्ये बॅगमध्ये ५७ हजाराचा रुपयांचा ऐवज होता. पोलिसांनी शोध घेवून ती बॅग त्या व्यक्तीच्या ताब्यात देत माणुसकी दाखवली आहे. त्या व्यक्तीचे नाव विकास रामेश्वर (रा कर्नाटक) येथील असून त्यास साहित्याची बॅग सुपूर्त केली आहे. रेल्वे स्टेशन परिसरात जया दंडाले( रा. मोदीखाना, सोलपूर) या सफाईचे काम करीत होत्या. त्यांना प्रवाशी बॅग मिळाली. त्या बॅग संदर्भात त्यांनी स्टेशनवरील इतर प्रवाशाकडे चौकशी केली असता कोणी देखील ती बॅग घेतली नाही.

बॅगेमध्ये पाहिले असता रोख रक्कम, एक मोबाईल, एक घडयाळ, दोन गॉगल, एक पाकीट व इतर महत्वाचे कागदपत्र आणि कपडे असा एकुण ५७ हजाराचा ऐवज होता. बॅग सफाई कामगार यांनी प्रामाणिकपणे ज्यांचे आहे त्यांना मिळावे या उद्देशाने पोलीस पोलिस शिपाई आनंद गडदुरे( नेम- गुन्हे शाखा)यांचे कडे हजर केली. गडदुरे यांनी चौकशी करून माहिती घेतली असता ती बॅग विकास रामेश्वर यांची असल्याचे निष्पण्ण झाले. त्यांना बोलावून घेतले, मोबाईल,घड्याळ व सर्व साहित्यासह बॅग सफाई कामगार जया दंडाले यांच्या हस्ते सुपूर्त केली. यावेळी पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त अजित बोन्हाडे, उप आयुक्त डॉ. दिपाली काळे, व उपायुक्त विजय कबाडे, यांच्या उपस्थितीत परत दिली.

# एकाच दिवसात शहरात मुले, महिला बेपत्ता होण्याच्या ७ नोंदी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

शहरात दिवसेंदिवस मुले आणि महिला बेपत्ता होण्याच्या तक्रारीत वाढतचहोत आहे.शुक्रवारी शहरातील ३ पोलीस ठाण्यात मुले आणि बेपत्ता महिला बेपत्ता होण्याच्या ७ नोंदी नोंदवण्यात आले आहेत.

साक्षी ज्ञानेश्वर चौगुले (वय-१९,रा. सायली हाइट्स वसंत विहार,सोलापूर) ही मुलगी ११ डिसेंबर रोजी घरातून निघून गेली आहे.रणधीर उर्जतसिंग निंबाळकर (वय-२१,रा.अवंती नगर,वीर गणपती जवळ सोलापूर) हा २१ वर्षाचा तरुण ११ डिसेंबर रोजी आई सोबत वाद-विवाद झाल्याने घरातून निघून गेला आहे. प्रतीक्षा उत्तम रोकडे (वय-२३,रा.नाकोडा युनिटी सोलापूर) ही महिला १२ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता राहत्या घरातून निघून गेली आहे.या तिन्ही घटनेची नोंद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात झाली आहे.तर सचिन महादेव कटके (वय-४५,रा.भवानी पेठ,सोलापूर) हा इसम घरात कुणालाही काय न सांगता निघून गेला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्यात बेपत्ता नोंद झाली आहे.तर दिव्या गणेश मंजेरी ही मुलगी आजी घरी असताना निघून गेली आहे.तर राजशेखर धुळाप्पा वच्चे (वय-४६) हा इसम ८ डिसेंबर रोजी घरासमोरील शेजाऱ्याकडे चावी ठेवून निघून गेले आहेत.या दोन्ही घटनेची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली आहे.

# टुरिस्ट लॉजिंगवर चालणाऱ्या कुंटणखान्यावर धाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

बार्शी ते जामगाव रोडवरील हॉटेल टुरिस्ट लॉजिंगवर चालणारे कुंटणखान्यावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाने छापा टाकून ३ पिडीतांची मुक्तता केली आहे.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षातील पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे पोलीस अधिकारी पोलीस अंमलदार यांनी या हॉटेल टुरिस्ट हॉटेलवर बोगस गिऱ्हाईक पाठवून खात्री करून या ठिकाणी छापा टाकण्यात आला.

यातील तीन पिडीत महिला यांना लॉज मालक संशयित आरोपी राजेंद्र भिम राव मराठे (वय-४८,रा.जामगाव),लॉज मॅनेजर संतोष मच्छिंद्र नलवडे (वय-५२,रा. तुळाजापुर रोड,बार्शी जि.सोलापूर) या दोघा आरोपींनी तीन महिलांना लॉज मध्ये दाबून त्यांच्याकडून स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.संशयित आरोपी विरोधात बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून,दोघा संशयित आरोपीला अटक केली आहे.

हि कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी,अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर,पोलीस उपअधिक्षक विजयालक्ष्मी कुरी यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कशाचे पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे व त्यांच्या पथकाने केली.



# जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

**आ. सुभाष देशमुख यांची ग्वाही; प्रत्येक व्यक्ती केंद्रबिंदू मानून गावाचा करणार विकास**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

दक्षिण तालुक्यातील जनतेने तिसऱ्यांदा आपल्यावर विश्वास दाखवून विक्रमी मतांनी निवडून दिले. त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. जातीच राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी विकासासाठी भाजपला मतदान केले आहे. प्रत्येक परिवार, प्रत्येक व्यक्ती केंद्रबिंदू मानून गावाचा विकास करणार असल्याचे प्रतिपादन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर मतदार संघातील ग्रामस्थांशी जनसंवाद आणि आभार मानण्यासाठी शुक्रवारी आ. देशमुख यांनी तालुक्यातील ग्रामीण भागाचा दौरा केला, त्यावेळी ते बोलत होते. आ. देशमुख यांनी कुडल, हत्तरसंग,बरुर, चिंचपूर, सादेपूर, टाकळी, औज मंद्रुप, लवंग यासह अनेकगावांना भेटी दिल्या.

आ. देशमुख म्हणाले की, आता सर्वांनी एकत्र येऊन तालुक्याचा आणखी जास्त विकास करण्याचा प्रयत्न करू. तालुक्याने जो विश्वास दाखवला तो विश्वास नक्की सार्थकी करणार आहे. येणार्या ५ वर्षात कोणत्या गावात काय कामे करायची याचे नियोजन ग्रामस्थांनी करावे, ती कामे आपण निश्चित पूर्ण करू. शासनाच्या अनेक योजना आहेत, गावकर्यांनी त्याचा लाभ घ्यावा, शेतीपूरक व्यवसाय करावा, महिलांनी घरगुती व्यवसाय सुरू करावा, युवकांनी नवीन उद्योग उभारावे यासाठी आपण लागेल ती मदत करण्यास तयार आहे.

या संपूर्ण दौऱ्यात तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, चनगोंडा हाविनाळे, अंबिका पाटील, नामदेव पवार, सोमनाथ केंगनाळकर, जगन्नाथ गायकवाड, पंडित पूजारी, चिदानंद पुजारी, जगन्नाथ गायकवाड, सरपंच राजकुमार हालमनी, धर्मराज पुजारी, तिपण्णा पाटील, कमलाकर बिराजदार, कल्लाप्पा भतगुणकी, मल्लिकार्जुन बिराजदार, मधुकर बिराजदार, शरणाप्पा भतगुणकी, गुरुसिद्ध बिराजदार, सुरेश बगले, सोमनाथ बगले, भिमाशंकर चडचण, सिद्धाराम जानकर, अशोक चडचण, शिवा कोणदे, सिद्धाराम कोणदे, संगण्णा हत्तरसंग, शिवकुमार चोरमोले, भौरवा कोळी, सतीश कोळी,सिद्धाराम घोडके, महांतेश बिराजदार, संगमेश्वर बिराजदार,भुताळी घोडके महेंद्र उंबरजे,यतीन शहा,रायप्पा बने, इरप्पा बिराजदार व ग्रामस्थ उपस्थित होते.

**गावोगाव जल्लोषात केले स्वागत**

दक्षिण तालुक्यातील प्रत्येक गावात ग्रामस्थांनी आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनी आ. सुभाष देशमुख यांचे जल्लोषात स्वागत केले. महिलांनी आ. देशमुख यांचे औक्षण केले. कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी केली.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे मजबुतीकरण करावे



**आ. विजयकुमार देशमुख यांच्या सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या परिसरात जड वाहतूक असल्याकारणाने काही ठिकाणी तडे जाऊन चिरा पडल्या आहेत. यावर लवकरात लवकर मजबुतीकरण करून सुशोभीकरण करण्यात यावे, अशा सूचना आमदार विजयकुमार देशमुख यांनी सोलापूर महापालिकेस दिल्या आहेत.

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे मजबुतीकरण करून तातडीने या कामाची सुरुवात करण्यात यावी. शहराचा केंद्रबिंदू असलेल्या या चौकामध्ये मोठ्या प्रमाणात वाहतुकीचे वर्दळ असते. या वर्दळीमुळेच येथील पुतळ्याच्या चबुतऱ्यास अनेक ठिकाणी तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे. यावर पालिकेने लवकरात लवकर कारवाई करावी आणि संभाव्य दुर्घटना टाळावी अशा कडक सूचना आमदार विजयकुमार देशमुख यांनी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांना दिल्या.

यावेळी माजी सभागृह नेते संजय कोळी, राजकुमार पाटील, श्रीकांत घाडगे, बाबुराव जमादार, रमेश गायकवाड, सिद्धार्थ मंजेली, राजेंद्र मासम, रोहन सोमा, रुचिराताई मासम आदींची उपस्थिती होती.

### चप्पळगावमधील एकाने केली पतसंस्थेची फसवणूक; गुन्हा दाखल

**अक्कलकोट, दि. १३ डिसेंबर-**

बनावट लेटर हेड तयार करून संस्थेच्या खोट्या सही-शिक्यानिशी संस्थेच्या कर्जाची परतफेड केल्याचे भासवून तलाठी कार्यालय चप्पळगाव येथे सादर करून शेतीवरील ५ लाख ४१ हजार रुपयांचा बोजा कमी करून घेतला. संस्थेला याबाबत माहिती न देता फसवणूक केल्याबाबत अक्कलकोट उत्तर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबात चंद्रकांत सिद्रामप्पा दसले (रा. लोकमंगल विहार, बासलेगाव रोड, अक्कलकोट) यांनी उत्तर पोलिसात सदानंद मनोहर भोसले (रा. चप्पळगाव) यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. ही घटना १६ फेब्रुवारी २०२३ रोजी चपळगाव, येथे घडली असुन याबाबत १३ डिसेंबर २०२४ रोजी गुन्ह्याची नोंद झाली आहे.

सदानंद मनोहर भोसले यानी स्वामी विवेकानंद सहकारी पतसंस्थेचा अक्कलकोट बनावट लेटरहेड तयार करुन त्यावर संस्थेचा खोटे सही शिक्यानिशी तलाठी कार्यालय चपळगांव यांना देऊन शेती गट क्र ४२८ चा बोजा कमी केला. तपास सपोनि बागाव हे करीत आहेत.

# ठोकळ प्रशालेच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**




इंदिरा ज्ञानवर्धिनी सोलापूर संचलित श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेने शैक्षणिक सहलीचे आयोजन केले. सहलीत विद्यार्थ्यांना मध्यप्रदेश व उत्तरप्रदेश व तेलंगणा येथील विविध महत्वपूर्ण स्थळांची भेट घडवून आणण्यात आली. त्यात मध्यप्रदेशातील चित्रकूट मधील रामघाट, मंदाकिनी नदी, तुलसी गुफा, तोता हनुमान मंदिर,

श्री परमहंस आश्रम, ३६० वर्ष जुने वडाचे वृक्ष, उत्तर प्रदेशातील प्रयागराज (कुंभमेळावा) येथील गंगा, यमुना, सरस्वती यांचा त्रिवेणी संगम, लेटा हनुमान मंदिर, अकबर फोर्ट सारनाथ येथील सिंहस्तंभ, बौद्ध स्तूप व स्मारक, जपानी व चायनीज मंदिर, विश्वनाथ व सारंगनाथ मंदिर या स्थळाना दिले. विद्यार्थ्यांना याची देही याची डोळा प्रभू अयोध्येतील प्रभू 'श्री रामलल्लांचे' दर्शन घेण्याचे भाग्य लाभले. मंदिर निर्माणानंतर एवढ्या मोठ्या संख्येत विद्यार्थ्यांना 'श्री रामलल्लांचे' दर्शन घडविणारी श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला सोलापूर ही महाराष्ट्रातील पहिली शाळा ठरली.

या सहलीत लखनऊ ते हैद्राबाद हा प्रवास इंडिगो कंपनीच्या ६ए ५२३ या विमानाने घडवून दिले. प्राचार्य श्री. दत्तात्रय गाजरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहलीचे उत्तम नियोजन करण्यात आले. या सहलीमध्ये प्रशालेतील ५१ विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रशालेतील दोन शिक्षक, दोन शिक्षिका असे एकूण ५५ जण सहभागी झाले होते. सहल यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक वाय. जी.शेख, सहशिक्षिका एम.एन. कारंडे, पी.एच.चव्हाण सहशिक्षक एन.सी.रमणशेट्टी यांनी परिश्रम घेतले. सहल यशस्वी घडवून आणल्याबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांच्यासह पालकांनी शाळा, प्राचार्य व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# सोलापूर विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्यावतीने विविध उपक्रम राबविणार : सरवदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्योदवी होळकर सोलापूर विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र स्थापन झाले असुन या केंद्रासाठी विद्यापीठाने ३० लाख रुपये निधीची तरतुद केली आहे. भारतीय राज्यघटनेला ७५ वर्षे पुर्ण होत असल्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सर्व महाविद्यालयात डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी सांगितले.




विद्यापीठात डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राची पहिली बैठक शुक्रवारी पार पडली. यावेळी बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे अध्यक्ष सरवदे हे होते. यावेळी अध्यासन केंद्राचे समन्वयक तथा सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. टि. एस. मोरे आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यासनासाठी स्वतंत्र इमारत निर्मिती तसेच निधी संकलनाबाबत ठराव करण्यात आले. डॉ.आंबेडकर यांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजावे यासाठी विद्यापीठात डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. या केंद्राच्या माध्यमातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, संविधान जनजागृती आणि संशोधन या घटकावर भर देण्याबाबत सदस्यांनी यावेळी सुचना केल्या.

यावेळी डॉ. कोळेकर यांनी अध्यासनाचे काम हे अभ्यासक्रम, उपक्रम, कार्यक्रम आणि संशोधन प्रकाशन या चार तत्वावर गतीमान व्हावे, अशी सुचना केली. यावेळी डॉ. कांबळे यांनी विद्यापीठातील २५ एकर जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय सामाजिक न्याय आणि सबलीकरण संशोधन केंद्राच्या नियोजीत आराखड्याची मांडणी केली.

यावेळी सरवदे म्हणाले, केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्रासाठी सर्व मदत मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या बैठकीस सदस्य डॉ. एम. आर. कांबळे, डॉ. सारीपुत्र तुपेरे, डॉ. मारुती घंटेवाड, डॉ. चंद्रकांत चव्हाण, डॉ. सिद्राम सलवदे, डॉ. दिगंबर वाघमारे आदी उपस्थित होते. तर विद्यापीठाचे कक्ष अधिकारी नासिर देशमुख आणि कर्मचारी उपस्थित होते. डॉ. एम. आर. कांबळे यांनी यावेळी अध्यासन केंद्रासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ देणार असल्याचे सांगितले.

हाऊसफुल्ल २रा आठवडा

भागवत उमामंदिर

10.45 AM | 2.30 PM | 6.15 PM | 10.00 PM




Book The Ticket At BookMyShow

तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

प्रेक्षकांसाठी खास सेल्फी पॉईंटची सोय




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मार्कंडेय रुग्णालयात श्रीकृष्ण मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना

▶▶ काशीपीठाचे मठाधीश डॉ. मल्लिकार्जुन महास्वामी यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

येथील श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाच्या आवारात नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिरात भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना मोठ्या भक्तीमय वातावरणात करण्यात आली. यावेळी काशीपीठाचे मठाधीश डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री म र्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयचे चेअरमन डॉ. विजयकुमार अरकाल व संचालक श्रीधर बोल्ली यांनी धार्मिक विधींचे यजमानपद स्वीकारले होते.

यावेळी गोमातेचीही पूजा करण्यात आली. याप्रसंगी पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश पलम री, पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास कयातम, बोल्ली ब्लड बँकेचे अशोक इंदापुरे, श्री मार्कंडेय रुग्णालयचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली, व्हाईस चेअरमन रमेश विडप, प्रशासकीय अधिकारी स्वामी आकेन यांच्यासह श्रीनिवास कमटम, लक्ष्मीनारायण कुचन, मनोहर अन्नलदास, राजेशम येमूल, किसन श्रीराम, महांकाळ येलदी, शिवानंद पाटील आदी उपस्थित होते.





## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### शांतकुमार मोरे यांना मावळ मराठा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**



२० वा साप्ताहिक मावळ मराठा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार शांतकमार मोरे यांना जाहीर करण्यात आला. या पुरस्काराचे वितरण दि.१४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्रमिक पत्रकार संघात होणार आहे. ज्येष्ठ इतिहास अभ्यासक प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. या कार्यक्रम ास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक सदानंद खोपकर यांनी केले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर कलाकार समितीच्या अध्यक्षपदी सलवदे

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर कलाकार समिती सोलापूर शहर व जिल्हाच्यावतीने मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर उद्यान येथे बैठक संपन्न झाली. अध्यक्षपदी शशिकांत सलवदे यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजय बाबरे, सुभाष सिताफळे, धोंडाबाई नागटिळक, सुजाता वाघमारे, राहुल वाघमारे, रोहित भडकवाड, रमेश कांबळे, बाळू सितासावंत, सुधीर साबळे, गणेश सरवदे, सूरज गायकवाड, करण कांबळे, रुक्मिणी हलकवडे, अमोल कटारे, शांताबाई कांबळे, बबिता नागटिळक उपस्थित होते. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष- रमेश कांबळे, रोहित भडकवाड, सुजाता वाघमारे, धोंडाबाई नागटिळक, सचिव- राहुल वाघमारे, खजिनदार- बाळू सितासावंत, कार्याध्यक्ष-सुधीर साबळे, सूरज गायकवाड.

### जैन गुरुकुलच्या शिबिरात १३१ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान व श्री दिगंबर जैन गुरुकुल परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे उद्घाटन मुख्याध्यापक राजकुमार काळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी १३१ जणांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन भारतीय स्टेट बँकेचे मुख्य प्रबंधक निशांतकुमार जायसवाल यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, प्राथ. विभागाच्या मुख्याध्यापिका पुष्पा झुंजर्डे, डॉ. ए.एस.वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराच्या जनजागृतीसाठी प्रशालेतील स्काऊट-गाईड विभाग व आर.एस.पी विभागातील तृप्ती माणिकशेटे, रोहित शहा, तृप्ती दुर्ग, जितेंद्र डहाळे, प्रणिल माणिशेटे, प्रसन्न काटकर, सुभाष उपासे आदींनी ही रॅली यशस्वी केली. सूत्रसंचालन मिलिंद खोबरे, आभार विकास शिळ्ळे यांनी मानले.

### फिजिक्स वल्लाहतर्फे रविवारी विद्यार्थ्यांसाठी सेमिनार

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

इयत्ता आठवी ते दहावीतील विद्यार्थी व पालकांसाठी फिजिक्स वल्लाह यांच्या वतीने रविवार दि. १५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता दहावी बोर्ड परीक्षेची तयारी या विषयावर सेमिनार आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संचालक पांडुरंग फुंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. शिवछत्रपती रंगभवन येथे हा सेमिनार होणार आहे. यावेळी डॉ. अ.ल. देशमुख हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी दहावी बोर्ड पॅटर्न, तयारी, झालेला बदल, अभ्यासाची पद्धत, बोर्डात पेपर कशा पद्धतीने तयार केले जातात, तपासण्याची पद्धत , गणित- विज्ञान विषयाची प्रश्नावली मार्गदर्शन, पाल्यांच्या अभ्यासात पालकांची जबाबदारी, बोर्ड उत्तर पत्रिका लेखन तंत्र, बोर्ड प्रश्नपत्रिकाचे स्वरूप, सराव यावर विशेष मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याचा लाभ संबंधितांनी घ्यावा, असे आवाहन यावेळी संचालक फुंदे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस नकुल इजारे, प्रशिक चलवदे, सुभाष पाटील आदी उपस्थित होते.

# थकीत मिळकतकर टप्प्याटप्प्याने भरण्याची सवलत

## मनपा उपायुक्त लोकरे यांनी आश्वासन दिल्याची सोलापूर विकास मंचची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

थकीत मिळकतकर टप्प्याटप्प्याने भरण्याची सवलत देण्याचे आश्वासन मनपा उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिल्याची माहिती सोलापूर विकास मंचकडून देण्यात आली.महापालिकेच्या मिळकतकर प्रणालीबाबत मंचच्या सदस्यांनी महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची भेट घेतली. सकारात्मक व प्रदीर्घ चाललेली ही बैठक यशस्वी झाल्याचे मंचने म्हंटले आहे. दोन्ही बाजूंनी अतिशय सकारात्मक व शहराच्या हितासाठी चर्चा झाली, असे मंचचे सदस्य केतन शहा यांनी सांगितले.

ज्या मिळकतींची नोंद महापालिकेकडे केली नाही, अशा मिळकतदारांनी तात्काळ नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन मंचने केले आहे. याबाबत थोड्याच दिवसांत महापालिका मोहीम राबवणार आज, असे महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी या बैठकीत सांगितले.

ज्यांना एकरकमी कर भरणे शक्य नाही अशांसाठी टप्प्याटप्प्याने कर भरण्याची सवलत द्यावी, अशी मागणी मंचने केली असता ती उपायुक्त लोकरे यांनी तात्काळ मान्य केली. त्याबाबत आश्वासनही दिले आहे. याबाबत महापालिकेची निवडणूक झाल्यावर निर्णय घेतला जाईल असेही उपायुक्तांनी सांगितल्याची माहिती केतन शहा यांनी दिली. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकेच्या कर रचनेचा अभ्यास करून सोलापूरची कर रचना ठरवावी अशी विनंती विकास मंचने केली. यावर विचारविनिमय करून निर्णय घेतला जाईल, असे लोकरे यांनी यावेळी सांगितले. दि. १४ डिसेंबर रोजीच्या लोक अदालत मध्ये ५० टक्के शास्ती माफी आहे, त्याचा जास्तीत जास्त मिळकतदारांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंचने केले आहे.

यावेळी शिष्टमंडळात मिलिंद भोसले, योगीन गुर्जर, केतन शहा, दत्तात्रेय अंबुरे, आंनद पाटील, गणेश शिलेदार, भारत पाटील, गौरी आंबडेकर,आरती अरगडे, श्रीकांत बनसोडे, संजय मंटगे,राजेंद्र बिराजदार यांचा समावेश होता.

### धनादेश दिल्यास महापालिका देणार कच्ची पावती

जर कर भरण्यासाठी मिळकतदार पुढील तारखेचे चेक देत असेल तर त्यांना मनपाचे कर वसुली अधिकारी लगेच जागेवरच कच्ची पावती देतील, असे आश्वासन उपायुक्त आशिष लोकरे यांनी शिष्टमंडळास दिले. शनिवार दि. १४ डिसेंबर रोजीच्या लोक अदालतमध्ये थकित मिळकत कराबाबत ५० टक्के शास्ती माफी आहे, त्याचा जास्तीत जास्त मिळकरतदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

# सोलापूर पालिकेचा टॅक्स विषय हिवाळी अधिवेशनात गाजणार

## सतत पाठपुरावा करण्याचा झाला निर्णय

### ▶▶ सोलापूर विकास मंचच्या बैठकीत चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महापालिकेच्या कर पद्धतीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, ही कर पद्धत रद्द करण्यात यावी यासाठी शहरातील नागरिकांच्या वतीने सोलापूर विकास मंच सतत पाठपुरावा करणार असून हा मुद्दा हिवाळी अधिवेशनात गाजावा यासाठी आमदारांची प्रत्यक्ष भेट घेऊन या विषयाचा रेटा लावण्या येणार आहे.

शहरातील मिळकत कर पद्धती विषयी सोलापूर विकास मंचच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत शहरातील अनेक जण आणि मान्यवर उपस्थित होते. यावेळी यावर सविस्तर चर्चा झाली. सोलापूर महानगरपालिकेच्या कर प्रणालीवर सध्या ६४ ते ८४ टक्क्यांपर्यंत अवास्तव कर आकारणी होत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. महापालिकेकडे कर बैठकांचे कोणतेही स्पष्ट अधिकार नाहीत आणि एमआरटीपी कलम १२९ अंतर्गत कर प्रणालीच्या मर्यादा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. अशावेळीही महापालिकेच्या वतीने चुकीची कर पद्धत सुरू आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या या सदोष कर पद्धतीचा सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होत असल्याने सोलापूर विकास मंचने हा विषय गाजवण्याचा निर्धार केला आहे. झालेल्या बैठकीत १०० टक्के शाश्ती कर माफीची मागणी आणि कर भरण्यासाठी मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मांडला आहे. सध्याच्या मुल्य आधारित कराऐवजी रेडी रेकनर प्रमाणे एकसमान कर आकारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवासी मालमत्तांसाठी २ टक्के तर व्यावसायिक मालमत्तांसाठी ३ टक्के कर करणे, सोलापूरमध्ये इतर म हत्त्वाच्या शहरांच्या तुलनेत कर कमी ठेवणे, ज्या मिळकतींवर अकारण करवाढ लादण्यात आली आहे, ती रद्द करणे, टॅक्स आकारताना त्याम ागील कारण स्पष्ट करण्यासाठी नोंदी ठेवण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. यावर आग्रह धरण्यात येणार आहे. तसेच सोलापूरमध्ये वर्षभरात केवळ ६० दिवस पाणीपुरवठा होतो. अनेक खाजगी आणि स यावेळी सोलापूर विकास मंचचे सदस्य मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, केतन शहा, ॲड.दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षिरसागर, विजय जाधव, सुहास भोसले, आनंद पाटील, किशोर चंडक, गणेश शिलेदार, रमेश माळवे, इक्बाल हुंडेकरी, गौरी आमडेकर, आरती अरगडे, प्रशांत भोसले, अर्जुन रामगिर, श्रीकांत बनसोडे, तुकाराम चाबुकस्वार, पांडुरंग देशपांडे, सुर्यकांत पारेकर, संजय मंटगे, निखिल पवार, राजेंद्र बिराजदार, रेवणसिध्द आयगोळे, दत्तात्रय चौगुले, योगेश जक्कल आदीजण उपस्थित हो



सोलापूर : कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरु असलेल्या ओॲसिस सोलापूर ओपन २५हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत दुहेरीच्या अंतिम सामन्यातील भारताच्या सोहा सादिक, आकांक्षा नित्तूरे यांच्यातील टिपलेला क्षण. यात त्यांनी थायलंडच्या व्हिएरा डीपर्म व भारताच्या मधुरिमा सावंत यांचा टायब्रेकमध्ये ७-६(४), ५-७, १०-८ असा पराभव केला. (छायाचित्र : केवल तिवारी)

# आतापर्यंत १७ बेघर नागरिक आपुलकी निवारा केंद्रात दाखल

## महापालिकेच्या वतीने बेघर व्यक्तीची शोध मोहीम सुरूच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

शहरातील रस्त्यावर ,मंदिर व दर्गा परिसर पासपोर्ट कार्यालय परिसर,होम मैदान, स्मार्ट सिटी परिसर,उघड्यावर राहणारे बेघर व्यक्ती यांची शोध मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत १७ बेघर व्यक्तींना आपुलकी बेघर निवारा केंद्रात दाखल करण्यात आले.

ही मोहीम आयुक्त शितल तेली - उगले यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त तथा शहर प्रकल्प अधिकारी तैमूर मुलाणी यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येत आहे. सोलापूर महानगरपालिका सोलापूर,दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्र चालविण्यात येते. बेघर व्यक्तीसाठी बेघर निवारा केंद्र कुमठा नाका क्रीडा संकुल मागे सोलापूर येथे कार्यरत आहे. या ठिकाणी राहण्याची सुयोग्य उत्तम सोय, जेवण, नाष्टा आदी सुविधा करण्यात आलेल्या आहेत.



सोलापूर शहर स्वच्छ करण्याच्या अनुषंगाने व शहरातील वाढत्या थंडीमुळे रस्त्यावर उघड्यावर राहणारे भिक्षेकरी, घर सोडून आलेले वृद्ध महिला पुरुष लहान मुले अशा प्रकारचे लोक जे रस्त्यावरच आपला उदरनिर्वाह करतात व रस्त्यावरच राहतात अशा सर्व लोकांसाठी सोलापूर महानगरपालिका आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्र सोलापूर येथे अशा सर्व बेघर व्यक्ती रस्त्यावरून उचलून निवारा केंद्रात दाखल करण्यात येत आहे.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सोलापूर महापालिका शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी ,आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्र व्यवस्थापक अशोक वाघमारे,काळजी वाहक राजू गदाग, शक्ती जाधव , नागरी समुह निरीक्षक सत्यजित वडावराव,नागेश क्षीरसागर, वसीम शेख,साईप्रसाद पोळ अरविंद महाले,सागर गायकवाड, अंबादास जाधव,शशिकांत वाघमारे, इफ्तार शेख आदी प्रयत्नशील आहेत.

# सोलापूर केंद्रातून 'विक्रमाचा घातांक क्ष' प्रथम

### ▶▶ ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा : 'ती रात्र' द्वितीय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत सोलापूर केंद्रातून अखिल भाविक वारकरी सांप्रादायिक मंडळ, सोलापूर या संस्थेच्या 'विक्रमाचा घातांक क्ष' या नाटकाला प्रथम तसेच अनघ नाट्य मंदिर, सोलापूर या संस्थेच्या 'ती रात्र' या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे.

दि. २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२४ या कालावधीत येथील हुतात्मा स्मृती मंदिरात अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत १४ नाट्य प्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धे साठी परीक्षक म्हणून रामकृष्ण पार्टे, रमेश भीडे आणि डॉ. कुंदा प्रमिला नीळकंठ यांनी काम पाहिले. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी पारितोषिक प्राप्त संघांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले असून भविष्यातही या संघांनी व कलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.



अनघ नाट्य मंदिरचे 'ती रात्र' या नाटकातील क्षण



भाविक वारकरी सांप्रदायिक मंडळाचे 'विक्रमाचा घातांक क्ष'

**प्राथमिक फेरीचे सोलापूर केंद्रावरील अन्य निकाल याप्रमाणे-**

श्रुती मंदिर, सोलापूर या संस्थेच्या एका उत्तराची कहाणी या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. दिग्दर्शनः प्रथम पारितोषिक अमोल देशमुख (नाटक- विक्रम ाचा घातांक क्ष), द्वितीय पारितोषिक राजेश जाधव (नाटक- एका उत्तराची कहाणी), प्रकाश योजनाः प्रथम पारितोषिक श्याम चव्हाण (नाटक-ती रात्र), द्वितीय पारितोषिक उमेश बटाणे (नाटक- विक्रमाचा घातांक क्ष), नेपथ्यः प्रथम पारितोषिक अमोल देशमुख (नाटक- विक्रमाचा घातांक क्ष), द्वितीय पारितोषिक बाळकृष्ण निमसूडकर (नाटक- भयरात्र), रंगभूषाः प्रथम पारितोषिक नमिता देशमुख (नाटक- विक्रमाचा घातांक क्ष), द्वितीय पारितोषिक रमेश श्रावण (नाटक-ती रात्र) उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक ऋतुराज आरसिद (नाटक-दुभंगून जाता जाता) व अश्विनी तडवळकर (नाटक- ती रात्र), अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे अपर्णा जोशी (नाटक- एका उत्तराची कहाणी), सुनंदा शेंडगे (नाटक-लपून छपून), सई दरेकर (नाटक-म ोनालिसा), अर्चना सलवारु (नाटक- शरदातले चांदणे), श्रीनिवास देशपांडे (नाटक-ती रात्र), कुबेर शास्त्री (नाटक- विक्रमाचा घातांक क्ष), अरविंद माने (नाटक-शरदातले चांदणे), अशोक किल्लेदार (नाटक- लपून छपून)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९७४

**अगा स्वधर्मु हा आपुला । जरी कां कठिणु जाहला ।**
**तरी हाचि अनुष्ठिला । भला देखें ।।**

चांगल्या कामामध्ये काम आणि क्रोध कसा अडथळा आणतात, हे सांगून माणसाने स्वधर्माचे आचरण करणे किती आवश्यक आहे. याचे स्पष्टीकरण ज्ञानेश्वर माऊलीं करीत आहेत. स्वधर्माचरणाला पर्यायच नाही. प्रत्येकाने स्वधर्माचरण केलेच पाहिजे. अर्जुनानेही स्वधर्माचे पालन केले पाहिजे. आपला स्वधर्म जरी यथासांग आचरण्यास कठीण वाटला, तरी त्याचे आचरण करण्यातच कल्याण आहे. हे सांगतांना भगवंत म्हणाले, अगा स्वधर्मु हा आपुला । जरी कां कठिणु जाहला । तरी हाचि अनुष्ठिला । भला देखें ।।. आपल्या वाटयाला आलेला स्वधर्म अवघड, कठीण असला तरीही त्याचे पालन करायलाच पाहिजे. दुस-यांच्या वाटयाला आलेला स्वधर्म सोपा आहे, म्हणून, स्वत:चा स्वधर्म सोडायचा आणि दुस-याच्या आचरणाप्रमाणे आचरण करायचे हे चुकीचे आहे. केवळ इच्छा करुन विषय प्राप्त झाला म्हणून त्या विषयाचा स्विकार करु नये. लोकांची मनमोहक सुंदर, पक्की घरे पाहून आपण आपली गवताची झोपडी चांगली नाही म्हणून मोडू नये. आपली धर्मपत्नी कुरुप जरी असली तरी दुसरी सुंदर



स्त्री पाहून पत्नीवर अन्याय करु नये किंवा परस्त्रीकडे वाईट नजरेने पाहू नये. तसेच दुसरीकडे पाहून पत्नीला सोडून देऊ नये. तिच्याशीच धर्मशास्त्रा प्रमाणे संगत करणे, संसार करणे हितावह असते. त्याप्रमाणे स्वधर्माचे ( ? नीतीनियमाला अनुकुल असे वर्तन ) आचरण करताना कितीही संकटे आली किंवा त्याचे आचरण करणे कठीण असले तरीही त्याचे आचरण करावे. साखर आणि दूध याची गोडी खूप चांगली असली तरीही जंत विकाराला ती घातक असते. म्हणून जंत विकार झालेल्या रोग्याने त्याचे सेवन करुन नये आणि जर जंत विकारी त्याचे सेवन हट्टाने करेल तर त्याचा विपरीत परीणाम त्याला भोगावा लागेल. अर्थात, एखादयाला एखादे कर्म उचित आहे आणि तेच कर्म आपल्यासाठी अनुचित असेल तर ते कर्म आपण अनुसरण्याचे कारण नाही. म्हणून अर्जुना आपल्या वाटयाला जो स्वधर्म आला आहे त्याचे आपण पालन करावे. विद्यार्थ्यांच्या वाटयाला विद्याग्रहण करण्याचा, अभ्यासचा स्वधर्म येतो, त्यांनी तो करावा. गुरुजनांच्या वाटयाला मार्गदर्शन करण्याचा स्वधर्म येतो, त्यांनी तो अभ्यासपुर्वक पुर्ण करावा. आई-वडीलांनी आपल्या मुलांचे संगोपण करण्याच्या स्वधर्माचे पालन करावे. मुलांनी आपल्या आईवडीलांच्या सेवेचा स्वधर्म पाळावा. वक्त्यांनी अभ्यास पुर्वक श्रोत्यांना मार्गदर्शन करण्याच्या स्वधर्माचे आचरण करावे, तर श्रोत्यांनी मन:पुर्वक ग्रहन करण्याचा स्वधर्म पाळावा. योध्यांनी युध्द करण्याचा स्वधर्म पाळावा, तर योध्यांची सेवा, जखम, मलमपट्टी करण्या-यांनी त्यांच्या स्वधर्माचे आचरण करावे. अर्थात, ज्याच्या वाटयाला जो स्वधर्म, स्वकर्म आले त्याचे त्यांनी सदाचाराने, निष्काम कर्मयोगी होऊन, फलाची अपेक्षा न करता पालन करावे. ज्ञानामृत आनंदलहरी हे सदर छापून संपादक त्यांच्या स्वधर्मांचे पालन करीत आहेत, आपण वाचक त्यांचे मन:पुर्वक वाचन करुन आपल्या स्वधर्माचे पालन करु या. ज्यांनी त्यांनी स्वधर्माचे पालन केले तर चोहीकडे आनंदच आनंद असेल, यात आम्हास शंका वाटत नाही.

जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १४ डिसेंबर २०२४ | श्री दत्तात्रेय जयंती |
| विक्रम संवत् २०८०-८१ | पौर्णिमा |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्दशी - (१६.५९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - रोहिणी (२७.५४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्द (०८.२६) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (२७.४२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : नवीन योजना कार्यान्वित होऊन त्या यशस्वी होतील. कायदेशीर वाद विवादातून योग्य मार्ग निघेल. कार्यक्षेत्रात प्रगती राहील. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.

**वृषभ** : आगोदर केलेल्या काम ाचा आज आपल्याला निश्चितच फायदा होणार असून आर्थिक आवक वाढणार आहे. मान सन्मानाचे योग संभवतात.

**मिथुन** : विचार पूर्वक कामे केली तर आजच दिवस चांगला जाईल. आपल्या कामाची स्तुती होईल. कौटुंबिक संबध सुधारतील. दुसऱ्याची निंदा करण्याचे टाळावे.

**कर्क** : कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील. समाजात प्रतिष्ठा मिळाल्याने आनंदी रहाल.

**सिंह** : व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल. खर्चा मध्ये वाढ होईल.

**कन्या** : देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधर्मावरील विश्वास वाढेल.

**तुळ** : व्यापार, व्यवसाय चांगला राहील. महत्वाचे काम हाती घेतले असेल तर ते पूर्ण होण्याचे योग आहेत. वाईट सवयींपासून दूर रहा. प्रवास यशस्वी होऊन आनंददायी राहील.

**वृश्चिक** : नवीन योजना आखल्यामुळे निश्चितच फायदा होणार आहे. मानसिक शांती मिळेल. सहचरणीची साथ लाभेल. मुलांच्या नौकरीची चिंता राहणार आहे. आर्थिक स्थिती मध्यम राहील.

**धनु** : आत्मविश्वासामध्ये वाढ झाल्याने कोणतेही काम सहजतेने करू शकाल. घरामध्ये लक्ष दिले असता घरातील समस्या दूर होतील. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

**मकर** : भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मिळेल.

**कुंभ** : मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील.

**मीन** : कामकाजामध्ये वाढ होईल अनकुल स्थिती राहणार आहे. वेळेचा चांगला उपयोग करून आपल्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामकाजाला सुरूवात करा.

# थकीत मिळकतकराबाबत आज लोकअदालत

## मिळकतदारांना ५० टक्के शास्ती माफीचा लाभ मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महानगरपालिकेमध्ये थकीत मिळकतकराबाबत शनिवार दि.१४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी संबंधित मिळकतदारांना ५० टक्के शास्ती माफीचा लाभ मिळू शकणार आहे.

लोक अदालतीचे कामकाज महानगरपालिका येथे होणार आहे. या लोकअदालतीमध्ये मालमत्ता कर विभागाकडून सुमारे २४ हजार व भूमी व मालमत्ता विभागाकडील ११०० थकबाकीदार असलेल्या मिळकतदारांची व गाळेधारकांची प्रकरणे तडजोडीकरीता दाखल करण्यात आलेली आहेत. दाखल प्रकरणनिहाय जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर सचिव यांच्यामार्फत संबंधित मिळकतदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. लोक अदालतमध्ये मिळकतदारांच्या थकबाकीतील नोटीस फी, वॉरंट फी व शास्तीची जी रक्कम आहे, त्यामधील ५० टक्के रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार माफ करण्यात येणार आहे. या लोक अदालतीचा जास्तीत जास्त मिळकतदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.



**या मिळकतदारांनाही लाभ देणार**

थकीत कराबाबत ज्या मिळकतदारांना नोटीसा प्राप्त झाल्या नाहीत ,असे मिळकतदारदेखील ५० टक्के शास्ती माफीचा लाभ घेऊ शकतात. अशा मिळकतदारांनी शनिवार, दि. १४ डिसेंबर रोजी महानगरपालिकेमधील मिळकत कर विभागाकडील संबंधित कर निरिक्षकांना संपर्क साधून ५० टक्के शास्ती माफीचा लाभ घेऊ शकतात, असे महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी कळविले आहे.

**तर होणार ही कटू कारवाई**

दि. १४ डिसेंबर नंतर मिळकत कराची थकबाकी असलेल्या मिळकतदारांची मालमत्ता सील करणे, बोजा चढविणे, पाणीपुरवठा खंडीत करणे आदी कारवाई सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे अशी कटू कारवाई टाळण्यासाठी मिळकतदारांनी शनिवार, दि. १४ डिसेंबर रोजी कर भरावे, असे आवाहनही महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# २१ डिसेंबरला ना. म. शिंदे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, सोलापूर शाखेच्या वतीने मूळचे सोलापुरातील ज्येष्ठ साहित्यिक ना. म. शिंदे यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन व त्यांचा ७५ वा वाढदिवस-अमृत महोत्सव सत्कार सोहळा शनिवार दि. २१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केला आहे, अशी माहिती मसाप सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजिलेल्या या समारंभात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते व त्यांच्या सुविद्य पत्नी उज्ज्वला शिंदे यांच्या उपस्थितीत ना. म. शिंदे यांच्या 'मोहाचे झाड' (कथासंग्रह), 'जातीला जात वैरी' (कादंबरी) दुसऱ्या आवृत्तीचे आणि 'जातीला जात वैरी' कादंबरीवरील लेखाजोखा-समीक्षा ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. याच कार्यक्रमात साहित्यिक ना. म. शिंदे यांच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे, ज्येष्ठ साहित्यिक उचल्याकार लक्ष्मण गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत दत्ता गायकवाड, मसाप सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुती वडगबाळकर, उपाध्यक्ष दत्ता सुरवसे आदी उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस किशोर चंडक, डॉ. नरेंद्र काटीकर, प्रा. डॉ. दीपक नारायणकर, शांताराम शिंदे व ड. केशव इंगळे आदी उपस्थित होते.

# विकास कस्तुरे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार

**कोरे, माळी, पाटील, जाधव, होटकर यांचाही आज पुरस्काराने गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**



विश्वकृपा विद्या प्रतिष्ठानच्या वतीने कै. मीनाताई दिगंबर ढेपे यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा उज्वला-सुशील रत्न आदर्श पत्रकार पुरस्कार विकास कस्तुरे यांना जाहीर झाला असल्याची माहिती संस्थेचे मुख्याध्यापक अमोल ढेपे यांनी दिली.

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबाबत संतोष धाकपाडे आदर्श शिक्षक धर्मा कोरे , मुकुंद माळी, सारंग पाटील, वंदना जाधव, रोहित होटकर यांनाही पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे वितरण शनिवार दिनांक १४ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता बाळे येथील ढेपे प्रशालेत होणार आहे. हा पुरस्कार जि प चे शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या हस्ते तसेच संस्थेचे अध्यक्ष दिगंबर ढेपे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार भरतकुमार मोरे, जि प सोलापूरचे सहाय्यक लेखाधिकारी किशोर बारड, महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष गुरुनाथ वांगीकर हे उपस्थित राहणार आहेत.

# काँग्रेस कमिटीकडून संविधान प्रतिमेच्या विटंबनेचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

परभणी येथे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या समोर असलेल्या संविधानाच्या प्रतिमेची विटंबना एका माथेफिरूकडून करण्यात आली असून, याचा सोलापूर शहर काँग्रेसकडून निषेध करून आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, यासाठी सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे यांच्यासोबत शिष्टमंडळाने अप्पर जिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांना निवेदन दिले.



यावेळी बोलताना शहराध्यक्ष चेतन नरोटे म्हणाले की, परभणी शहरात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या समोर असलेल्या संविधानाच्या प्रतिमेची विटंबना एका माथेफिरूकडून करण्यात आली. या विरोधात लोकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. देशात व राज्यात भाजप सरकार सत्तेवर आल्यापासून देशात जाती-जातीत, धर्मा-धर्मांत मतभेद निर्माण करीत आहे. डॉ. बाबासाहेबांनी या देशाची घटना लिहिली, त्या घटनेची, संविधानाची सरकारकडून पायमल्ली होत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. याप्रकरणी राज्य सरकारने तात्काळ दखल घेऊन या घटनेतील मास्टरमाईंड आरोपीचा शोध घ्यावा आणि याचा सखोल तपास करून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी या निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी महिला अध्यक्षा प्रमिलाताई तुपलवंडे, गणेश डोंगरे, देवाभाऊ गायकवाड, क्षीरसागर, हणमंतू सायबोळू, भीमाशंकर टेकाळे, राहुल वर्धा, लखन गायकवाड, संध्याताई काळे, मिरा घटकांबळे, शुभांगी लिंगराज, संजय गायकवाड, राजन कामत, सुभाष वाघमारे, नागनाथ शावने, तिरूपती परकीपंडला, धीरज खंदारे, परशुराम सतारेवाले, अंकुश बनसोडे, गिरिधर थोरात, शिवशंकर अंजनाळकर, नागेश म्हेत्रे, करीमुनिस्सा बागवान, शिवराज गोरे, दिनानाथ शेळके, मुमताज शेख, विजयालक्ष्मी झाकणे, मुमताज तांबोळी, व्यंकटेश बोम्मेन यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# १८ डिसेंबरला गारमेंटचे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन

**गारमेंट उत्पादकांकडून गेल्या सात वर्षांत सुमारे ६० कोटींची गुंतवणूक, तर १५ हजार रोजगाराची झाली निर्मिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ डिसेंबर**

सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन यांच्या माध्यमातून गारमेंट क्षेत्रातील गणवेश उत्पादकांनी गेल्या ७ वर्षांत ६० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. त्यातून अत्याधुनिक यंत्रसामुग्री प्राप्त झालेली आहे. या माध्यमातून सुमारे १५ हजार लोकांना रोजगार मिळाला.

**तब्बल १२ देशांतील व्यापारी येणार**

बेंगलोर मध्ये संपन्न होणाऱ्या या प्रदर्शनात घाना, सेनेगल, सर्बिया, केनिया, जॉर्डन, म्यानमार, दुबई, नेपाळ, दक्षिण आफ्रिका, इस्राइल, थायलंड आणि मालदीव या १२ देशांतील व्यापाऱ्यांनी प्रदर्शनाला भेट देणार आहेत. तशी पूर्वनोंदणी त्यांनी केली.

देशातल्या महानगरांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन भरवत असल्यानेच हा बदल झाला. देश-विदेशातील व्यापारी आगाऊ मागणी नोंदवून कामे देत असल्याने गणवेश उत्पादनात सोलापूरचे नाव झाले, अशी माहिती सोलापूर गारमेंट मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशनचे फेअर चेअरमन सुनील मेंगजी यांनी दिली.

दरम्यान, यंदाचे आठवे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन कर्नाटक राज्याची राजधानी बेंगलोरमध्ये आयोजीत केल्याची माहिती त्यांनी दिली. दी.१८ ते २० डिसेंबर असे चार दिवसांचे हे प्रदर्शन शृंगार पॅलेस गार्डन येथे होईल. उद्घाटनाला महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांना निमंत्रित केले. आमदार सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या चार दिवसांच्या प्रदर्शनासाठी २० देशांतील व्यापार संघटनांना निमंत्रित केल्याचेही मेंगजी म्हणाले. प्रदर्शनात एकाच छताखाली १२०० ब्रँड व १० हजार युनिफॉर्म डिझाइन्स पाहायला मिळणार आहे.

**विमानसेवा सुरू झाल्यानंतर उद्योगाचा होईल विस्तार.**

जगातील एकमेव 'युनिफॉर्म हब' बनवण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांना सोलापुरातूनच सुरुवात झाली. त्यानंतर मुंबई, दिल्ली, हैदराबाद, चेन्नई, वाराणसीत झालेल्या या प्रदर्शनांना उदंड प्रतिसाद मिळाला. त्याला हजेरी लावणारे विदेशी व्यापारी सोलापूरच्या उत्पादनस्थळी येण्यास इच्छुक असतात. परंतु विमानसेवा नसल्याने त्यांची अडचण होते. याच महिन्यात विमानसेवा सुरू होत आहे. त्यामुळे व्यापारी आता थेट सोलापूरला येतील.

**- सुनील मेंगजी, चेअरमन**

# सिद्धेश्वर फाउंडेशनचे समाजासाठी भरीव योगदान

**उपजिल्हाधिकारी अंजली मरोड; अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची भरली फी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

श्री सिद्धेश्वर फाउंडेशनच्या वतीने समाजातील दानशूरांच्या बहुमूल्य सहकार्याने एका अभियांत्रिकी विद्यार्थ्याचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी ४७ हजार ३४१ रुपयांचा चेक प्रदान करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी अंजली मरोड होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मणराव माने, डॉ. पोपट माळी, अरूण उपाध्ये उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविक करताना डॉ. अनिल सर्जे यांनी श्री सिद्धेश्वर फाउंडेशन करत असलेल्या विविध सामाजिक कार्याबद्दल माहिती दिली. उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांनी श्री सिद्धेश्वर फाउंडेशन करत असलेल्या कामाचे कौतुक करून भविष्यात प्रशासनामार्फत भरीव सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. भूजल तज्ज्ञ डॉ. पोपट माळी यांनी ईच्छाशक्ती बळकट असेल तरच हाती असलेल्या कार्यास बळ प्राप्त होते. त्यासोबतच समाजातील दानशूर व्यक्ती यासाठी धन प्रदान करतात असे मनोगत व्यक्त केले. श्री सिद्धेश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ सर्जे यांनी गरजू व्यक्तींना जातपात, धर्म न पाहता त्यांना कशाची गरज आहे हे पाहून मदत करतो असे सांगितले.

लक्ष्मणराव माने व अरूण उपाध्ये यांनी श्री सिद्धेश्वर फाउंडेशनच्या अशा चांगल्या कार्यास कायम सहकार्य राहील, असे आश्वासन दिले. या कार्यक्रमास डॉ. दत्ता हरवाळकर, नेताजी ताकमोगे, राजेश बंडगर, रेवणसिद्ध वाडकर, सिद्धाराम आलुरे, यशवंत हिरापुरे, प्राचार्य शिवानंद तेग्गिनकेरी, मुख्याध्यापक रबीलाल मुल्ला, बालाजी ठाकूर उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेंद्र बलसुरे यांनी केले तर आभार संतोषकुमार मनगोंडे यांनी मानले.

# ग्रामीण पोलिसांकडून २६ लाखांच्या किमतीचे मोबाईल संबंधितांना परत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या सायबर पोलीस ठाण्याकडून जिल्हयातील नागरिकांची २६ लाख ८० हजार रुपये किमतीचे १३० गहाळ मोबाईल निष्पन्न करून नागरिकांना त्यांचे मोबईल परत मिळवून दिले.

ग्रामीण जिल्हयामध्ये गहाळ मोबाईलचा शोध घेण्याबाबत विशेष मोहिम राबविण्यात आली होती. त्या प्रमाणे सायबर पोलीस ठाणे मार्फत सोलापूर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे हद्दीतील गर्दीचे ठिकाण, बाजारपेठ, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, यात्रा, वारी तसेच प्रवासादरम्यान, ग्रामीण भागतील नागरिकांचे मोबाईल गहाळ होण्याचे प्रमाण अधिक असल्याने त्या बाबतच्या मोबाईल गहाळ मालमत्ता नोंदीची माहिती पोलीस ठाणेकडून प्राप्त करुन घेवुन तांत्रिक विश्लेषन करुन महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हयातून तसेच बाहेरच्या राज्यातुन २६ लाख ८० हजार रुपये किमतीचे एकूण १३० मोबाईल हॅन्डसेट गहाळ मोबाईलचे शोध घेण्यात आला. सदरचे मोबाईल त्यांचे मुळ मोबाईल धारकांना परत करण्यात आले आहे. त्यामुळे मोबाईल परत मिळाल्याने मोबाईल धारक नागरिकाकडून सोलापूर ग्रामीण पोलीसांच्या कामगिरीबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.



ही कामगिरी पोलीस अधिक्षक, अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विकास दिंडूरे, सहायक पोलीस निरीक्षक वैभव स्वामी, सहायक पोलीस निरीक्षक रोहिदास पवार, महिला पोलीस हवालदार ज्योती फुलारी, पोलीस हवालदार अभिजीत पेठे, युसूफ पठाण, व्यंकटेश मोरे, पोलीस शिपाई अजित सुरवसे, स्वप्निल सन्नके, जहिरान नाईकवाडी, आशुतोष कुलकर्णी, रतन जाधव यांनी केली आहे.

# युनायटेड चर्चेस ऑफ सोलापूर तर्फे सोमवारी आनंद सोहळा

## ख्रिसमस निमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

युनायटेड चर्चेस ऑफ सोलापूरच्या वतीने प्रभू येशू ख्रिस्तांच्या जन्मोत्सवानिमित्त सोलापुरात सोमवार दि. १६ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता वोरोनोको शाळा, रंगभवन येथे आनंद सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती सुभाष माने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या ख्रिसमस फेस्टिवल मध्ये सोलापुरातील विविध चर्चेस, सेवाभावी संस्था व शाळा सहभागी होणार आहेत. यामध्ये गायन, नृत्य व विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. प्रारंभी प्रार्थना व स्वागत गीत होईल. त्यानंतर उपस्थित पाळकवर्गाच्या हस्ते दीप प्रज्वलनाने या सोहळ्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम दोन सत्रात पार पडणार आहेत. पहिल्या सत्रात गुड न्यूज सेंट्रल चर्चचे पालक गुदोन अढागळे हे पवित्र शास्त्रातून संदेश देणार आहेत. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे दुसऱ्या सत्रात शांती व समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात येणार आहे. यामध्ये धार्मिक पुस्तके, ख्रिसमस डेकोरेशन, खाण्याचे व कपड्यांचे स्टॉल्स उपलब्ध राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस गिदोन अढागळे, प्रणय गवळी, इमानूएल म्हेत्रे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### बार्शीत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**बार्शी, दि. १३ डिसेंबर-**


महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांची ७५ वी जयंती बार्शी येथील सावळे अण्णा सभागृहाजवळ स्वस्तिक कुशन या ठिकाणी सर्व बहुजन समाजाच्यावतीने व सर्व पक्षीयांच्यावतीने मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची अचूक जाण असलेला नेता म्हणजे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे भारतीय जनता पक्षाला फक्त ब्राह्मणांचा पक्ष म्हणणाऱ्यांना भाजपा हा सर्व बहुजनांचा पक्ष अशी ओळख निर्माण करुन देणारे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे होते. सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन काम करणारा लोकनेता म्हणजे गोपीनाथ मुंडे. आपल्या पक्षाबद्दल आपल्या समाजाबद्दल व आपल्या जनतेबद्दल कसे एकनिष्ठ राहावं याचे उत्तम उदाहरण म्हणजे स्व. गोपीनाथराव मुंडे अशा प्रकारच्या भावना उपस्थित सर्वच मान्यवरांनी यावेळी मांडल्या. अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीराम बापू मुंडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मोहनराव पाटील, डॉ. रवींद्र माळी, डॉ. मांजरे, डॉ. नागरगोजे, डॉ. दीपक जाधवर, दलित महासंघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे, विलास वाघमारे, माजी नगरसेवक मदन गव्हाणे, मेहंदीमिया लांडगे तर प्रमुख उपस्थिती म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपा तालुकाध्यक्ष मदन दराडे, हनुमंत सारुक, सिद्धेश्वर मुंडे, पद्माकर मुंडे, वैभव मुंडे ,राजेंद्र खाडे, सोमनाथ दराडे, बाळासाहेब मुंडे, वैभव जाधवर, शिवमूर्ती मुंडे, गोरक्ष मुंडे, बाबासाहेब सांगळे, सुरेश जाधवर, आश्विनकुमार जाधवर, शुभम मुंडे, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन राजाभाऊ बांगर, वंजारी सेवा संघ जिल्हाध्यक्ष सोलापूर, पवनराजे बांगर, दत्ता बांगर यांनी उत्कृष्ट केले.



### कमलाराजे चौक परिसरात गतिरोधक बसवण्याची मागणी

**अक्कलकोट, दि. १३ डिसेंबर-**

कमलाराजे चौक परिसर मोठया रहदारीचा चौक आहे . प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन येथे नेहमीच मंगल कार्यामुळे मोठे गजबजलेले असते. जवळच मुलीची शाळा असल्याने शाळेतील विद्यार्थीनी रस्ता ओलांडताना वेगातील वाहनांचा धोका आहे. यामुळे अक्कलकोट शहरातील कमलाराजे चौक परिसरात गतिरोधक बसवण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे. अक्कलकोट शहरातील कमलाराजे चौक, प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन परिसरातील पागाचाळीच्या समोर दुचाकी व चारचाकी वाहने ही सुसाट वेगान जातात. यामुळे या परिसरात सांस्कृतिक भवनात आलेले लोक शाळेत जाणारी मुली आबाल वृद्धांना जीव मुठीत धरून या ठिकाणाहून जावे लागत आहे. पागा चाळी समोर दुचाकी वाहने व चारचाकी वाहने ही गतिरोधक नसल्याने सुसाट वेगाने येत आहेत. यामुळे छोटे-मोठे अपघात नेहमीच पडत आहेत भविष्यात एखादी मोठी दुर्घटना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही यामुळे संभाव्या धोका टाळण्यासाठी विदयार्थीनी ना शाळेला सुरक्षित ये जा होण्यासाठी पागा चाळ समोर गतिरोधक बसवून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी परिसरातील नागरिकांतून केली जात आहे .अक्कलकोट शहरात दुचाकी वाहनांची व तीर्थक्षेत्री येणाऱ्या भाविकांच्या वाहनाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे . कमलाराजे चौक परिसरात दुचाकी वाहने व चारचाकी वाहने ही गतिरोधक नसल्याने सुसाट वेगाने येत असतात यामुळे या परिसरामध्ये छोटे-मोठे अपघात झालेले आहेत. या परिसरात शाळा मोठया प्रमाणात असून या ठिकाणी गतिरोधक बसून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी मेजर श्रीकांत मोरे यांनी केली आहे.



### बार्शीच्या सुलाखे कॉमर्स कॉलेजमध्ये मुलींच्या बॉक्सिंग शिबिराचे आयोजन

**बार्शी, दि. १३ डिसेंबर-**

येथील बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर सराव शिबीर बॉक्सिंग मुली आयोजित करण्यात आले. याप्रसंगी विविध महाविद्यालयातील खेळाडू यांनी सहभाग घेतला होता. विद्यापीठाच्या संघामध्ये निर्जला माळी केबीपी पंढरपूर, डोळसे स्वामिनी, कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी, काळे सृष्टी स्वेरी पंढरपूर, नगरे श्रुती देशभक्त गरड मोहोळ, नगरे कीर्ती संगमेश्वर सोलापूर, गलांडे दीपा देशभक्त गरड मोहोळ, शेख सानिया के. एन. भिसे कुर्डूवाडी, अपूर्वा दोडमिसे बीएमआयटी बेलाटी, अपूर्वा गायकवाड डीव्हीएफ दयानंद सोलापूर व श्रावणी सुपाते छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे यांनी व महाविद्यालयाच्या ग्रंथपाल ज्योती यादव यांनी विविध प्रकारे मार्गदर्शन करुन पुढील होणाऱ्या गुरु काशी विश्वविद्यालय, भटिंडा पंजाब अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तृप्ती सुपाते यांनीही खेळाडूंना खेळ भावनेने व आनंदी वातावरणाम ध्ये बॉक्सिंग क्रीडा प्रकार कसा खेळावा त्याची माहिती दिली. संघ मार्गदर्शक शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के यांनी प्रवास करत असताना कशा पद्धतीने प्रवास करावा, साहित्याची व स्वतःची कशी काळजी घ्यावी याबद्दल माहिती सांगून सराव शिबीर संपवले.

# दत्त जयंतीनिमित्त वटवृक्ष मंदिरात धार्मिक कार्यक्रम

## महाराष्ट्रातून पायी पालखी दिंडी सोहळे अक्कलकोटमध्ये दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ डिसेंबर-**

श्री क्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज मंदिरात दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहाने भक्ती भावाने हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये शनिवारी साजरा होत आहे. यानिमित्याने मोठया प्रमाणात भाविक पायी दिंडी पालखी सोहळे तीर्थक्षेत्री दाखल झाले आहेत. अक्कलकोट नगरी भाविकांनी फुलली आहे . दिंगबरा दिंगबरा श्रीपाद वल्लभ दिंगबरा व अवधुत चिंतन श्री गुरुदेव दत्त सदगुरु स्वामी समर्थ महाराज की जय च्या घोषाने आसमंत दुमदुमले आहे.

दत्त जयंती उत्सवानिमित्त भाविकांच्या गर्दीमुळे स्वामी भक्तांना सुलभ होण्या साठी भक्तांचे नित्यनियमाने होणारे अभिषेक होणार नाहीत. दत्त जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्रातील भांडुप, घाटकोपर-मुंबई, तळेहिप्परगा, भातंबरे, कोल्हापूर, सातारा, खर्डी, गांवखडी येथून पायी पालखी दिंडी सोहळे अक्कलकोट तीर्थक्षेत्री दाखल झाले आहेत. पालखी सोबत पायी चालत आलेल्या स्वामी भक्तांची निवासाची व भोजन प्रसादाची सोय मैंदर्गी-गाणगापूर रस्त्यावरील देवस्थानच्या भक्त निवास येथे करण्यात आली आहे.

वटवृक्ष मंदिरातील ज्योतिबा मंडपात दत्तजयंती उत्सवानिमित्त सत्संग महिला भजनी मंडळाच्या वतीने देवस्थानच्या विश्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्याखाली दु. ४ वा. दत्त जन्म आख्यान, वाचन व भजन होईल.



### रविवारी निघणार पालखी सोहळा

रविवारी दु. ११.३० च्या नैवेद्य, आरतीनंतर मंदिर परिसरात प्रसाद वाटप करण्यात येईल. देवस्थानच्या मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील भक्त निवास भोजन कक्ष येथे सर्व स्वामी भक्तांना भोजन महाप्रसाद, दुपारी १२ ते ३ या वेळेत देण्यात येणार आहे. सायंकाळी ५ वा. शहरातून श्रींची पालखी सोहळा मिरवणूक सुश्राव्य वाद्य वृदांसह भजनी मंडळ, वारकरी दिंडी पथकासह निघणार आहे. पालखी सोहळा समाधी मठातून पुनश्च वटवृक्ष मंदिराकडे मार्गस्थ होईल वटवृक्ष मंदिरात पालखी सोहळा विसावल्यावर भजन विडा शेजारती होऊन प्रसाद वाटप होईल. श्री दत्त जयंती उत्सवानिमित्त भाविकांनी पालखी सोहळा श्री दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.

सायंकाळी ६ वा. स्वामी भक्तांच्या उपस्थितीत गुलाल पुष्प वाहून श्री दत्त जन्म सोहळा व पाळणा कार्यक्रम होणार आहे.

# जिल्हा शिक्षक, सेवक पतसंस्थेच्या विस्तारास मंजुरी : चेअरमन सुरेश गुंड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ डिसेंबर-**

पुणे विभाग व शिक्षकांचे मार्गदर्शक आमदार दत्तात्रय सावंत सर यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर बाळे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्थेचा राज्यभर म्हणजे पुणे, मुंबई, कोल्हापूर, कोकणासह लातूर विभागात विस्तारास अप्पर निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र शासनाने परवानगी दिल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन सुरेश उर्फ सुर्यकांत गुंड यांनी दिली.

वाढती सभासद संख्या, वाढती कर्ज मागणी, पारदर्शक कारभार, सर्वात कमी व्याज दर, पूर्ण संगणकीकरण, तातडीने तातडी मंजूर, स्वंतत्र प अशा विविध कारणांनी ओळखली जाणारी ही पतसंस्था आता महाराष्ट्रात ओळखली जाणार. याचे श्रेय फक्त



आपल्या सर्वांचे मार्गदर्शक शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत सर यांना जाते कारण गंभीरपणे चेअरमन व सर्व संचालक मंडळाच्या पाठीशी उभे राहिले म्हणून पतसंस्थेचा विकास करु शकलो, अशी माहिती चेअरमन सुरेश गुंड यांनी दिली. त्याचबरोबर चेंबूर -मुंबई व शिवाजीनगर .पुणे येथे शाखा काढण्यासाठी परवानगी मंजुरी देण्यात आली. या अगोदर सोलापूर जिल्ह्यात बार्शी व पंढरपूर येथेही शाखा काढण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. लवकरच शाखेचा उद्घाटन केले जाणार आहे. शाखा विस्तारामुळे सभासद वाढून डिव्हीडंट वाढणार आहे. तसेच सभासदांच्या पाल्याच्या लग्न कार्यासाठी आर्थिक मदत म्हणून शुभमंगल योजनेस मंजुरी देण्यात आली. सदर योजना येणाऱ्या एप्रिलपासून रुपये ११ हजार सभासदांना दिले जाणार आहेत. अशा अनेक विविध योजना केवळ सभासदांच्या फायद्यासाठी चालू केल्या जाणार आहेत. त्यासाठी सर्व संचालक मंडळ परिश्रम घेत आहे. राज्यात पतसंस्थेला विस्तारास व विविध शाखांना मंजुरी मिळालेने सभासदात कौतुक करत असून पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालक मंडळाचे अभिनंदन केले.

# धर्मपुरी केंद्र शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरु करा

## अन्यथा उपोषण करण्याचा ॲड. संदीप वाघ यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १३ डिसेंबर-**

गेले सात महिन्यापासून प्रलंबित असलेली धर्मपुरी जि.प. प्राथमिक केंद्र शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सर्व ग्रामस्थांच्या मागणीनुसार मॉडेल शाळेच्या नवीन डिझाईन व प्लॅन नुसार त्वरित सुरू करा अन्यथा मला उपोषणाला बसावे लागेल अशी मागणी धर्मपुरी येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. संदीप वाघ यांनी निवेदनाद्वारे बांधकाम उपअभियंता माळशिरस यांच्याकडे केली असून निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर, कार्यकारी अभियंता सोलापूर व लोकप्रतिनिधींना पाठवल्या आहेत



निवेदनामध्ये म्हटले आहे की धर्मपुरी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम भूमिपूजन मॉडेल शाळेच्या नवीन सुधारित डिझाईन व प्लॅन नुसार सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य ग्रामसेवक, शिक्षक, शाखा अभियंता, वरिष्ठ लिपिक व ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले शाळेच्या बांधकामाची वर्क ऑर्डर तयार असून सुद्धा गेली सात महिने झाले शाळेचे बांधकाम सुरू झाले नाही तसेच यासाठी वारंवार माळशिरस बांधकाम विभागाला विनंती करून सुद्धा काम सुरू करण्यासाठी कोणतेच ठोस पाऊल उपअभियंता बांधकाम विभाग माळशिरस यांच्या माध्यमातून उचललेले जात नाही तरी शाळेच्या इमारतीच्या बांधकाम विलंबामुळे गावातील शिक्षणाची दुरावस्था झाली आहे गावातील शिक्षण बंद पडण्याच्या मार्गावर आहे इमारत नसल्यामुळे गेली चार वर्षे झाली सर्व मुले पत्र्याच्या शाळेत शिक्षण घेत आहेत आणि भर उन्हाळ्यामध्ये पत्र्याच्या शाळेमध्ये बसणे मुले व शिक्षक यांना असह्य होत आहे शाळेला इमारत नसल्याने गावातील मुले जीव धोक्यात घालून इतर गावांमध्ये नाईलाजास्तव शिक्षणासाठी जात आहेत तरी आमच्या गावातील मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि आमच्या गावाच्या मुलांच्या भविष्यासाठी आपण शाळेच्या इमारतीचे काम त्वरित सुरू करावे, अशी मागणी केली आहे.

### जूनच्या आधी काम पूर्ण करा

शाळेच्या बांधकामास विलंब होणार नाही, याची काळजी आपण घेऊन व येणाऱ्या जून २०२५ मध्ये शाळेची नवीन इमारत मुलांसाठी तयार होईल यासाठी प्रयत्न करावे, पुढील एक महिन्याच्या आत काम सुरू करावे अन्यथा नाईलाजास्तव मला उपोषणाला बसावे लागेल अशी मागणी ॲड.संदीप वाघ यांनी केली आहे.

# गौडगावच्या शिबिरात ३५० महिलांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १३ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यातील गौडगाव येथे एकता महिला मंचच्यावतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, डॉ. प्रज्ञा कानिटकर, डॉ. प्रज्ञा सरवदे, डॉ. अमृता शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.



या आरोग्य शिबिरामध्ये महिलांचे मासिक पाळी, संधिवात, आमवत, रक्तदाब, साखर, थायरॉड तसेच महिलांचे वेगवेगळे आजार यावर तपासणी करण्यात आली. यामध्ये ३५० महिला व मुलींची तपासणी करण्यात आली. श्री साई आयुर्वेदिक कॉलेज अँड हॉस्पिटल वैराग यांनी हे शिबीर घेण्यासाठी सहकार्य केले. नीता पवार, संपदा अन्व्हणे, प्रतीक राठोड, वेदांत इलानी, ओमकार कल्याणकर, आशुतोष मुठाळ उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्ते राहुल भड, एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर तसेच एकता महिला मंचच्या अध्यक्षा शालन दसवंत, मनीषा सुतार, विजया यादव, उज्वला चव्हाण, सविता दसवंत, दिपाली काजळे, सुकनंदा सुरवसे, सारिका सुतार, ज्योती कुंभार, मैना सोनवणे, वैशाली पैकेकर, भाग्यश्री लाटे, विजया दसवंत, महादेवी माने, उषा गरड, शुभांगी भड, विद्या भड, अर्चना भड, मथुरा दसवंत, मुद्रिका दसवंत, शोभा काजळे, सरिता काजळे, उषा सुतार, रीना गुरव, उज्वला गुरव, अर्चना माने, मैना भड, अनिता दसवंत अशा पैकेकर, अश्विनी दसवंत, शितल काजळे, अरुणा काजळे, दामिनी दसवंत, प्रियंका दसवंत, बालिका सुतार, कांचन सुतार, सिंधू दसवंत, वैष्णवी सुरवसे, मनीषा काजळे, अनुजा काजळे, शामल सुतार,वसुधा कुंभार, सरस्वती चादरे मल्टीपर्पज हायस्कूल येथील मुली, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




# पोलीस हवालदार अमृत खेडकर यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, टेंभुर्णी, दि. १३ डिसेंबर-**

सोलापूर ग्रामीण पोलीस दलाची गुन्हा आढावा बैठक गुरुवारी आयोजित केली होती. सदर बैठकीदरम्यान टेंभुर्णी पोलीस स्टेशनला कार्यरत असणारे पोलीस हवालदार अमृत खेडकर यांनी कोर्ट ड्युटी बजावताना चालू वर्षात ११ आरोपींना शिक्षा लावणेबाबत कामकाज पाहिले आहे.

त्यांच्या कामाची दखल घेऊन उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस हवालदार अमृत खेडकर यांचा सन्मान आजरोजी सोलापूर येथे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व तसेच अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी केला.

# पंढरपूर तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात २६८ उपकरणे

## वैज्ञानिक संकल्पनांचे सादरीकरण; विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ डिसेंबर-**

जिल्हा परिषद सोलापूर व पंचायत समिती पंढरपूर माध्यमिक शिक्षण विभाग अंतर्गत ५२ वे तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन नुकतेच संपन्न झाले. रयत शिक्षण संस्थेचे सतू कृष्णा केणी विद्यालय व जुनिअर कॉलेज, अनवली येथे १० व ११ डिसेंबर रोजी दोन दिवस विज्ञान प्रदर्शनाचे उत्कृष्ट नियोजन रयत शिक्षण संस्था सातारा लाईफ वर्कर प्राचार्य आर. बी. केदार, अनवली प्रशालेचे प्राचार्य कृष्णराज डोईफोडे, सर्व स्टाफ,स्वयंसेवक विद्यार्थी यांनी केले.

यामध्ये प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांनी एकूण २६८ विज्ञान साहित्यामधून नाविन्यपूर्ण वैज्ञानिक संकल्पनाचे सादरीकरण करण्यात केले. अनेक शाळांनी या प्रदर्शनामध्ये सहभाग नोंदवला. रेन डिटेक्टर, सेंद्रिय शेती, वायरलेस चार्जिंग ऑफ इलेक्ट्रिक मोटर, कार्बन प्यूरिफायर, स्वयंचलित फवारणी यंत्र, रेन वॉटर हार्वेस्टिंग इत्यादी प्रोजेक्ट विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनामधून सादर केले. या प्रदर्शनास गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्र राज्य विज्ञान मंडळाचे संचालक लक्ष्मीप्रसाद मोहिते, सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे सचिव जब्बार शिकलगार, डायटचे विषय तज्ञ संजय बरमदे, चळे केंद्राचे केंद्रप्रमुख मारुती काळुंगे, पंढरपूर



### प्रदर्शनाचा अंतिम निकाल

स्पर्श प्रवीण ढवळे, सिंहगड इन्स्टिट्यूट कोर्टी-प्रथम, सार्थक आण्णासाहेब पोरे, न्यू इंग्लिश स्कूल भाळवणी द्वितीय, श्रेयश दत्तात्रय शिखरे, दर्लिंग विद्यामंदिर चळे तृतीय, वरद सचिन नडे, यशवंत विद्यालय पंढरपूर उत्तेजनार्थ, श्रावणी राजकुमार देवकर, विवेक वर्धिनी विद्यालय, पंढरपूर उत्तेजनार्थ, माध्यमिक विभाग : सत्यम जयसिंग वागज, सतू कृष्णा केणी विद्यालय अनवली प्रथम, योगीराज रविकिरण कदम, कवठेकर प्रशाला नाथ चौक पंढरपूर द्वितीय, श्रेयस उमेश पवार, वामनराव माने प्रशाला भैरवनाथवाडी तृतीय, पायल दत्तात्रय मुळे, राजनंदिनी विद्यालय कौठाळी उत्तेजनार्थ, ओम संतोष मोरे, छत्रपती शिवाजी विद्यालय मुंढेवाडी उत्तेजनार्थ.

तालुका विज्ञान मंडळाचे अध्यक्ष गणेश लटके,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य बबन पाटील, औदुंबर डिसले, दिलीप पाटील यांनी प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी जे. आर. अयाचित, जब्बार शिकलगार, विश्वास नागणे, नरेंद्र भंडारकवठेकर, गौरी अमळनेरकर या सर्व विज्ञान शिक्षकांनी पारदर्शक परीक्षण केले. पहिल्या तीन क्रमांकाची निवड जिल्हा स्तरासाठी करण्यात आली आहे.

### प्राथमिक शिक्षक गट

विशाल विष्णुदास रेपाळ, जि. प. प्राथमिक शाळा अलंकापुरी करकंब प्रथम, माध्यमिक शिक्षक गट : संजीवनी चंद्रभान मोरे, दौलतराव विद्यालय कासेगाव प्रथम, दिव्यांग विद्यार्थी गट- महादेव अभिमान बंडगर न्यू इंग्लिश स्कूल, गादेगाव प्रथम.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त सांगोल्यात कार्यक्रम

### डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे सोमवारपासून प्रवचन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ डिसेंबर-**

श्री समर्थ सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचा १११ वा पुण्यतिथी महोत्सव श्रीराम मंदिर व ध्यानमंदिर सांगोला येथे प्रतिवर्षीप्रमाणे सोमवार दि.१६ ते बुधवार दि.२५ डिसेंबर असा साजरा होत आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ध्यान मंदिर, सांगोला येथे सोमवार दि. १६ ते बुधवार



दि.१८ डिसेंबर रोजी सायं. ६ वा. पंढरपूर येथील संत माणकोजी महाराज बोधले यांचे विद्यमान वंशज हभप डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे राम म्हणता रामची होईजे या विषयावर ३ दिवस सुश्राव्य अशी प्रवचन माला होणार आहे. शुक्रवार दि.२० डिसेंबर रोजी सायं. ६ वा. सज्जनगड येथील सेवेकरी हभप राघवेंद्रबुवा देशपांडे यांचे नारदीय कीर्तन होणार आहे. शनिवार दि.२१ डिसेंबर रोजी सायं.६ वा. सांगली येथील हभप गुरुनाथ महाराज कोटणीस यांचे प्रवचन तर रविवार २२ डिसेंबर रोजी सायं.६ वा. दयानंद बनकर यांचे भजनसंध्या भावगीत, भक्तीगीत, अभंग, गौळणीचा बहारदार कार्यक्रम होईल. बुधवार दि.२५ डिसेंबर रोजी श्रीराम मंदिर येथे पहाटे ५ ते ६.३० या वेळेत श्रीमती शुभांगी कवठेकर यांचे पुण्यतिथीचे कीर्तन व श्रीमहाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी होईल. नंतर महाराजांची पालखी व नगर प्रदक्षिणा शोभायात्रा निघेल. दु.१२ वा. आरती व १२ ते २ महाप्रसाद ध्यानमंदिर, सांगोला येथे होईल.

## संक्षिप्त वृत्त...



### संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याचे निवेदन

**माढा, दि. १३ डिसेंबर-**

परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आली या निंदनीय गोष्टीचे परभणीसह राज्यभरात तीव्र पडसाद उमटत असून समाजबांधव व संविधान प्रेमींनी शुक्रवारी माढा शहरातील निळा झेंडा चौकातून फेरी काढून माढा तहसीलदार व पोलीस स्टेशनला हे कृत्य करणाऱ्या समाजकंटक आरोपीला अटक केले असले तरी शासनाने त्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून हे कृत्य करायला लावणाऱ्या सूत्रदारावरचा तत्काळ शोध घेऊन त्यावर ही देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांना कठोर शिक्षा करावी तसेच परभणीत शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या वर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावे असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी अशोक जानराव, सुधीर लंकेश्वर, राहुल लंकेश्वर, अशोक माने, शरद लंकेश्वर, अंकुश आकाडे, अरविंद खरात, शिवाजी जगदाळे, दिनेश जगदाळे, दिनेश गाडेकर, देविदास खरात, भिवाजी विद्याग, दत्तात्रय चव्हाण, गणेश मोरे, नवनाथ थोरात, महेश निचळ, अमर ढावरे, मयुर गायकवाड, प्रशांत शिंदे, ऋषिकेश वाळके, सुशांत गायकवाड आदी समाज बांधव व संविधानप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### परभणीतील गुन्हेगारावर गुन्हा दाखल करा; रिपाइंच्यावतीने तहसीलदारांना निवेदन

**नातेपुते, दि. १३ डिसेंबर-**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. राजेंद्र गवई यांच्या आदेशाने व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष जकापा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) माळशिरस तालुक्याच्या वतीने माळशिरस तहसीलदार यांना निवेदन दिले. परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील संविधान प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या. इसमाला व त्याच्या मागे कोण सूत्रदार आहे त्याच्या पाठीमागच्या सूत्रधारास महाराष्ट्र शासन सरकारने देशद्रोहीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. व त्यांच्यावर कायदेशीर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने तहसीलदार माळशिरस यांना निवेदन देण्यात आले. यावेळी श्रीकांत सावंत, दत्ता सावंत, वैभव धांईजे, रमेश साळवे, ॲड. नितीन भोसले, संजय धांईजे, नारायण समिंदर, महादेव समिंदर, गोविंद धांडोरे, गणेश करमाळकर, भालचंद्र यादव, अमित सावंत, रोहित धांईजे, बाबा वाघमारे, बापू ओहाळ, शंकर वाघमारे, आदेश धांईजे उपस्थित होते.



### संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्यांवर कारवाई करा : राजाभाऊ कदम

**करमाळा, दि. १३ डिसेंबर-**

परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या इस्मावरती व त्याच्या पाठीशी असणाऱ्या गुप्त शक्तीचा शोध घेऊन देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा या मागणीचे निवेदन बहुजन संघर्षनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारमार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. मागणीचे निवेदन नायब तहसीलदार लोकरे यांनी स्वीकारले. यावेळी करमाळा शहराध्यक्ष अजिनाथ कांबळे, करमाळा शहर सचिव कालिदास कांबळे, जिल्हा सचिव आप्पा भोसले, तालुका सचिव रमेश भोसले, संघटक राहुल कांबळे, संघटक अतुल चव्हाण, बापूसाहेब कांबळे, समशेर सय्यद, केकान उपस्थित होते.

### शेटफळ येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**करमाळा, दि.१३ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील शेटफळ येथे सोमवारी १६ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजता भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात अनेक आदर्श शेतकऱ्यांना सन्मानित केले जाणार आहे या कार्यक्रमासाठी मा.बाबूराव हिरडे अध्यक्ष, ग्रामसुधार समिती, करमाळा, हभप विठ्ठल पाटील महाराज, गणेश करे-पाटील, सुनिल कुमार यादव, मनोज राऊत, उध्दव सानप, संजय वाकडे, मनोज हिवसे, शिल्पा ठोकड, संतोष डांगे, मोहन कोरडे, विकास वाघे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन वैभव पोळ व लोकविकास फार्मस प्रोड्युसर कंपनीने केले आहे.

## स्वामी समर्थ मंदिर परिसर विकासाचा मार्ग मोकळा

### मुख्याधिकारी रमाकांत डाके यांची धाडसी कारवाई

### वादग्रस्त, अनधिकृत इमारतीवर चालवला ब्रेकर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ डिसेंबर-**

अक्कलकोट येथील श्रीक्षेत्र स्वामी समर्थ मंदिरलगत असलेल्या त्या वादग्रस्त, अनधिकृत चार मजली टोलेजंग जुना आणि नवीन इमारतीचे पाडकाम पुन्हा जोमाने सुरू करण्यात आले आहे. मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या पथकाच्या धाडशी निर्णयाने मंदिर परिसर विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. या कारवाईमुळे स्वामी भक्तांमधून स्वागत होत आहे तर विनापरवाना बांधकाम मालकांमध्ये खळबळ उडाली आहे.




गेल्या दहा वर्षांत तत्कालीन नगरपरिषद अधिकाऱ्यांनी या वादग्रस्त चार मजली टोलेजंग इमारत पाडण्यासाठी कारवाईसाठी कायदेशीर मार्गाने धाडस कधीही दाखवले नसल्याने अशी कारवाई कधी झाली नव्हती. मंदिर परिसर वीस वर्षांपूर्वी आरक्षित असताना या बिल्डिंग मालकांनी विनापरवाना चार मजली टोलेजंग इमारत उभी केली होती. याबाबत नगरपालिका व जागेचे मालक यांच्यात अनेक वर्षे कोर्टात वादविवाद सुरू होता. मात्र, बिल्डिंग पाडण्यास हरकत नव्हती म्हणून मागच्या आठवड्यात पोलिस बंदोबस्तात पाडणे काम सुरू करण्यात आले होते. मात्र, स्थानिक कोर्टाने हस्तक्षेप करून मुंबई कोर्टातील सुनावणीपर्यंत स्थगिती दिली होती. सोमवार ९ डिसेंबर रोजी उच्च न्यायालयाने तक्रारदाराचा अर्ज निकाली काढला. त्यानंतर गुरुवारी सकाळी पुन्हा नगरपालिकेच्या पथकाने या पाडकाम पूर्ववत सुरू केले आहे. यामुळे विनापरवानाधारक बांधकाम मालकामध्ये एकच खळबळ उडाली आहे. मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या मार्गदर्शनाखाली नगररचनाकार शुभम माहुरे, अभियंता अमोल भांमरे, कनिष्ठ अभियंता सायली जाधव, धनंजय शेळके आदी यासाठी परिश्रम घेत आहेत.

**२० ब्रेकरने पाडकाम**

३० अधिकारी, कर्मचारी असे या कारवाईत कार्यरत आहेत. त्यामध्ये १० पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कडक पोलिस बंदोबस्त ठेवला आहे. वीज मंडळाचे कर्मचारीसुद्धा उपस्थित होते. दहा वर्षात तत्कालीन नगरपरिषद अधिकाऱ्यांनी या कारवाईसाठी धाडस दाखवले नव्हते म्हणून कारवाई झाली नव्हती.आत्ता मोठ्या धाडसाने पाडकाम होत असल्याने स्वामी भक्तातून समाधान व्यक्त होत आहे

**आठ दिवस चालणार मोहीम**

तिसरा आणि चौथा मजला आतून बाजूचे पाडून पूर्ण झाला आहे. शुक्रवार पहिला व दुसऱ्या मजल्याचे पाडकाम सुरू करण्यात आले आहे. आठ दिवस ही मोहीम चालणार आहे. अशाच प्रकारे विनापरवाना शहरातील बांधकामावर कारवाई करू. वर्षभरात तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहराचा चेहरामोहरा बदलू.

**- रमाकांत डाके, मुख्याधिकारी, नगरपालिका, अक्कलकोट**

## बार्शीत बिबट्याच्या वावरामुळे नागरिक भयभीत


### तातडीने उपाययोजना करण्याची वन विभागाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ डिसेंबर-**

तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन्यजीवांच्या या हालचालींमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून, अनेक पाळीव जनावरांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांनी बिबट्याच्या बंदोबस्तासाठी वन विभागाकडे तातडीने उपाययोजनांची मागणी केली आहे.

शेतकरी रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी रात्रीच्या वेळी शेतात जात असल्याने त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. विशेषतः मागील ५-१० दिवसांपासून बिबट्याच्या हल्ल्यांमुळे पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमिवर, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, शेतीच्या कामांसाठी जाणे कठीण झाले आहे. याप्रकरणी माजी मंत्री आणि बार्शी विधानसभेचे आमदार ड. दिलीप सोपल यांनी वन विभागाला तातडीने उपाययोजना करण्याचे निवेदन दिले आहे. त्यांनी बार्शी वन विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी करे मॅडम यांच्याशी संपर्क साधून बिबट्याच्या बंदोबस्तासाठी त्वरित पावले उचलण्याची मागणी केली.

आ. सोपल यांनी नमूद केले की, बिबट्याच्या बंदोबस्तासाठी बार्शी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसोबतच इतर जिल्ह्यांतील वन कर्मचाऱ्यांची मदत घेतली जावी. तसेच, बिबट्याला पकडण्यासाठी तातडीने सापळा लावावा, जेणेकरुन नागरिकांमध्ये असलेली दहशत कमी होईल आणि शेतकरी व पशुपालक सुरक्षित राहतील. स्थानिक नागरिकांनी वन विभागाकडे तातडीने पुढाकार घेण्याची मागणी केली आहे. बिबट्याच्या वावरामुळे पिकांचे होणारे नुकसान आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी योग्य ती खबरदारी घेणे, हे वन विभागाचे कर्तव्य आहे. बिबट्याच्या हलचालींवर लक्ष ठेवून योग्य ती कारवाई लवकरात लवकर होणे गरजेचे असल्याचे नागरिकांनी सांगितले.



**तात्काळ बंदोबस्त करा**

बार्शी परिसरातील ग्रामस्थांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, तातडीने सापळा रचून बिबट्याचा बंदोबस्त करण्यात यावा. तसेच, नागरिकांच्या सुरक्षेसाठी रात्रगस्त वाढवून, गावांमध्ये सतर्कतेबाबत सूचना देण्याचीही विनंती केली आहे.

**उपाययोजना करण्याची मागणी**

बार्शी तालुक्यातील या बिबट्याच्या वावरामुळे निर्माण झालेली भीती दूर करण्यासाठी आणि नुकसान थांबवण्यासाठी प्रशासनाने त्वरेने उपाययोजना कराव्यात, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

## मंद्रुपध्ये वीरभद्रेश्वर यात्रेला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १३ डिसेंबर-**

मंद्रुपसह पंचक्रोशीत जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध पावलेल्या येथील श्री वीरभद्रेश्वर देवाच्या यात्रेस शुक्रवारपासून प्रारंभ झाला असून यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी दुपारी बारा वाजता अग्निप्रवेशाचा मुख्य कार्यक्रम होणार आहे.

दरवर्षी मोठ्या उत्साहामध्ये वीरभद्रेश्वर यात्रा संपन्न होते. यंदा यात्रेनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी,पहाटे श्री वीरभद्रेश्वर देवास महारुद्राभिषेक करण्यात आले असून रात्री नऊ वाजता अग्नी प्रज्वलित करण्यात येणार आहे. त्यानंतर याचठिकाणी शोभेच्या दारूकामाची मोठ्या प्रमाणात आताषबाजी करण्यात येणार आहे. रात्री अकरा वाजता वीरभद्रेश्वर मंदिरात श्री काशी विश्वनाथ व श्री वीरभद्रेश्वर भजनी



मंडळाचा भजनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.शनिवारी पहाटे चार वाजता श्री वीरभद्रेश्वर देवास महारुद्राभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी आठ वाजता श्री वीरभद्रेश्वर देवाची पालखी आणि नंदीध्वज अग्नी प्रवेशासाठी गावातील मुख्य मार्गावरून मार्गस्थ होणार आहे.यावेळी ठिकठिकाणी नामवंत पुरवतांचे धार्मिक खेळ होणार आहे. दुपारी बारा वाजता श्री'ची पालखी, नंदीध्वजासह अग्निप्रवेशाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

## अपघातात कोठारी गॅस एजन्सीच्या मालकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी/वैराग दि १३ डिसेंबर-**

सोलापूरला कांदा घेऊन जाणाऱ्या आयशर टेम्पोचा आणि चारचाकी वाहनाचा अपघात होऊन एक जण जागीच ठार झाला आहे. हा अपघात गुरुवारी रात्री साडेनऊच्या सुमारास झाला असून या अपघातामध्ये बार्शी येथील ए. आर. कोठारी गॅस एजन्सीचे मालक सागर जयेश कोठारी यांचे निधन झाले आहे.

कुसळंब येथून सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्रीसाठी आयशर टेम्पो (क्र. एम. एच. ४८/ ए. आर. ५८५८)) चाललेला असताना तो



राळेरासजवळ आला असता समोर सोलापूरहून बार्शीकडे परतणाऱ्या एका चारचाकी गाडीचा (क्र. एम. एच. १३/ के. ९९०९) जोरदार अपघात झाला. अपघात इतका तीव्र होता की यातील चारचाकी कारचे चालक सागर कोठारी यांचे जागेवरच अपघाती निधन झाले. दरम्यान याच रस्त्यावरती दुसरा अपघात अवघ्या तीनशे मीटर अंतरावर अर्ध्या तासापूर्वी एका उसाच्या ट्रॅक्टरचा आणि कारचा अपघात झालेला होता.

## भेंड येथे लाळ-खुरकत रोग प्रतिबंधक लसीकरण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १३ डिसेंबर-**

भेंड (ता. माढा) येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ वरवडे यांच्यामार्फत आणि तेजस युथ फाउंडेशन यांच्या सौजन्याने लाळ-खुरकत रोग प्रतिबंधक लसीकरण व वंध्यत्व निवारण शिबिर घेण्यात आले. सदर शिबिरात शेतकऱ्यांच्या जनावरांना लसीकरण करण्यात आले. लसीकरणासाठी डॉ.नामदेव गायकवाड, डॉ.सोहम पाटील, डॉ. निखिल दळवी, डॉ. रमेश जाधव, डॉ. संतोष भोरे, डॉ. पवार, डॉ. सुरवसे उपस्थित होते. शेतकऱ्यांना पशुधन पालन करत असताना शासनाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. यावेळी माजी सभापती शिवाजी कांबळे, पशुसंवर्धन



अधिकारी डॉ. सचिन मोरे, डॉ. सातव, सरपंच डॉ. संतोष दळवी, उपसरपंच प्रवीण गायकवाड, अरुण सावंत, ज्ञानदेव दळवी, सौदागर बरडे, हिरालाल मुलाणी, महेश मते, केशव आवटे, लक्ष्मण मते, महादेव दळवी, माऊली जानराव, अंकुश सावंत, बाळासाहेब भोगे, महादेव दळवी, बालाजी दळवी, बच्चन जाधव, स्वप्नील सावंत, बाळासाहेब दळवी, शिवाजी दळवी, गणेश मुटकुळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## माढ्याच्या आमदारांनी वाचला रेल्वे समस्यांचा पाढा

### आ. अभिजीत पाटील यांनी मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर धर्मवीर मीना यांची घेतली भेट; मांडल्या अडचणी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १३ डिसेंबर-**

माढ्याचे आ. अभिजीत पाटील यांनी शपथ घेतल्यानंतर स्वराज्याची राजधानी रायगड येथे छत्रपतींच्या गादी समोर नतमस्तक झाले होते. यावेळी त्यांनी माढा मतदारसंघात परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींचे स्मारकाने होणार असल्याचे जाहीर करून माढा मतदारसंघाच्या विकासाचा संकल्प केला होता. अल्पावधीतच कर्तव्यदक्ष आमदार म्हणून ओळखले जाणारे अभिजीत



पाटील यांनी शुक्रवारी कुर्डूवाडी येथे वार्षिक स्टेशन इन्स्पेक्शन संदर्भात आलेले मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर धर्मवीर मीना यांची भेट घेऊन मतदार संघातील विविध ठिकाणी रेल्वे सुविधेबाबत सविस्तर चर्चा करून जनहिताच्या मागण्या मांडल्या. यावर रेल्वे अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने लवकरच मतदार संघातील रेल्वे बाबतच्या सर्व सुविधा नागरिकांना मिळणार आहेत. याप्रसंगी रेल्वे अधिकाऱ्यांसोबत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत माढा विधानसभेचे आमदार पाटील यांनी मतदार संघातील मोडनिंब येथे कार्गो टर्मिनल बाबत सविस्तर चर्चा केली. या कामाची अंतिम टप्प्यातील प्रक्रिया वेगाने सुरू आहे. हे काम पूर्ण करावे. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा माल कमी वेळेत आणि कमी खर्चात बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्यास सहकार्य होईल असा विश्वास दिला. यावेळी त्यांनी माढा-वडशिंगे महातपूर उड्डाणपुलाबाबत मागणी केली. त्यातील दोन पूल बांधणी बाबत मान्यता मिळाली असून व एकाचे सर्वेक्षण करण्याचे आश्वासन रेल्वे अधिकाऱ्यांनी दिले. तसेच माढा रेल्वे सुशोभीकरण करण्याबाबत तसेच स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, प्रतीक्षालय (वेटिंग रूम) अशा सर्व सुविधा करण्याची मागणी केली. याचबरोबर पंढरपूर - मुंबई आठवड्यातून तीन वेळा रेल्वे आहे, ती रोज सुरू करावी अशी मागणी केली. प्रत्येक शनिवार रविवार मुंबई ते पंढरपूर-टू टायर-श्री टायर डबे वाढवावे, अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

**अधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद**

रेल्वेच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या मतदार संघातील विविध ठिकाणी रेल्वे सुविधेबाबत सविस्तर चर्चा करून जनहिताच्या मागण्या मांडल्या. या बैठकीत रेल्वे विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पुढील काळात रेल्वे विभागाच्या सहकार्याने प्रवाशांना आणि विशेषकरून शेतकरी बांधवांना विशेष लाभ होणार असल्याचे सांगत सर्व मागण्या पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचा विश्वास मतदार संघातील नागरिकांना दिला.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## कलादर्पण स्पर्धेत स्वरा मोरे हिने पटकावले दोन सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१२ डिसेंबर -**

नुकतेच अखिल भारतीय कलादर्पण तर्फे पुणे येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये २ऊ रेखाचित्र रंग भरणे स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

या स्पर्धेमध्ये पोद्दार इंटरनॅशनल स्कुल पिंपरी, पुणे इयत्ता पाचवी मध्ये शिकणाऱ्या कु. स्वरा अनिता रणजीत मोरे हिने अखिल भारतीय कलादर्पण स्पर्धेत २ रेखाचित्र आणि रंग ह्या दोन्ही स्पर्धेमध्ये २ सुवर्ण पदक मिळविले. कु. अनिता मोरे हिने मिळविलेल्या या यशाबद्दलतीचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.

भविष्यामध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरून सुवर्णपदकावर नाव कोरणार असे मत कु. स्वरा अनिता रणजीत मोरे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### मुर्टा येथे शालेय विद्यार्थ्यांनी बांधला श्रमदानातून वनराई बंधारा

**जळकोट, दि.१३ डिसेंबर -**

येथून जवळच असलेल्या मुर्टा येथील भगवंत माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनी व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने श्रमदानातुन येथील नाल्यावर वनराई बंधारा बांधण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्यावतीने पाणी आडवा, पाणी जिरवा हा उपक्रम राबवले जात आहे केला. या वनराई बंधाऱ्यामुळे नाल्यामध्ये पाणी साटून राहिल्याने ते पाणी जमिनीत मुरल्याने परिसरातील विहीर, बोर आदिंना कायम पाणी राहील. जमिनीमध्ये ओलावा टिकून राहून शेती कायम हिरवीगार राहू शकते. याकामी मुर्टा गावचे कृषी सहाय्यक पी.डी. शिंदे, बी.पी. राठोड, शाळेचे मुख्याध्यापक सचिन कांबळे, सहशिक्षक कदम मनोज, शिंदे राजकुमार, कदम प्रदिप, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष नेताजी सूरवसे, उपाध्यक्ष लक्ष्मण सुरवसे विद्यार्थी प्रतिनिधी शेजल लक्ष्मण सुरवसे, शाळेतील विद्यार्थी यांनी एक दिवसाचे श्रमदान करून वनराई बंधारा बांधला. गावकऱ्यांनी या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले असून, सर्व शिक्षक विद्यार्थी यांचे अभिनंदन होत आहे.



### परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ कळंब कडेकोट बंद

**कळंब, दि.१३ डिसेंबर -**

परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ कळंब येथे कडेकोट बंद पाळण्यात आला असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिल्पाची तोडफोड करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी समस्त संविधान प्रेमी कळंब यंच्या वतीने मुख्यमंत्री यांच्याकडे उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत करण्यात आली आहे. संविधान प्रेमी कळंबच्या वतीने शहर बंद करून रॅलीद्वारे उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील भारतीय संविधान शिल्पाची तोडफोड करणाणाऱ्या देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा व कडक शासन करण्यात यावे या मागणीसाठी व परभणी मधील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना कोंबींग ऑपरेशन करून कार्यकर्त्यांना अटक करत आहेत. ते लवकरात लवकर अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. भारतीय संविधान शिल्पाची तोडफोड करण्याऱ्या देशद्रोहीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



### सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत प्रवीण थोरबोले जिल्हयात प्रथम

**धाराशिव, दि.१३ डिसेंबर -**

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमधील आठवीमध्ये शिकणारा विद्यार्थी प्रवीण गोरखनाथ थोरबोले यांने सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत जिल्हयात प्रथम क्रमांक पटकावला. नामांकित संजीवन पब्लीकेशन, सोलापूर यांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेत लातूर, बीड, धाराशिव या तीनही जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला त्याबद्दल प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक सुनील कोरडे यांच्या हस्ते प्रवीणला रुपये एक हजाराचा धनादेश, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देऊन सत्कारीत करण्यात आले तर पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालाबद्दल त्याला शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या. यावेळी त्याला मार्गदर्शन करणारे राजेंद्र जोगदंड, सुभाष संकपाळ, शेषनाथ वाघ, शिवाजी धोंगडे, भारत गवळी, शाहजान शेख, सुरेंद्र पडवळ यासह विदयार्थी उपस्थित होते.



### श्री कॉम्प्युटर्सला ज्ञान महामंडळाचे प्रशस्तीपत्र

**जळकोट, दि.१३ डिसेंबर -**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ संचलित तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील श्री कॉम्प्युटर्स या संगणक क्षेत्रातील केंद्राला सन २०२४ या वर्षात विविध कोर्सेसचे प्रवेश, प्रशिक्षण, परीक्षा व प्लेसमेंट याबाबतीत ग्रामीण भागात संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ करून विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख ज्ञान केल्याबद्दल संभाजीनगर विभागीय पातळीवरील उत्कृष्ट संगणक प्रशिक्षण केंद्र म्हणून प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. कार्यक्रमात श्री कॉम्प्युटर्सचे संचालक लक्ष्मीकांत पाटील व ज्योती पाटील यांना हे प्रशस्तीपत्र महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक विना कामत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

## गोड ऊसाची कडू कहाणी... साखर कारखाने जोमात सुरू...

# कारखानदारांच्या ऊस भावामुळे ऊस उत्पादक शेतकरी अस्वस्थ

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**तेरखेडा, दि.१३ डिसेंबर -**

राज्यात २०२४-२५ चा साखर गळीत हंगाम सुरू झाला आहे. जवळपास साखर कारखाने सुरू होऊन एक महिना उलटला आहे. अनेक साखर कारखान्याचे उसाचे भाव जाहीर केले आहेत, तर अनेक साखर कारखान्याचे अद्याप भाव स्पष्ट नाहीत. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त केली जात आहे. असेच देखील चित्र धाराशिव जिल्ह्यात पाहायला मिळत आहे. जगाचा पोशिंदा समजला जाणारा शेतकरी रात्रंदिवस शेतात राबराब राबत आपली भूक भागवतो आणि तोच शेतकरी आज संकटात सापडला आहे.

सतत दुष्काळी परिस्थिती, कर्जबाजारी पण, नैसर्गिक संकटे, पिकाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. म ागील काही दिवसांपासून सोयाबीन भावाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यातच आता ऊस भावाचा देखील प्रश्न गंभीर झाला आहे. शेतकऱ्यांच्या गोड ऊसाची कडू कहाणी आता सुरू झाली आहे. खता औषधांचे भाव गगनाला भिडले आहेत. शेतीला होणाऱ्या खर्चाचे आणि मिळणाऱ्या भावाचा ताळमेळ जुळत नसल्याने बळीराजा संकटात आहे. यंदा जरी चांगल्या स्वरूपाचा पाऊस पडला असला तरी मागील वर्षीच्या दुष्काळामुळे यंदा जिल्ह्यातील ऊसाचे क्षेत्र घटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना यंदा मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी प्रति टन ज्यादा भाव मिळेल आणि आर्थिक गणित सुधारेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. मात्र अद्याप साखर कारखान्याने चालू गळीत हंगामातील ऊस भाव स्पष्ट जाहीर केले नसल्याने शेतकरी अस्वस्थ आहेत. यावर्षी ऊसाला किती भाव मिळणार याबाबत शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे.



सध्या जिल्ह्यात ऊस तोडणी हंगाम जोरात सुरू आहे. काही ठिकाणी ऊस तोडणी यंत्रणेने तर काही ठिकाणी मजुरांकडून ऊस तोडणी केली जात आहे. ऊसाचा तुटवडा असल्याने कारखानदारांकडून या जिल्ह्यातून त्या जिल्ह्यात ऊसाची पळवापळवी सुरू झाली आहे. मात्र दरवर्षीप्रमाणे यंदाही धाराशिव विभागातील बहुतांश साखर कारखान्यांनी उसाचा भाव जाहीर करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. इतर जिल्ह्यातील साखर कारखाने ऊसाला चांगला भाव देत असल्याने शेतकऱ्यांनी दुसऱ्या जिल्ह्यात ऊस देण्यास पसंती दिली असल्याचे शेतकरी सांगत आहेत. धाराशिव जिल्ह्यात गूळ पावडर सह अनेक साखर कारखाने आहेत. दरवर्षी हे साखर कारखाने आपल्या परीने शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव देत आहेत. सरकार लक्ष देत नसल्याने कारखानदार शेतकऱ्यांच्या ऊसाला मनमानी कारभार करून कमी भाव देत आहेत. असे ऊस उत्पादक शेतकरी सांगत आहेत. यावर्षी चालू हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ३ हजार ५०० रुपये प्रति टन भाव द्या, अशी मागणी ऊस उत्पादक शेतकरी करत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच अन्य नेत्यांनी आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य भाव देऊ असे प्रचार सभात सांगितले होते.

आता निवडणुका झाल्या सरकार आले; परंतु शेतकऱ्यांच्या ऊस भावाबाबत कोणीही बोलण्यास तयार नाहीत. तसेच साखर कारखानदार मूग गिळून गप्प बसले आहेत. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याचे शेतकरी वर्गात बोलले जात आहे. आता सरकार ऊस भाव प्रश्नांवर काय भूमिका घेत आहे हे बघणे गरजेचे आहे.



## कनगऱ्याचे सरपंच मधुकर गंगणे यांचे सरपंचपद रद्द

### जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांचे आदेश...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ डिसेंबर -**

तालुक्यातील कनगरा येथील ग्रामपंचायतचे सरपंच मधुकर भीमराव गंगणे यांनी शासनाची फसवणूक करून बोगस जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूक लढवून सरपंच झाले होते. मात्र जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांच्याकडे आलेल्या तक्रारीनंतर व जात पडताळणी समितीने दिलेल्या निर्णयाच्या आधारे गंगणे यांचे सरपंच पद रद्द केले आहे. हे आदेश दि.२९ नोव्हेंबर रोजी दिले आहेत. दरम्यान, बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे आरक्षित जाग्यावर पाय पसरून बसलेल्यांचे धाबे दणाणले असून या प्रकरणात खोटे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई होणार? असल्याचे संकेत देण्यात आले असून त्या अधिकाऱ्यावरही कारवाई टांगती तलवार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की धाराशिव तालुक्यातील कनगरा येथील ग्रामपंचायत निवडणूक २०२२ साली डिसेंबरमध्ये पार पडली. हे सरपंच पद अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले होते. मधुकर गंगणे हे हिंदू कलाल ओबीसी (नागरिकांचा मागास प्रवर्ग) या प्रवर्गात येत असताना देखील त्यांनी प्रशासनाची दिशाभूल करून हिंदू खाटीक या जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करून ही निवडणूक लढवली होती. ते निवडणुकीमध्ये जिंकल्यामुळे सरपंच पदावर विराजमान झाले. या विरोधात विठ्ठल बागड सुरवसे यांनी जिल्हा जात पडताळणी समिती व जिल्हाधिकारी यांच्याकडे २०२३ मध्ये तक्रार केली होती. जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा जात पडताळणी समितीने दक्षता पथक व तोंडी युक्तिवाद करून सर्वंकष विकास विचार करून मधुकर गंगणे हे खाटीक अनुसूचित जातीचे नसून ते कलाल ओबीसी (नागरिकांचा मागास प्रवर्ग) या प्रवर्गात असल्याचे सिद्ध झाले.

त्यामुळे जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी गंगणे यांचे सरपंचपद रद्द करण्याचा आदेश दिला आहे. या निर्णयामुळे गंगणे यांचे बिंग फुटले असून आता त्यांना खुर्चीवरून पाय उतार व्हावे लागणार आहे.

## नागरिकांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य द्यावे : आ. प्रवीण स्वामी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ डिसेंबर -**

नागरिकांच्या अडचणी किरकोळ स्वरुपाच्या असतात. मात्र प्रशासनाकडून त्या सोडविण्यासाठी विलंब केला जातो. नागरिकांच्या त्या अडचणी सोडविण्यासाठी प्राधान्य द्यावे, अशी सक्त ताकीद नवनियुक्त आ. प्रविण स्वामी यांनी प्रशासनाला आयोजित आढावा बैठकीत दिली.

नूतन आमदार प्रवीण स्वामी यांनी लोहारा तहसील कार्यालय येथे लोहारा तालुक्यातील नागरिकांच्या अडचणी संदर्भात घेतली. आढावा बैठकीस विभाग प्रमुखांना बैठक बोलावण्यात आले होते.

यावेळी त्यांनी पुढील काळात प्रत्येक विभाग निहाय आढावा बैठकीचे आयोजन करून नागरिकांच्या अडी-अडचणी सोडविल्या जातील, असे सांगितले.

या आढावा बैठकीस नगरपंचायत, पुरवठा विभाग, शिक्षण विभाग, पोलीस विभाग, विद्युत विभाग, पाटबंधारे विभाग, शेतीरस्ते या संदर्भात प्रामुख्याने तालुक्यातील नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या. आमदार झाल्यानंतर प्रवीण स्वामी तातडीने बैठक घेऊन तालुक्यातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले त्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

या बैठकीसाठी तहसीलदार रंजीत कोळेकर, तालुक्यातील सर्व विभागाचे प्रमुख, पोलीस विभागाचे प्रमुख उपस्थित होते. तालुक्यातील नागरिकांनी या बैठकीला मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. उपस्थित नागरिकांनी प्रश्न आ. प्रविण स्वामी यांच्यासमोर मांडले.

## डॉ. वेदप्रकाश विद्यामंदिर शाळेच्या नवीन इमारतीचे डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ डिसेंबर -**

परंडा येथे धनेश्वरी शिक्षण समूहाचे संस्थाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते शहरातील डॉ. वेदप्रकाश विद्यामंदिर या शाळेच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले.

या शाळेची भव्य, प्रशस्त, अत्याधुनिक पद्धतीची इमारत उभारण्यात येणार आहे. परंडा शहर व तालुक्यातील विद्यार्थ्यांना चांगल्या व दर्जेदार शिक्षणाची शिक्षणाची सोय व्हावी, अत्याधुनिक भौतिक सुविधा, शासन नियमानुसार वर्गखोल्या, पुरेशे व्हेंटिलेशन, सर्व प्रकारच्या लॅब्स, इ -ग्रंथालय, कंप्यूटर लॅब, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विशेष हॉल, इंटरऍक्टिव्ह बोर्ड्स इ. सर्व सोयीयुक्त बिल्डिंग उभारण्यात येणार असल्याचे उदघाट्न प्रसंगी डॉ. पाटील यांनी सांगितले.



यावेळी प्रसिद्ध कॉप्युटर तज्ञ मुज्जमील माशायक, संत मीरा स्कूलचे प्राचार्य संतोष भांडवलकर, प्राचार्य अशोक राठोड, सावित्रीबाई फुले प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य प्रसाद दनाने, क्रांती ताटे, रोहनी कुंभार, पूनम शिंदे, विकास शेळके, हर्षद फासे, गणेश कोकाटे, बालाजी गोरे, रुस्तम पठाण, कैलास गिरी, माऊली गवारे, सलीम पठाण, सोहेल पठाण, सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यास मारहाण प्रकरण : प्रकरण मिटविणयासाठी पालकास गट, विस्तार शिक्षणाधिकाऱ्याकडून पैशाचे अमिष; गुन्हा दाखल करण्याची धमकी

### गटशिक्षणाधिकारी असरार सय्यद, शिक्षण विस्तार अधिकारी बापू शिंदेवर पालकांचे गंभीर आरोप... न्याय देण्याची मागणी

### पाच महिन्यानंतरही पिडित विद्यार्थ्याला न्याय मिळेना...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ डिसेंबर -**

अंबेजवळगे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी अहिल अल्ताफ शेख यास सहशिक्षिका पुजा बळे यांनी बेदाम मारहाण केल्याने त्या विद्यार्थ्यांने शाळेत येणेच बंद केल्याची धक्कादायक घटना गेल्या पाच महिन्यापुर्वी घडली आहे.

या प्रकरणाच्या चौकशीचा अहवाल प्राथमिकचे शिक्षणाधिकारी यांच्याकडे धुळखात पडून आहे. हे प्रकरण मिटविण्यासाठी गटशिक्षणाधिकारी असरार सय्यद आणि शिक्षण विस्तार अधिकारी बापू शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या पालकास पैशाचे अमिष दाखवून ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल करण्याची धमकीही दिली असल्याचे निवेदन पालकाने दिले आहे. निवेदनात म्हटले आहे, दि.८ जुलै २०२४ रोजी जि.प.प्रा. शाळा अंबेजवळगे या शाळेत पालय अहिल अल्ताफ शेख यास शाळेतील सहशिक्षीका पुजा कृष्णकुमार बळे यांनी बेदम मारहण केली होती.

तसेच त्यास शाळेत न येणेसारखे केले होते. त्यावेळी शेख यांच्या पाल्यास शासकीय रुग्णालय धाराशिव येथे दाखल केले होते.




मारहाणीत मुलाला गंभीर इजा झाल्याची दिसून आले होते. मुलाला न्याय मिळावा यासाठी पालकांनी प्रशासनाकडे सतत पाठपुरावा केला.

### प्रशासनाचे केवळ कागदी घोडे....

मुलाला मारहाण होवून आज पाच महिन्याचा कालावधी लोटला आहे. पिडीत मुलाच्या वडिलांनी न्यायासाठी अनेक कार्यालयाचे उंबरठे झिजवले आहेत. यामध्ये शाळेचे मुख्याद्यापक तांबे यांना १० जुलै रोजी तक्रारी अर्ज, शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्याकडे दि.१२ जुलै तक्रारी अर्ज, सामान्य प्रशासन, विभाग जिल्हा परिषद धाराशिव यांना दि.१२ जुलै रोजी तक्रारी अर्ज, गटशिक्षणाधिकारी धाराशिव यांच्याकडे तक्रारी अर्ज दि.१५ जुलै रोजी तक्रारी अर्ज, जिल्हा पोलीस अधिक्षक, धाराशिव, महिला बालविकास कार्यालय धाराशिव यांना तक्रारी अर्ज दिले आहेत. मात्र, प्रशासनाकडून केवळ कागदी घोडे नाचविण्याशिवाय काहीच कारवाई करण्यात आली नाही.

मात्र प्रशासनाकडून केवळ कागदी घोडे नाचविण्यात आले. याप्रकरणी शेख यांना कुंटूंबासह गावही सोडावे लागल्याची दुर्देवी बाब घडली आहे.

पिडीत विद्यार्थ्यांच्या पालकांने न्यायासाठी विविध कार्यालयास तक्रारी अर्ज दिले.

मात्र, त्यांच्याकडून पालकास केवळ बघू याव्यातिरिक्त काहीच उत्तर मिळाले नाही. तसेच याप्रकरणीची चौकशी झाली मात्र, त्याचा अहवालवरही काहीच कारवाई झाली नाही.

तसेच हे प्रकरण मिटवण्यासाठी विद्यार्थ्याच्या पालकास घाटंग्री रोडवर बोलावून गटशिक्षणाधिकारी असरार सय्यद, शिक्षण विस्तार अधिकारी बापू शिंदे यांनी पैशाचे अमिष दाखवुन अर्ज मागे घेण्यास सांगत दबाव टाकला. तु कशाला त्याचे नादी लागतो... सर, मॅडमही ॲट्रासिटीअंतर्गत गुन्हा नोंद करेल, असे वारंवार सांगुन धमकाऊ लागले होते, असा विद्यार्थ्यांच्या पालकाने निवेदनात केला आहे.


सोलापूर तरुण भारत

धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट नेमणे आहेत

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-२ (कमिशनवर)
तेर, ढोकी, अंबेजवळगे, कसबे तडवळे, पाडोळी (आ.), कनगरा, बेंबळी, पाटोदा, केशेगाव, वडगांव (सि.), पळसप, जागजी, पोहनेर, जुनोनी, कोंड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर शहर, तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, अपसिंगा, काक्रांबा, आरळी (बु.), किलज, चिकुंद्रा, जवळगा, वाणेगाव, वडगाव (देव), सलगरा, वागदरी, गुळहळ्ळी, निलेगाव, सिंदगाव, कुन्सावळी, सलगरा (दि.), होर्टी.

**लोहारा तालुका :** लोहारा शहर-तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, नागराळ, एकोंडी, सास्तुर, तावशीगड, सालेगाव, हराळी, जेवळी, आष्टा, भोसगा, अचलेर, फणेपुर.

**उमरगा तालुका :** शहर-तालुका प्रतिनिधी, पेठसांगवी, नारंगवाडी, नाईचाकुर, समुद्राळ, बेटजगळगा, कलदेव (लिं), कोराळ, बलसुर, येणेगुर, दाळींब, सुंदरवाडी, आलुर, बेळंब, वरनाळवाडी, कदेर, औराद, खसगी, बेडगा, डिग्गी, मळगी, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, गुगळगाव, माडज, त्रिकोळी, एकूरगा, जेकेकुर, बेटजवळगा.

**कळंब तालुका :** शहर प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, मोहा, मस्सा, सापनाई, चोराखळी, माळकरंजा, निपाणी, पाडोळी (ना.), रायगव्हाण, रांजणी, शिरपूर (अ), शिराढोण, नागुलगाव, करंजकल्ला, लोहटा (पू), डिकसळ, इटकूर, बाहुला, खोदला, कन्हेरवाडी, तांदूळवाडी.

**वाशी तालुका :** तालुका प्रतिनिधी, पार्डी, कन्हेरी, सरमकुंडी, इझोरा, घाटनांदूर, चांदवड, अजनसोंडा, गिरवली, पारगाव, हातोला, फकाबादवाडी, जवळका, पारा, सेलू, पिंपळगाव (लिं), दसमेगाव, सोनारवाडी, मांडवा, सारोळा (मां), गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, ढगप्रिंप्री, आसू, कात्राबाद, सरणवाडी, हिंगणगाव (ब्रु), दहिटणा, खासापूरी, जवळा, जकेप्रिंप्री, सोनारी, रोसा, डोंजा, इनगोंदा, शेळगांव, चिंचपूर (बु), अनाळा, रोहकल, पांढरेवाडी, बावची, घारगाव.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, हाडोंग्री, वाकवड, सोनगिरी, सुकटा, देवळाली, माणकेश्वर, वांगी (ब्रु) अंतरगाव, चिंचपूर, वालवड, अंभी, अंतरवली, लांजेश्वर, निपाणी, ज्योतीबाची वाडी, ईराचीवाडी, पाथरूड, पाटसांगवी, अंतरगाव, चुंबळी, पखरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.१५ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत मुलाखतीसाठी खालील पत्यावर हजर रहावे.

: कार्यालय पत्ता :
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा कार्यालय,
ॲड. मसलेकर यांचे निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.
मो.नं. ९३७३४३८३५२ / ८४२१४८९७२०

## सोयगाव तालुक्यातील घोसला येथे बालकांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधी वाटप




सोयगाव,दि.१३ डिसेंबर : सोयगाव तालुक्यातील घोसला येथे अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्य तपासणी शिबिरात २० बालकांचे आरोग्य तपासणी सामुदाय आरोग्य अधिकारी डॉ.सचिन हाके यांनी केली.यानंतर या बालकांना संजय शहापूरकर यांच्या हस्ते मोफत औषधे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना संजय शहापूरकर यांनी सांगितले की कुपोषण कमी करण्यासाठी आता बालकांच्या आरोग्य तपासणीचे नियोजन प्रत्येक उपकेंद्रात होणार असून त्यासाठी अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांचे सहकार्य लाभणार आहे. घोसला येथे या उपक्रमाचे सुरुवात झाली असून आता सतत त्याने हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या आरोग्य तपासणी शिबिरात गर्भवती मातांचे आरोग्य तपासणी करण्यात आली त्यांना लोहयुक्त औषधे वाटप करण्यात आली. याप्रसंगी डॉ.सचिन हाके,आरोग्य सेवक विजय पंडित, अंगणवाडी सेविका लिलाबाई पाटील,छाया पाटील, मदतनीस देवकाबाई सोनगीर,पुष्पा पाटील,आशा सेविका मंदाबाई पाटील व योगिता जोहरे उपस्थित होते.

## दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. हजारे



वाळूज महानगर, (प्रतिनिधी) – बजाजनगर परिसरातील दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. राहुल हजारे यांची नियुक्ती करण्यात आली. प्रभारी प्राचार्य डॉ युवराज धबडगे यांनी डॉ. हजारे यांना पदभार देऊन स्वागत केले. यावेळी प्रा. डॉ. युवराज धबडगे, उप प्राचार्य डॉ संजय सांभाळकर, डॉ भरतसिंग सलामपूरे डॉ. भगवान डोके यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

## किशोर ललवाणी यांची राज्य सदस्यपदी निवड



छत्रपती संभाजीनगर: भारतीय जैन संघटनेचे विभागीय अध्यक्ष किशोर ललवाणी यांची संघटनेच्या राज्य सदस्यपदी निवड करण्यात आली. पुण्यातील वर्धमान सांस्कृतिक भवन येथे आयोजित १८ व्या राष्ट्रीय अधिवेशन २०२४ दरम्यान भारतीय जैन संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य, इन्फ्युजन प्रोग्राम, एमएसएमइ आणि मायनॉरिटी सहप्रमुखपदी किशोर ललवाणी यांची नियुक्ती झाली. ही नियुक्ती संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथ्था यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य अध्यक्ष केतनभाई शहा यांनी केली. या निवडीबद्दल राष्ट्रीय समिती सदस्य गौतम संचेती, महाराष्ट्र राज्य सचिव प्रवीण पारख, पारस बागरेचा, जिल्हा अध्यक्ष अनिल संचेती, राजेंद्र पगारिया, राहुल झांबड, पारस चोरडिया, अभिजीत हिरप, गौतम भंडारी यांनी शुभेच्छा दिल्या.



## सौ निताबाई विजय भवर दु:खद निधन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ डिसेंबर: निताबाई विजय भवर वय ६५ वर्ष रा मारवाडी गल्ली बिडकीन ता. पैठण यांचे दि १२ गुरुवार रोजी रात्री दोन वाजे दरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पार्थिवावर दि.१३ शुक्रवार रोजी दुपारी साडे बारा वाजता बिडकीन येथील शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यविधी करण्यात आला असून त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# एमजीएममध्ये अध्यापक विकास कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न

### 'रोबोटिक्स अँड ऑटोमिशन' या थीमवर आधारित तीन दिवसीय प्रशिक्षण संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. १३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कुल ऑफ इंजिनियरिंग अँड टेकनॉलॉजी तर्फे 'रोबोटिक्स अँड ऑटोमिशन' या थीमवर आधारित तीन दिवसीय अध्यापक विकास कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला. हा कार्यक्रम बुधवार दिनांक ११ डिसेंबर २०२४ ते शुक्रवार, १३ डिसेंबर २०२४ यादरम्यान 'शैक्षणिक कौशल्य विकास' या थीमवर आधारित तीन दिवसीय विद्याशाखीय विकास कार्यक्रम विद्यापीठाच्या विनोबा भावे प्रेक्षागृहात यशस्वीपणे संपन्न झाला.

यावेळी, कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.एच.एच. शिंदे, संचालिका डॉ. परमिंदर कौर, इशरे सीएसएन प्रमुख सय्यद बिलाल कादरी, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

अशा प्रकारच्या अध्यापक विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती एकत्र येऊन ज्ञानाचे आदान प्रदान करीत असतात. याचा फायदा प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना होत असून त्यांना समकालीन अद्ययावत तंत्रज्ञानाची ओळख होते. या तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये शैक्षणिक क्षेत्रातील विषयतज्ञांनी विविध सत्रांमध्ये उपस्थितांशी संवाद साधला. या तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये राज्यभरातून संबंधित विद्याशाखेचे विषयतज्ञ, पी. एच. डी./ एम. फील/ संशोधक, प्राध्यापक, पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि सर्व संबंधित सहभागी झाले होते. यामध्ये शैक्षणिक क्षेत्रातील ५०, औद्योगिक क्षेत्रातील २० आणि ४० विद्यार्थ्यांनी अशा ११० लोकांनी आपला सहभाग नोंदविला होता.

तेजस आचार्य, प्रमोद पांडे, प्रदीप पाडसवान, राहुल पटले, शेखर राम, नीरज मगनानी, संदीप मुतालिक आदि वक्त्यांनी रोबोटिक्स – इमर्जिंग ट्रेंड्स, ऑटोमेशन – इमर्जिंग ट्रेंड्स, इंडस्ट्री ४. ० अँड स्मार्ट इंडस्ट्री सेट – अप, ऑटोमेशन इन हीटिंग व्हेंटिलेशन अँड एअर कंडिशनिंग (एचव्हीएसी), हॅन्ड्स – व वर्कशॉप : डेव्हलपिंग रोबोटिक्स प्रोजेक्ट, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग इन रोबोटिक्स, रोबोट सिम्युलेशन अँड प्रोग्रामिंग स्टूल्स, कंट्रोल सिस्टम्स इन हीटिंग, व्हेंटिलेशन अँड कंडिशनिंग (एचव्हीएसी), इवोल्युशन ऑफ ऑटोमेशन अँड इंटिग्रेटेड बिल्डिंग मॅनेजमेंट सिस्टम इन एचव्हीएसी, इंडस्ट्रियल व्हिजिट आदि विषयांवर उपस्थितांशी संवाद साधला.

या तीन दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संचालिका डॉ. परमिंदर कौर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या तीन दिवसीय कार्यक्रमाच्या आयोजनासाठी समन्वयक जावेद सिद्दिकी, प्रा. पियूष काळे, प्रा.विकास लोकावर, प्रा. सूर्यकांत शिंदे, प्रा. रुपाली देशमुख आदींनी यांनी अथक परिश्रम घेतले.

## कोची कोचीन ओताकेसा आणि जिल्हाधिकारी अचंबित; जळगाव मेटे जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांनी केले जापानी भाषेत स्वागत



छत्रपती संभाजीनगर, दि.१३(जिमाका):– 'कोची कोची कोचीन ओताकेसा', असे जापानी भाषेत झालेल्या स्वागताने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी अचंबित झाले. जळगाव मेटे ता. फुलंब्री या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी आज जिल्हाधिकारी यांचे थेट जापानी भाषेत स्वागत केले. विद्यार्थ्यांचे विदेशी भाषेवरील प्रभूत्व पाहून खुद्द जिल्हाधिकारी अचंबित झाले. त्यांनी या विद्यार्थ्यांचे तोंड भरुन कौतूक केले. मनरेगा योजनेतून जिल्हा परिषद शाळांमधील सुविधांचा विकास व दशसूत्री कार्यक्रमाच्या माध्यमातून संस्कारक्षम व गुणवत्ताधारक विद्यार्थी घडविण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यासाठी फुलंब्री व छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील जि.प. शाळा मुख्याध्यापकांची कार्यशाळा आज आयोजित करण्यात आली होती. छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक संस्थेच्या सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी राजर्षी छत्रपती शाहू महाराज सभागृहात दाखल झाले. तेव्हा प्रवेशद्वारावर जिल्हाधिकारी स्वामी यांचे स्वागत जळगाव मेटे येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी जापानी भाषेत स्वागत केले. अचानक व अस्खलित जापानी भाषेच्या उच्चारणाने जिल्हाधिकारी सुखावले. त्यांनी नंतर विद्यार्थ्यांना या वाक्यांचा अर्थही विचारला व विद्यार्थ्यांनी त्यांना अर्थ समजावून सांगितला. सुवर्णा कांबळे या उपक्रमशील शिक्षीका विद्यार्थ्यांना जापानी भाषा शिकवित असतात. प्राथमिक व दैनंदिन जीवनातील संवादाची वाक्ये, शब्द त्यांचे अर्थ या विद्यार्थ्यांना शिकविण्यात येतात. वेगळी भाषा शिकून त्यात प्राविण्य मिळविणे, संवाद साधण्याच्या कौशल्याचा विकास व्हावा यादृष्टीने हा उपक्रम शाळेत राबविला जातो. नारायण जाजेकर हे या शाळेचे मुख्याध्यापक असून या शाळेने अनेक पुरस्कार पटकावले आहेत.

## सोमवारी (दि.१६) महिला लोकशाही दिन

छत्रपती संभाजीनगर, दि.१३(जिमाका):– जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजीत केला जातो. त्याअनुषंगाने सोमवार दि.१६ रोजी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सकाळी ११ ते १२ या वेळात जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे. या महिला लोकशाही दिनात महिलांच्या तक्रारींची दखल घेतली जाते. त्यासाठी महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल करावी. तक्रारी वैयक्तिक स्वरुपाची असावी, प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, सेवा व आस्थापनाविषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. तरी महिलांनी या लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीमती आर.एन.चिमद्रे यांनी केले आहे.

## ग्रीस्टॅक प्रकल्प सोमवार पासून प्रत्येक गावात

छत्रपती संभाजीनगर, दि.१३(जिमाका):– विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहोचवता यावा यासाठी कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजीटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ग्रिस्टॅक (ऊळसळींरश्र झीलश्रळल खपषीरीीींलींीीश षी –सीळर्लीश्रींीीश) ही योजना राबविण्यात येत असून या योजनेचे काम सोमवार दि.१६ पासून प्रत्येक गावात सुरु करण्यात येत आहे. सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी दि.१६ ते दि.१८ या तीन दिवसांत आपापल्या गावात जाऊन गावनिहाय फार्मर आयडीची नोंदणी करावी,असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांनी दिले आहेत. जिल्ह्यात सोमवार दि.९ पासून प्रत्येक तालुक्यातील एक गाव याप्रमाणे काम करण्यात आले. त्याअनुभवाच्या आधारे आता सोमवार दि.१६ ते दि.१८ या कालावधीत प्रत्येक गावात फार्मर आयडी नोंदणी सुरु होईल. त्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य व सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली आहे. यासंदर्भात केलेले नियोजन व झालेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्व पथकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात द्यावयाचा आहे,असेही खिरोळकर यांनी आदेशात म्हटले आहे.

## मासेमारी करणाऱ्यांनाही मिळणार किसान क्रेडीट कार्ड; मच्छिमार संस्थांना नोंदणी करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.१३(जिमाका):– मासेमारी करणारे मच्छिमार, मत्स्यकास्तकार यांना किसान क्रेडीट कार्डची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी दि.१५ मार्च २०२५ पर्यंत मोहिम राबविण्यात येत आहे. तसेच प्रधानमंत्री मत्स्य किसान सह–समृद्धी योजनेअंतर्गत मत्स्य व्यावसायिक, मच्छिमार सहकारी संस्था इ. ची नोंदणीही करण्यात येत आहे. नाव नोंदणी करण्यासाठी मत्स्य व्यावसायिक , मच्छिमार, सहकारी संस्था यांनी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, दुग्धव्यवसाय विकास विभाग, पहिला माळा, दुध डेअरी सिग्नल जवळ, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय डॉ. मधुरिमा जाधव यांनी केले आहे.

## आई–वडिलांची सेवा करून आपल्या संसारात येणाऱ्या अडीअडचणी दूर करा आणि येणाऱ्या पिढीला संस्कार लावा : सद्गुरु अक्काताई महाराज



खुलताबाद प्रतिनिधी . आडगाव खुर्द येथे फिरता अखंड हरिनाम सप्ताह , मोठ्या उत्साहात आडगाव खु येथे नाथ , आश्रम प्रमुख सद्गुरु अक्का महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गेल्या ४० वर्षापासून चालू असलेला अखंड फिरता नारळी सप्ताह यावर्षी या ठिकाणी संपन्न होत आहे

या अखंड हरिनाम सप्ताह दरम्यान महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांचे दैनंदिन कार्यक्रम होत असून या ठिकाणी लाभ घेण्यासाठी महाराष्ट्रभरातील सद्गुरु अक्काताई महाराज यांना मानणारा भक्त मंडळ आवर्जून उपस्थित राहत आहे. या अखंड हरिनाम सप्ताह चा काला रविवार . रोजी , होणार असून. भामाठाण अडबंगनाथ संस्थान प्रमुख अरुणा नाथ गिरीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. या पंचक्रोशीतील भक्तमंडळीने सर्व सर्वतोपरी मदत करू भव्य दिव्य अशाप्रकारे आयोजन करू या भागात भक्तीमय वातावरण सेवा करण्याची सर्व आडगाव करांनी व, परमपूज्य स्वामी विनायक जी महाराज संस्थान श्रीकृष्ण मंदिर. यांचे व छत्रपती संभाजी नगरचे खासदार संदीपानजी भुमरे जालना. खासदार , डॉक्टर कल्याण काळे फुलंब्री मतदार संघाचे आमदार अनुराधाताई चव्हाण यांचे या फिरत्या अखंड हरिनाम सप्ताह साठी विशेष सहकार्य लाभले.

## एमजीएम'मध्ये 'फूड कार्निवल' चे आयोजन

### खाद्यप्रेमींना घेता येणार विविध खाद्य संस्कृतीचा आस्वाद


छत्रपती संभाजीनगर, दि.१३ : नववर्ष आणि ख्रिसमस यांना समोर ठेवत महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटतर्फे 'फूड कार्निवल' या खाद्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर २०२४ आणि शनिवार, दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी एमजीएम सॉल्ट येथे संपन्न होत आहे.

या महोत्सवात विविध प्रदेशांच्या पदार्थांपासून संस्कृतीपर्यंत अनेक वैशिष्ट्यांचा समावेश असणार आहे. भव्य बुफे मेनूमध्ये स्टार्टरपासून ते डेझर्टपर्यंत तसेच विविध ॲकॉम्पनिमेंट्ससह शहरातील प्रसिद्ध सी वॉटर फिश देखील समाविष्ट असणार आहे. या महोत्सवातील संपूर्ण तयारी यामध्ये जेवण तयार करण्यापासून ते अन्नसेवा, पाहुण्यांची काळजी घेणे, लाईव्ह परफॉर्मन्स आणि इतर मनोरंजन हे सर्व विद्यार्थी करणार आहेत. यासाठी त्यांना त्यांच्या प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले आहे. तसेच स्विमिंग पूलच्या काठावर विशेष आकर्षणे, लाईव्ह काउंटर्स व इतर आकर्षणे सजविण्यात आली आहेत. या महोत्सवातील मुख्य आकर्षण अन्नाबरोबरच मनोरंजन देखील आहे, ज्यामध्ये संस्थेचे विद्यार्थी बँड परफॉर्मन्स सादर करतील. हा महोत्सव सर्वांसाठी खुला असून तिकिटे 'द सॉल्ट' व एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट येथे उपलब्ध आहेत.

या महोत्सवात कुलपती अंकुशरव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, संचालक डॉ. कपिलेश मंगल, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

## देवमाणूस मध्ये पहिल्यांदाच झळकणार महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणेची जोडी





छत्रपती संभाजीनगर : काय ऐकलात का? मराठी चित्रपटसृष्टीतील दोन सर्वात प्रतिष्ठित कलाकार आपल्या सर्वांचे आवडते म्हणजेच महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे, त्यांच्या तीन दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत प्रथमच एका आगामी मराठी चित्रपट देवमाणूस साठी एकत्र येत आहेत.

होय वास्तव, नटसम्राट आणि मी शिवाजीराजे भोसले बोलतोय यांसारख्या चित्रपटांतील आपल्या दमदार अभिनयासाठी ओळखले जाणारे अभिनेते महेश मांजरेकर यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत स्वत:चा ठसा चांगलाच उमटवला आहे. इंटेन्स ड्रामा ने भरपूर अशा भूमिकांपासून ते पावरफुल क्शन–पॅक व्यक्तिरेखा साकारत महेशजींनी मनोरंज विश्वात सर्वात प्रतिष्ठित अभिनेत्यांपैकी एक अशी आपली जागा बनवली आहे. दुसरीकडे अभिनेत्री रेणुका शहाणे, हम आपके है कौन, अबोली, जानिवा यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या अभूतपूर्व भूमिकांमुळे प्रसिद्ध आहेत, त्यांनी आतापर्यंत साकारलेल्या प्रत्येक भूमिकाची शोभा वाडवली आहे. टीव्ही आणि चित्रपट या दोन्ही क्षेत्रात दमदार कारकीर्दीसह, त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली आहे.

अभिनेते महेश मांजरेकर ह्यांनी ह्या सिनेमा बद्दल आपले मत व्यक्त करताना सांगितले, देवमाणूस सारख्या चित्रपटामध्ये रेणुकासोबत काम करणे हा माझ्यासाठी एक खूप बहुप्रतिक्षित सर्जनशील प्रवास वाटतो. मी सध्या या नव्या ऑन–स्क्रीन भागीदारीबद्दल खूप जास्त उत्साहित आहे आणि आशा करतो की आपले प्रेक्षक सुद्धा आमच्या या नव्या जोडीसाठी असाच उत्साह दाखवतील.

तसच अभिनेत्री रेणुका शहाणे या म्हणाल्या, देवमाणूसच्या निमित्ताने मी महेश सोबत जरी पहिल्यांदा काम करत असले तरी आम्ही एकमेकांना खूप वर्षांपासून ओळखतोय, त्यामुळे असं वाटलंच नाही की आम्ही यापूर्वी एकत्र काम केल नाहीये. मला खात्री आहे 'देवमाणूस' बघून प्रेक्षकांना काहीतरी दमदार बघितल्याचं समाधान मिळेल. खूप वर्षांनी मला मराठी चित्रपटात काम करण्याची संधी मिळालीये, त्याचा विशेष आनंद होतोय.

बहुचर्चित तेजस प्रभा विजय देवस्कर हे या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. ज्यांनी माधुरी दीक्षितचा बकेट लिस्ट, रकुल प्रीत सिंग सोबत छत्रीवाली यासारखे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. देवमाणूस सिनेमात दिग्गज कलाकार महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे एका वेगळ्याच भूमिकेत आपल्याला दिसणार आहेत जे प्रेक्षकांसाठी पूर्णपणे नवीन अनुभव असणार आहे. दोन्ही कलाकारांचे जबरदस्त अभिनय कौशल्य प्रदर्शित करण्याचे वचन हा आगामी मराठी चित्रपट देणार आहे.

### पोलिसांकडून दलितांचे होत असलेले कोंबिंन ऑपरेशन तात्काळ थांबवा

## परभणी येथील संविधान स्तंभाची तोडफोड करुन विटंबना करणाऱ्या जातीवाद्यांवर तात्काळ कारवाई करा

### सिल्लोड येथे उपविभागीय अधिकारी यांना दिले आंबेडकरी अनुयायी व संविधान प्रेमीनी निवेदन



सिल्लोड प्रतिनिधी

परभणी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करून विटंबना करण्या–या समाजकंटकावर कार्यवाही करत दलित वस्तीत सुरू असलेले कोम्बिंग ऑपरेशन तात्काळ थांबविणे बाबत व तसेच बांग्लादेशात बौध्दांवरील होत असलेल्या हिंसक अत्याचारावर भारत सरकार मार्फत त्वरित पावले उचण्याबाबत सिल्लोड येथे आंबेडकरी अनुयायी व संविधान प्रेमींनी उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी निवेदन देऊन निषेध व्यक्त केला.

सदर दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परभणी येथे एका माथेफिरूने काही दिवसांपूर्वी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेसमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करून विटंबना केली. त्यामुळे देशातील संपूर्ण संविधान प्रेमी व आंबेडकर अनुयायांमध्ये संतापाची लाट उसळली ज्या महामानवाने देशाला लोकशाही दिली संविधान दिलं त्याच महामानवाच्या अस्तित्वाला अशा नीच प्रवृत्ती समाजकंटकाकडून घाला घालून त्यांनी लिहिलेल्या संविधान स्तंभाची तोडफोड करून विटंबना केली त्यांनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केला.

सदर निवेदन देते वेळी माजी उपनगराध्यक्ष संजय आरके, डॉ प्रकाश बि–हाडे, माजी नगराध्यक्ष राजश्री निकम, आंबेडकरी विचारवंत जगदीश बेदवे, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी नारायण फाळके माजी पंचायत समिती सदस्य अनिल खरात, नगरसेवक जितेंद्र आरके, के के जगताप, सामाजिक कार्यकर्ते अशोक सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते अमित आरके, गणेश भूमकर,मनोहर आरके, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख वायर साळवे, सामाजिक कार्यकर्ते,दिलीप गवळी, प्रकाश पवार, विनोद पगारे, कडूबा दुबे, सतीश बोर्डे, दिपक आव्हाड, बारकू आरके, राजू साठे, अशोक कांबळे,चेतन गायकवाड, डी के सुरडकर,सुभाष सुरडकर, सुनील आरके, गणेश आरके, संजय आरके, शालिग्राम सोनवणे, संतोष जोगदंड, अतुल साळवे, प्रदीप आरके, संतोष पगारे, पंकज दांडगे, विनोद आरके, यांच्यासह मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायी व संविधान प्रेमी उपस्थित होते.

## वार्षिक प्रशिक्षण शिबिरात श्री सरस्वती भुवन बिडकीनच्या एनसीसीच्या विद्यार्थ्यांचे यश



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ डिसेंबर पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील एन.सी. सी.च्या विद्यार्थ्यांनी वार्षिक प्रशिक्षण शिबीरात विविध स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे.५० महाराष्ट्र बटालियन एनसीसी, छत्रपती संभाजीनगर चे वार्षिक प्रशिक्षण शिबिर ०१ डिसेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे पार पडले.या शिबिरादरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. एकांकिका स्पर्धेत प्रशालेची विद्यार्थिनी कु.प्रचिता बाबासाहेब कळसकर हिला गोल्ड मेडल मिळाले.शूटिंग स्पर्धेत कॅडेट सुजित भाऊसाहेब निळ याला सिल्वर मेडल मिळाले. रस्सीखेच स्पर्धेत प्रशालेच्या संघाचा प्रथम क्रमांक आला. समूहनृत्य स्पर्धेत प्रशालेचा द्वितीय क्रमांक आला. शुटिंग स्पर्धेत सार्जंट यश दिगंबर सर्जे व कार्पोलर ओंकार विठ्ठल कळसकर यांनी उत्तम कामगिरी केली.स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांचा सत्कार प्रशालेचे उपमुख्याध्यापक युवराज पाडळे ,प्रा. प्रशांत अपसिंगेकर ,प्रा. देशमुख, प्रा. कवठेकर, प्रा. विवेक ठोसर व प्रा. सुदाम चिंचाणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी एनसीसी ऑफिसर बाबासाहेब सोकटकर यांनी शिबिरा दरम्यान होणाऱ्या विविध स्पर्धेची माहिती दिली. स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांचे , मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे, प्रभारी पर्यवेक्षक अविनाश खैरे प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे आदींनी.

# जळकोटच्या आठवडी बाजारातील 'मापाच्या पापाची' पुन्हा बोंब

## लगाम लावणार कोण? : सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री....

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१३ डिसेंबर -**
सर्वाधिक ग्राहकांना फसविले जाणारे ठिकाण म्हणजे आठवडी बाजार. वजनांची हेराफेरी करून खुलेआम येथे ग्राहकांची फसवणूक होते. ग्राहक सर्रास लुटले जात असताना बाजारातील विक्रेत्यांवर कुणाचेही नियंत्रण नाही. ग्राहक पंचायत यासाठी वैधमापन विभागाला जबाबदार धरते, तर वैधमापन विभाग स्थानिक स्वराज्य संस्थेकडे बोट दाखवतो. शासकीय संस्थांच्या एकमेकांकडे बोट दाखविण्याच्या भानगडीत ग्राहकांचे उघड्यावर खिसे कापले जात असल्याचे चित्र सध्या जळकोट परिसरातील आठवडी बाजारांमध्ये दिसून येत आहे.

जळकोट तालुक्यातील अतनूर व जळकोट येथे सोमवारी आठवडी बाजार भरतात. जळकोट तालुक्यातील बहुतांश परिसर हे व्यापारी क्षेत्र असल्यामुळे या सर्व परिसरात मोठ्या प्रमाणात बाहेरून आलेल्या कामगारांचे वास्तव्य



आहे. त्यामुळे आठवडी बाजारांमध्ये कमालीची गर्दी असते. तसेच तालुक्यात ४७ ते ४८ खेडे पाड्यचा समावेश आहे यातील बहुतांश ग्राहक हे कामगार वर्गातले असल्याने शिवाय त्यांची कुणाशीही फारशी ओळख नसल्याने होत असलेली त्यांची लूट निमूटपणे सहन करतात आणि नेमका त्याचाच फायदा येथील विक्रेते घेत आहेत.

वजनात हेराफेरी, काटा मारणे, प्रमाणित वजनाचा उपयोग न करणे हे प्रकार सर्रास विक्रेत्यांकडून होताना दिसतात. त्यांच्याकडून होत असलेल्या या फसवणुकीत मात्र सर्वसामान्य जनतेच्या घरखर्चाच्या नियोजनाचा पुरता बोजवारा उडतो. विक्रेत्यांच्या या हेराफेरीमध्ये किलोभराची भाजी तीन पाव ग्राहकांना मिळत असल्याच्या तक्रारींत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.ग्राहकांच्या होणाऱ्या अशा फसवणुकीची दाद मागण्यासाठी कुठलीही यंत्रणा नाही. त्यामुळे ग्राहकांची मुस्कटदाबी होत आहे. सर्वात मोठी खंत अशी की, अशा धोकेबाज विक्रेत्यांना त्यांचे सहविक्रेतेदेखील अशाप्रसंगी सहयोग करतात. त्यामुळे ग्राहकांचादेखील नाईलाज होतो. आठवडी बाजारात हजारो ग्राहक बाजारातून भाजी व दैनंदिन लागणाऱ्या वस्तू खरेदी करतात. त्यामुळे याठिकाणी विक्रेत्यांची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात असते.शिवाय आठवडी बाजारापासून स्थानिक स्वराज्य संस्थेलादेखील मोठा फायदा होत असतो. परंतु, ग्राहकांच्या सुरक्षेसंदर्भात कुठलीही उपाययोजना याठिकाणी केली जात नाही. म्हणून बाजारातील विक्रेत्यांच्या मनमानीला सजग ग्राहकही बळी पडतो. ग्राहकांच्या या असुरक्षिततेला आणि फसवणुकीला जबाबदार कोण? असा प्रश्न यावेळी उपस्थित केला जात आहे. संबंधित प्रशासनाने याकडे गांभीर्याने बघणे गरजेचे असल्याचे मत सुजाण नागरिकांचे आहे.

### अनेकांकडे मान्यताप्राप्त वजनकाटेच नाहीत...

विक्रेता कोणताही असो त्यांच्याकडून वापरण्यात येणारे वजनकाटे हे दर दोन वर्षांनी प्रमाणित करणे बंधनकारक आहे. वजन काटा वापरत असताना तो संबंधित विभागाकडून मान्यताप्राप्त करून घ्यावा लागतो, असा नियम असूनही या नियमाला पायदळी तुडविले जात आहे. बाजारात सहज उपलब्ध होत असलेल्या बोगस वजनकाट्याची साधी चौकशीदेखील होताना दिसून येत नाही, अशा विक्रेत्यांवर कारवाई का होत नाही? असा सवाल नागरिकांनी विचारला आहे. आधुनिक काळात मान्यताप्राप्त इलेक्ट्रॉनिक काटे उपलब्ध असतानाही काही विक्रेते आजही तराजू वापरून त्यात वजन म्हणून दगडधोंड्याचा वापर करून ग्राहकांची फसवणूक करत असल्याचे चित्र आहे.



# राज्यकर्त्यांनी संविधानातील मूल्यावर आधारित मानवी कल्याणाचे कार्य करावे : डॉ. विठ्ठल दहिफळे



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१३ डिसेंबर -**
संविधानाची अंमलबजावणी करणारी राज्यसत्ता महत्त्वाची आहे. व्यक्ती, सृष्टी आणि समष्टी यांच्याशी एकरूप होऊन मूल्य व्यवस्था प्रस्थापित करण्याची गरज आहे. राज्यकर्त्यांनी संविधानातील मूल्यावर आधारित मानवी कल्याणाचे कार्य करावे असे उद्गार पीपल्स महाविद्यालय नांदेड येथील प्रा.डॉ. विठ्ठल दहिफळे यांनी काढले. ते येथील शिवाजी महाविद्यालयात भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्यशास्त्र विभागाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी भारतीय संविधानातील मूल्य आणि त्यांचा व्यवहार या विषयावर ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर हे होते. तर प्रमुख व्याख्याते पीपल्स महाविद्यालय नांदेड येथील राज्यशास्त्राचे प्रा.डॉ. विठ्ठल दहिफळे हे होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती संस्थेचे सचिव पी.टी. शिंदे, संस्थेचे संचालक पुंडलिकराव पाटील, माजी प्राचार्य विजयकुमार पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे, प्रबंधक बालाजी पाटील, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.व्ही.डी. गायकवाड यांची होती. पुढे बोलताना डॉ. दहिफळे म्हणाले की, भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करताना संविधानातील आदर्श मूल्याप्रमाणे राज्यकर्त्यांनी मानवी कल्याणाचे कार्य करावे. भारताचे संविधान सर्वश्रेष्ठ मूल्यावर आधारित आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय, धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता हे तत्व समाजात रुजणे आवश्यक आहे.

तरच सामाजिक न्यायाची संकल्पना अस्तित्वात येईल व समाजाचा सर्वांगीण विकास घडून येईल असे ते म्हणाले. तर अध्यक्षाच्या वतीने अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ.आर.एम. मांजरे म्हणाले की, भारताच्या संविधानाने मूलभूत हक्क, कर्तव्य आणि मार्गदर्शक तत्वे यातून समाजाला आधुनिक विकास करण्याची समान संधी दिलेली आहे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.व्ही.डी. गायकवाड यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ.एस.एम. कोनाळे यांनी तर डॉ. विष्णू पवार यांनी आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पत्रकार आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निलंगा तालूक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी नुकसान भरपाई पोटी मिळणार ५१ कोटी ६८ लाख

## आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या पाठपुराव्यास यश...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१३ डिसेंबर -**
निसर्गाच्या लहरीपणामुळे यावर्षी निलंगा तालुक्यासह लातूर जिल्हयात विविध ठिकाणी अतिवृष्टी झाली होती. यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन त्यांना आर्थिक फटका बसला होता, त्यामुळेच आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी निलंगा विधानसभा मतदार संघासह जिल्हयातील ज्या शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले त्यांना शासनाने मदत करावी अशी मागणी करुन त्यासाठी पाठपुरावा केला होता.

यापाठपुराव्यामुळे जिल्हयातील बाधीत शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाई प्राप्त झाली, मात्र निलंगा तालुक्यातील काही शेतकरी यापासुन वंचीत राहिले होते. याबाबत ही आ. निलंगेकर यांनी शासन दरबारी पाठपुरावा केल्याने त्यांना आता नुकसान भरपाई पोटी ५१ कोटी ६८ लाख रुपये मदत मिळणार आहे. लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर हे अनुदान जमा होणार आहे. लातूर जिल्हयात यावर्षी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली होती. तसेच काही भागामध्ये ढगफुटी सदृष्य पाऊस पडला होता. परिनामी अनेक भागामध्ये पुर परिस्थिती निर्माण झाली होती, त्याच बरोबर तेरणा व मांजरा नदी पात्रात धरण क्षेत्रातून सोडण्यात आलेल्या अतिरिक्त पाण्यामुळे शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही शेतकऱ्यांच्या जमीनी देखील खरडून गेल्या होत्या. या परिस्थितीने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला होता.



यामुळे या शेतकऱ्यांना शासनाकडून मदत व्हावी यासाठी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी शासनाकडे मागणी करुन यासाठी पाठपुरावा केला होता. आ. निलंगेकर यांच्या मागणीची दखल घेत शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहिर करुन त्यासाठी निधी हि उपलब्ध करुन दिला होता.

मात्र या मदती पासुन निलंगा तालुक्यातील शेतकरी वंचीत राहिले होते. निलंगा तालुक्यातील जवळपास ३८ हजार हेकटर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झालेले होते. या सर्व शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळावा यासाठी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी पुनश्च एकदा शासन दरबारी प्रयत्न केलेले होते. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळाले आहे. निलंगा तालुक्यातील त्या शेतकऱ्यांना आता शासनाची आर्थिक मदत प्राप्त होणार आहे. याकरीता शासनाकडून ५१ कोटी ६८ लाखाचा निधी प्राप्त झालेला असुन लवकरच हि रक्कम बाधीत शेतकऱ्यांना वितरीत करण्यात येणार आहे. सदर निधी प्राप्त झाल्या बद्दल आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्यासह शासनाचे शेतकऱ्यांच्या वतीने आभार मानुन समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# शेरु अब्दुल हन्नान पटेल यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१३ डिसेंबर -**
औसा शहरातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पिरसाब ऊर्फ शेरु अब्दुल हन्नान पटेल यांचे दि.१२ डिसेंबर गुरूवार रोजी रात्री निधन झाले. त्यांचे ६७ वर्षे वय होते.



शांतता कमिटीचे सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष होते. त्यांनी दोन वेळेस निवडणुक लढविली होती. माजी नगराध्यक्ष हन्नान पटेल यांचे पुत्र होते. शुक्रवार दि.१३ रोजी दुपारी ३ वाजता औसा येथील शफानगर कब्रस्तानात त्यांची दफनविधी करण्यात आला.

त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुलं, १ मुलगी, नातू असा परिवार आहे.

# सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



## सामूहिक त्रिशरण व पंचशील ग्रहण

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१३ डिसेंबर -**
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांची ११२ वी जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील भीम नगर, सिद्धार्थ नगर, बौद्ध नगर, इंदिरा नगर, गायकवाड कॉलनी, मधील व ग्रामीण भागातून आलेल्या आंबेडकरी अनुयायांच्या उपस्थितीत सर्वप्रथम भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार, पुष्प व मेणबत्ती प्रज्वलित करून सामूहिक अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक त्रिशरण पंचशीलाचे ग्रहण करून मान्यवरांचे मनोगत पर भाषणे झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुतळा समितीचे सचिव डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात भैयासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले माजी नगरसेवक शेषराव ससाने यांनी भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रमुख कार्य व त्यांचा जीवन प्रवास यावर सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ नेते गोपीनाथ जोंधळे यांनी समारोप केला. सूत्रसंचलन दयानंद वाघमारे यांनी केले तर रमेश लेंडेगावकर गुरूजी यांनी उपस्थित मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाचा समारोप केला.

या कार्यक्रमाला वाघमारे, रमेश कांबळे, भगवान ससाने, राहुल तलवार, रामनाथ पलमटे, डॉ. बालाजी थिटे, मनीष शिरसागर, बळीराम पिटाळे, भीमाशंकर कारवाडे, सिद्धू मासोळे, वैजनाथ सूर्यवंशी, बाबासाहेब कांबळे, बालाजी दुगाने, अक्षय गायकवाड, अजिंक्य गायकवाड, राम बनसोडे, वैभव घोबाळे, युनूस शेख, सुरज वाघमारे, रोहन वाघमारे, विष्णू पोले, प्रमोद कासले आदी जणांची उपस्थिती होती.

# श्यामार्य कन्या विद्यालयात फॅशन शो उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१३ डिसेंबर -**
श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था संचलित श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमी प्रस्तुत श्याम कला पंधरवडा अंतर्गत श्यामलाल प्राथमिक विद्यालय आणि श्यामार्य कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी फॅशन शोचे आयोजन करण्यात आलेले होते.



या फॅशन शोचे अध्यक्ष श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य होते. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेले हॉटमोंड मिसेस इंडिया वर्ल्ड वाईड २०१९ वर्षातील फायनलिस्ट असलेले मिसेस अश्विनी सुडे भंडारे कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उपस्थित होते.

संस्थेच्या सहसचिव अंजुमनी आर्य चटनाळे व रमाकांत चटनाळे, श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमीचे संयोजक सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी चव्हाण, श्यामार्य कन्या विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक प्रवीण भोळे, श्यामलाल माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक भरत खंदारे, श्यामलाल प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक उगिले, पर्यवेक्षक राहुल लिमये, श्यामार्य कन्या विद्यालयाचे प्रभारी पर्यवेक्षक विजय बैले आदी मान्यवर उपस्थित होते.

श्यामलाल प्राथमिक विद्यालय आणि श्यामार्य कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेला होता.

कार्यक्रमाप्रसंगी खूप मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयकुमार बैले, माधव कांबळे आणि अंतेश्वर बिरादार यांनी केले.

कार्यक्रमाचे आभार श्यामार्य कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण भोळे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजयकुमार बैले, सलाउद्दीन शेख, बालाजी चव्हाण, विक्रम मलकापूर, उदगीरकर, गीते, रणमल्ले, सूर्यवंशी, सोळुंके, राहुल गुरमे, सचिन तिवारी, प्रेमा होंना, स्वाती मोरतळे, गोपाळ रेड्डी, दिलीप वाघमारे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# फोटोची विटंबना केल्याबद्दल विधायक कृती समितीचे तहसीलदारांना निवेदन




**तभा वृत्तसेवा**
**शि.अनंतपाळ, दि.१३ डिसेंबर-**
मंगळवार मध्यरात्री परभणी येथील चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या प्राकृतीक फोटोची विटंबना केल्याबद्दल तालुका विधायक कृती समिती शिरुर अनंतपाळ या सामाजिक संघटनेच्या वतीने या निंदनीय कृत्याबद्दल व अशोभनीय कृतीच्या विरोधात वरील संघटाना अन्य सामाजिक संघटाना, आंबेडकरी अणूयायी कार्याकत्यांच्या वतीने लेखी निवेदन शिरूर आनंतपाळ येथील तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

ज्या अज्ञात इसमाकडुन परभणी येथील चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा असलेला संविधानाच्या प्राकृतीक फोटेची विटंबना केली, ज्या इसमाकडुन हा प्रकार घडला, त्या अज्ञात व्यक्तीला व त्यांच्या पाठीमागे अज्ञात शक्ती आहे. त्यांची उच्छास्तरीय चौकशी करुन यांच्यावर कठोर कार्यावाही करण्यात यावी. अशा प्रकारचे निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी शिरूर आनंतपाळ तालुका विधायक कृती समितीचे संस्थापक व कार्याध्यक्ष असलेले उत्तम कदम व संघटनेचे सदस्य राजीव दिवेकर, सोनवणे यांच्यासह आदि उपस्थित होते.

## आलमलातील बचतगटाच्या हनीची चव देशविदेशातील प्रवाशी चाखणार...

# जिल्ह्यातील तीन बचत गटात औसा तालुक्याचा समावेश; नागपुरच्या विमानतळावर होणार विक्री

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१३ डिसेंबर -**
उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यात ग्रामीण भागात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अंतर्गत बचतगटाच्या माध्यमातून विविध प्रकारचे उत्पादने तयार केली जात आहेत. यापैकी तीन बचतगटांच्या उत्पादनांची विक्री 'लातूर हिरकणी' या नावाने विमानतळावरील स्टॉलमधून होणार आहे. देश-विदेशातील प्रवाशी औसा तालुक्यातील आलमला येथील उत्कर्ष महिला बचत गटाच्या गोड 'हनी' ची चव चाखणार असून गेल्या तीन वर्षापासून ११ महिलांनी केलेल्या कष्टाला आज फळ आले आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण भागातील महिला बचतगटांच्या उत्पादनांना विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळावी, यासाठी राज्य शासनाच्या माध्यमांतून वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. याच उपक्रमांचा भाग म्हणून राज्यातील उमेद अभियानातील निवडक बचतगटांच्या उत्कृष्ट उत्पादनांचे स्टॉल विमानतळावर प्रायोगिक तत्वावर लावण्याबाबत राज्य स्तरावरून उमेद अभियान व भारतीय विमान वाहतूक प्राधिकरण यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील पारंपारिक गोधडी, मध तसेच लाकडी खेळणी तयार करणाऱ्या बचतगटांच्या उत्पादनांची नागपूर विमानतळावर स्टॉलद्वारे विक्रीसाठी निवड करण्यात आली आहे.




लातूर जिल्ह्यातील उमेद बचतगटातील महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांनी खुल्या बाजारपेठेत स्पर्धा करावी, यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये पॅकेजिंग, ब्रॅण्डिंगचे प्रशिक्षण, हिरकणी हाट प्रदर्शने आयोजित करण्यात येत आहेत. यासाठी बचतगटाच्या महिलांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येत आहे.

नागपूर विमानतळावरील स्टॉलमधून बचत गटांच्या वस्तूची विक्री व्हावी. यासाठी निलंगा तालुक्यातील अन्सरवाडा येथील रूमा महिला बचतगटाचे उत्पादन असलेली पारंपारिक गोधडी, योगा गोधडी मॅट, औसा तालुक्यातील आलमला येथील उत्कर्ष महिला बचतगटाचे उत्पादन असलेले निम हनी, जांभळ हनी, फॉरेस्ट हनी यासारखे विविध प्रकारचे मध आणि अहमदपूर तालुक्यातील उमरगा यल्लादेवी येथील संत ज्ञानेश्वरी महिला बचतगटाचे उत्पादन असलेली खेळण्यातील लाकडी बैलगाडी या उत्पादनांची निवड करण्यात आली आहे.

या निवड झालेल्या महिला बचत गटातील महिलांचे लातूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर यांनी अभिनंदन केले आहे. जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे, जिल्हा विपणन व्यवस्थापक वैभव गुराले यांनी निवड झालेल्या बचत गटांना सविस्तर मार्गदर्शन केले होते.

### तीन वर्षात गगनभरारी...

गेल्या तीन वर्षापुर्वी स्थापन केलेल्या उत्कर्ष महिला बचत गटाच्या माध्यमातून (हनी) मध निर्मिती सुरु केली. लातूर, पुणे, मुंबई येथील मार्केट व शासनाच्या उमेद अभियानअंतर्गत विक्री करण्यात येते. तसेच नीम,जांभळ, अशा अनेक प्रकारच्या मधाची निर्मिती करण्यात येते. याचबरोबर मधाचा अत्यंत उत्कृष्ट दर्जा कायम ठेवल्यामुळे शासनाकडून संधी मिळाली असून उलाढाल वाढण्यास मदत होणार असल्याचे मत अध्यक्षा आरती बसवेश्वर धाराशिवेव सचिव नम्रता गोकुळ वाडकर यांनी दै. 'तरुण भारत'च्या वार्ताहरांशी बोलताना सांगितले.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कराटे स्पर्धेत श्रेयश मानेला दोन सुवर्ण पदक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-** मुंबईच्या मुलुंड येथील प्रियदर्शनी स्टेडियमवर पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय कॉम्बैट कराटे स्पोर्टस् फेस्टिव्हल २०२४ स्पर्धेत प्रकाश नगरातील सरस्वती प्राथमिक शाळेचा इयत्ता चौथीचा विद्यार्थी श्रेयश परमेश्वर माने याने दोन सुवर्ण पदकांची कमाई केली. या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत मॉरिशेस, बेल्जियम, मलेशिया, नेपाळ, भूतान, श्रीलंका आदी देशांचे स्पर्धक सहभागी झाले होते. एवढ्या स्पर्धकांतून श्रेयश परमेश्वर माने याने दोन सुवर्ण पदके पटकावली.

त्याचबरोबर तनिष्का हंचाटे दोन सुवर्ण पदक, उझैर शेख दोन सुवर्ण पदक आणि ग्रँड चॅम्पियन ट्रॉफी, मनिषा भूमकर, रिझवान इनामदार, अथर्व सुरवसे, सार्थक वाघमारे, कृष्णा सुरवसे, रिदम मेटे, महेश पंचाक्षरी, अनुष्का समशेटे, ओंकार भोसले, श्रावण शेंडगे, विक्रांत गुंड, साई कोरे, सोमेश कातपुरे, सत्यम स्वामी, चौधरी या विद्यार्थ्यांनीही सुवर्ण, रौप्य, कास्य पदके पटकावली. या विजेत्या विद्यार्थ्यांना गणेश काकडे यांचे प्रशिक्षण तर मनिषा भूमकर, रोहित लव्हाळे यांचे मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल कौतुक होत आहे.






### संक्षिप्त वृत्त...

## मनपा शाळातील ९६५ विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-**
लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत असणाऱ्या १६ शाळातील ९६५ विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस देण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी दिले होते. त्यानुसार सदरील स्पोर्ट ड्रेस चे वाटप उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते करण्यात आले.मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना इतर शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे सुविधा मिळाव्या असा पालिकेचा प्रयत्न आहे. त्या अनुषंगाने हे स्पोर्ट ड्रेस वाटप करण्यात आले.यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.यावेळी सहाय्यक आयुक्त निर्मला माने,शिक्षणाधिकारी साहेबराव जाधव, भांडारपाल बालाजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## उंबडगा येथे १६ डिसेंबर रोजी कुक्कुट पालन, शेळीपालन प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-** शेतकरी, पशुपालक, सुशिक्षित युवा, महिला बचतगट व पशुसंवर्धन विषयक व्यवसाय करणाऱ्यांसाठी मुरुड कुक्कुट प्रशिक्षण केंद्र आणि उंबडगा ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने उंबडगा येथे १६ डिसेंबर २०२४ रोजी कुक्कुट पालन, शेळीपालन याबाबत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचा उपयोग शेतीसोबत जोडधंदा व सुशिक्षित लोकांना आपला व्यवसाय सुरु करण्यासाठी होणार आहे. विविध महामंडळातील पशुसंवर्धन विषयक योजना, बँकेतील कर्ज प्रकरणे व केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हा परिषद यांच्या विविध योजनेसाठी प्रशिक्षण घेणाऱ्यास इच्छूकांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्यानी मुरुड येथील कुक्कूट प्रशिक्षण केंद्राचे पशुधन विकास अधिकारी डॉ. योगेशसिंह बायस, पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी विस्तार अथवा नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मुरुड येथील कुक्कूट प्रशिक्षण केंद्राचे पशुधन विकास अधिकारी डॉ. योगेशसिंह बायस व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले आहे.

## मुक्तांगणमध्ये चिमुकल्यांनी साजरी केली गोपीनाथ मुंडे यांची जयंती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-** लातूरच्या विशालनगर भागातील साई मंदिर परिसरातील, मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांची जयंती चिमुकल्यांनी साजरी केली. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख, यांच्या हस्ते लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी शाळेच्या सर्व विद्यार्थी व शिक्षिका यांनी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेच्या शिक्षिका प्रणिता कांबळे यांनी केले, या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

## ग्रामीण शब्दकोश निर्मिती मंडळावर विवेक सौताडेकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-**
छत्रपती संभाजीनगरातील मराठवाडा साहित्य परिषदेच्या नूतन केंद्रीय कार्यकारिणीची निवडणूक नुकतीच झाली. कार्यकारिणीच्या बैठकीत ग्रामीण शब्दकोश समितीचे सदस्य म्हणून मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूरचे सदस्य, साहित्यिक विवेक सौताडेकर यांची निवड झाली आहे. बैठकीत मराठवाडा प्रदेश मराठी - भाषेचे उगमस्थान असून, या प्रदेशातील मराठी भाषा ही मूळ व मध्यवर्ती आहे. परंतु, ग्रामीण बोली भाषेतील हे जुने अनेक शब्द काळानुरूप लोप पावत आहेत. त्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी ग्रामीण बोलीतील शब्दांचा आजच्या अर्थासहित एक शब्दकोश तयार करावा, असा मानस व्यक्त करण्यात आला. त्यासाठी मराठवाड्यातील तज्ज्ञांना घेऊन मराठवाडास्तरीय ग्रामीण शब्दकोश समितीची निर्मिती करण्यात आली. या समितीच्या सदस्यपदी मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूरचे सदस्य व साहित्यिक विवेक सौताडेकर यांची परिषदेचे कौतिकराव ठाले पाटील, रामचंद्र तिरुके, डॉ. आसाराम लोमटे, डॉ. रामचंद्र काळुंखे, डॉ. दादा गोरे, आदींनी निवड केली.

# परभणी घटनेतील गुन्हेगारावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

### जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांना दिले मागण्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-**
परभणी येथे एका समाजकंटकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान प्रतिमेची केलेली विटंबना ही अत्यंत निंदनीय घटना आहे. या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. यासंदर्भात लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाने येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची भेट घेऊन या घटनेमागे जे कोणी सुत्रधार असतील त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन त्यांची सखोल चौकशी करुन कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन दिले.

परभणी येथे घडलेल्या या अमानवी कृत्यामागे जे कोणी सुत्रधार असतील त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांची सखोल चौकशी करुन कठोर कार्यवाही करण्यात यावी. या घटनेमुळे समाजात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासन कठोर पावले उचलणार असल्याची ग्वाही द्यावी.

समाजातील सामाजीक सलोखा, शांतता बिघडवणाऱ्या अशा घटना घडू नयेत, महापुरुष आणि लोकशाहीच्या प्रतिकांचादेखील अपमान व्हायला नको, याकरीता काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सरकारचे लक्ष वेधण्यात यावे, अशा सुचना राज्याचे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी काँग्रेस पक्षाच्या पदाधिका-यांना दिल्या होत्या. या अनुषंगाने लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी यांची गुरुवारी भेट घेऊन निवेदन दिले.

यावेळी लातूर शहर काँग्रेसचे माजी नगरसेवक व निराधार विभागाचेअध्यक्ष असिफ बागवान, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, प्रदेश पदाधिकारी संजय ओव्हाळ, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाने प्रा. प्रवीण कांबळे, प्रभाग अध्यक्ष ॲड. विजय गायकवाड, सिराज शेख, राजू गवळी, फारुख शेख, बिभीषन सांगवीकर, पिराजी साठे, ॲड. गणेश कांबळे, कुणाल शृंगारे, असलम चाऊस, नितीन कांबळे, काशिनाथ वाघमारे, अशोक सूर्यवंशी, अक्षय मुरुळे, दयानंद कांबळे, मंगेश वैरागे, किरण बनसोडे, अजित सूर्यवंशी, संजय देडे, मारुती चव्हाण, आनंद बनसोडे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.



# 'कृषि'चे शास्त्रज्ञ थेट शेतकऱ्यांच्या बांधावर




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-**
जो अहोरात्र जगाचे पोट भरण्यासाठी राबतो, मेहनत करतो त्या बळीराजासोबत हितगुज करून त्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेवून त्या सोडविण्यासाठी कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर तालुक्यातील बोरवटी व महापूर येथे माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूरचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, देशी गोवंश पालनातून पशुपालकांनी आत्मनिर्भर व्हावे. राज्यमाता गोमाता संवर्धन शेतकरी व पशुपालकांसाठी वरदान होय. पशुंसाठी मुक्तसंचार गोठा पद्धत ही फायदेशीर असून त्यांचे वेळोवेळी लसीकरण करून घ्यावे. सध्या हवामान बदलामुळे चारा व पाणीटंचाईची समस्या जाणवत असून, कमी तापमानामुळे दुध उत्पादनात २० ते २५ टक्के घट होवून त्याचा दुधाच्या गुणवत्तेवर सुद्धा परिणाम होतो म्हणून पशुपालकांनी हवामान बदलानुसार पीकपद्धतीचा व पशु संगोपनाचा अवलंब करावा असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ. विजय भामरे म्हणाले की, तुर व हरबरा पिकावरील महत्वाच्या किडी उदा. शेंगा पोखरणारी आळी, पिसारी माशी, घाटे आळी इत्यादीबद्दल माहिती व एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे उपाय सांगून त्याबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली.

डॉ. अच्युत भरोसे यांनी जैव तंत्रज्ञान काळाची गरज या विषयाबाबत मार्गदर्शन केले. या चर्चासत्र कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. ज्ञानेश्वर सुरडकर यांनी केले. यावेळी विशाल भांदर्गे, विष्णू माने, भरत नरवाडे, संजय रणखांब, शालुबाई रणखांब, विजयकुमार रणखांब, सर्जेराव शिंदे, सिद्राम चव्हाण, भरत जाधव आदी उपस्थित होते.

## डॉ. प्रमोद घुगे यांच्यावर खूनाचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-**
शहरातील वादग्रस्त असलेले डॉ. प्रमोद घुगे व त्याच्या नातेवाईकांनी एकाचा खून केल्या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून डॉक्टर व त्याचा नातेवाईक फरार झाला आहे. या प्रकरणी अद्याप कोणालाच अटक करण्यात आलेली नाही.

डॉ. घुगे यांचे लातुरात आयकॉन हॉस्पीटल असून यापुर्वी एका मजूराचे अपहरण करून त्याला डांबून मारहाण केल्याचा आरोप डॉक्टरवर आहे. शहरातील इंडीयानगर भागात राहणारा बाळू भारत डोंगरे हा घुगे यांच्या रूग्णालयात सुपरवायझर म्हणून काम करत होता. त्याने आपल्या पगाराचे पैसे घुगे यांना मागीतल्यानंतर रात्री त्यांनी व त्याचा नातेवाईक अनेकेत मुंडे यांनी बाळूला एका खोलीत डांबून मिळेल त्या साहित्याने मारहाण केली. दरम्यान घुगे यांनी स्वताःच उपचार केले दरम्यान बाळूचा नंतर मृत्यू झाला. यामुळे मयताच्या नातेवाईकांनी बाळूचा खून झाल्याची शक्यता वर्तविली. शुक्रवारी सकाळी डॉ. घुगे यांना अटक केल्या शिवाय प्रेत ताब्यात घेणार नाही असा पवित्रा घेतला. घटनेचे गांभीर्य ओळखून शिवाजी नगर पोलीसांनी डॉ. प्रमोद घुगे व अनिकेत मुंडे या दोघांवर खूना गुन्हा दाखल केला.

## मी कुमार : सामाजिक निती-मूल्यांचा संघर्ष नाट्य रसिकांना भावला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-**
महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेची प्राथमिक फेरी लातूरच्या मार्केट यार्डातील स्व. दगडोजीराव देशमुख स्मृती सभागृहात आहे. कलोपासक मंडळ लातूरच्या वतीने मराठी अनुवाद विजय तेंडूलकर यांचे व श्रुतिकांत ठाकुर दिग्दर्शित मी कुमार या तीनअंकी नाटकाचा प्रयोग झाला. नैसर्गीक मानवी परस्पर आसक्त प्रवृत्ती, सामाजिक नीती मुल्य यातील संघर्ष या नाटकात अधोरेखित होतात.

गुजराती नाटककार मधु राय लिखीत 'कुमारनी आगाशी' या सुप्रसिद्ध नाटकाचे मराठी नाटककार विजय तेंडूलकर यांनी मराठीत अनुवाद केलेले मी कुमार हे नाटक. हे नाटक एक उच्चभ्रू समाजात घडणा-या घटनेवर आधारित मानवी नाते संबंधांवर प्रकाश टाकणारं. एका परदेशी जाणा-या व्यक्तीला मित्र परिवारातर्फे पार्टी दिली जाते. त्या फेरवेल पार्टीत हे नाटक उलगडत जातं. अगदी हलक्या फुलक्या संवादांतून उलगडत जाणारं हे नाटक गंभीर विषयावर भाष्य करत जातं. महाविद्यालयीन विद्यार्थी कुमारच्या आत्महत्येला खून समजणारा त्याचा भाऊ हर्षद परदेशी जाऊ पाहणा-या बिपीनला कुमारच्या मिलाचाच त्याचा खुनी समजतो व विषय वरचेवर गंभीर होत जाते.

स्त्रीपुरुष संबंधांची तरलता व सामाजिमक भीषण विदारकता या नाटकात दिसून येते. बिपीनलाच कुमारच्या आत्महत्येचं कारण माहित असतं. नीशा कुमारची वहिनी. हिच्याशी कुमारचे प्रेम संबंध जुळतात. या संबंधातून गुंतागुंत वाढत जाते व आत्महत्या की खून यावर प्रकाश पडत जातो. वैयक्तीक स्त्री पुरुष संवेदना, अहंकार सामाजिक नीती मुल्ये त्यांवर भाष्य करुन जाणारं हे नाटक. शेवटी कुमारच्या मृत्यूलासुद्धा मनोरंजनाच्या पातळीवर नेऊन ठेवतो. आत्महत्येसारख्या गंभीर घटनेलाही आपण विरंगुळ्याच्या गप्पा गोष्टीपेक्ष महत्वाचे समजत नाही. ही संवेदनहिनता या नाटकात अधोरेखित होते. हर्षद (दस्तगीर शेख), निशा (श्रेया कुलकर्णी), अमर (महेश दास्ताने), कुमार (आशुतोष खरवळे), बिपीन (अश्विन देसाई) आदिंनी भूमीका बजावल्या.

## लातूर परिमंडळात २० हजार सौर कृषी पंपांची जोडणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-**
केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर वीजनिर्मिती पॅनेल्स व कृषी पंप असा संपूर्ण संच शेतकऱ्यांना देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. या अंतर्गत लातूर परिमंडळात १९ हजार ९५७ सौर कृषी पंपांची जोडणी करण्यात आली आहे.

लातूर परिमंडळातील बीड जिल्ह्यात महाऊर्जाकडून महावितरणकडे वर्ग करण्यात आलेले व नवीन अर्ज असे एकूण १ लाख ३२ हजार ३१४ अर्ज प्राप्त झाले असून यापैकी १५ हजार ३९१ शेतकऱ्यांनी लाभार्थी शुल्क भरलेले आहे. १४ हजार ७०५ सौर कृषी पंप बसवण्यात आले आहेत. लातूर जिल्ह्यात महाऊर्जाकडून महावितरणकडे वर्ग करण्यात आलेले व नवीन अर्ज असे एकूण १७ हजार ९६५ अर्ज प्राप्त झाले असून यापैकी ३ हजार ४०३ शेतकऱ्यांनी लाभार्थी शुल्क भरलेले आहे. १ हजार ९१० सौर कृषी पंप बसवण्यात आले आहेत. तर धाराशिव जिल्ह्यातील महाऊर्जाकडून महावितरणकडे वर्ग करण्यात आलेले व नवीन अर्ज असे एकूण ५१ हजार ६२६ अर्ज प्राप्त झाले असून यापैकी ७ हजार ७२६ शेतकऱ्यांनी लाभार्थी शुल्क भरलेले आहे तर ३ हजार ३४२ सौर कृषी पंप बसवण्यात आले आहेत.

या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषी पंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीज पुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

# 'मांजरा'चा २७०० रुपये भाव देण्याचा निर्णय कौतुकास्पद

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे देशमुखांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-**
मराठवाड्यात दर तीन वर्षांतून एकदा तरी पावसाच्या लहरीपणामुळे कधी दुष्काळ, कधी उसाची अडचण तर कधी अतिरिक्त ऊस असतो. अशा बिकट संकटातून जाताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला धावून येणारे, मराठवाडा व विदर्भात सर्वाधिक शेतकऱ्यांना अधिक भाव देणारे मांजरा साखर परिवारातील कारखाने राज्याला परिचित आहेत. या परिवाराचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख यांनी यावर्षी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिला हप्ता २ हजार ७०० रुपये देण्याची घोषणा करून तातडीने खात्यांवर जमा केले. याबद्दल गुरुवारी क्रांतिकारी शेतकरी संघटनेकडून मांजरा परिवाराचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे सत्तार पटेल, राजेंद्र मोरे, अरुण कुलकर्णी, राजकुमार कसबे, नवनाथ शिंदे, दत्ता किनकर, प्रज्योत हुडे, अशोक दहिफळे, अमर हैबतपुरे यांच्यासह जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, मारुती महाराज साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष गणपत बाजुळगे, इंदिरा सूतगिरणीचे चेअरमन बाळासाहेब कदम, जिल्हा बँकेचे संचालक राजकुमार पाटील, माध्यम समन्वयक हरिराम कुलकर्णी, जिल्हा बँकेचे माजी संचालक संभाजी सूळ, दयानंद बिडवे आदी उपस्थित होते.

मराठवाड्यात दरवर्षी सर्वाधिक भाव देण्याचा विक्रम मांजरा साखर परिवाराचा असून चळवळ टिकवली पाहिजे, कारखाना, शेतकरी बांधव, ऊसतोड वाहतूकदार या सर्वांत समतोल राखण्याचे कसब दिलीपराव देशमुख यांच्यात आहे. यामुळे हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा फायदा होणार असल्याचे यावेळी शेतकरी संघटनेचे नेते सत्तार पटेल, राजेंद्र मोरे, अरुण कुलकर्णी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## भाजपा कार्यालयात स्व. मुंडे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ डिसेंबर-**
देशाचे ग्रामविकास माजीमंत्री, महाराष्ट्राचे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांची जयंती लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्यासह अनेकांनी स्व. मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी शेतकरी शेतमजूर दिन दलिताच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे केंद्रीय ग्रामविकास माजीमंत्री, महाराष्ट्राचे लोकनेते आणि तत्कालीन रेणापूर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रतिनिधी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीचा कार्यक्रम लातूर येथील आ. कराड यांच्या संवाद कार्यालयात संपन्न झाला. यावेळी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते आणि स्वर्गीय मुंडे साहेबावर प्रेम करणाऱ्या नागरिकांनी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष दशरथ सरवदे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, संगायो समितीचे वसंत करमुडे, वैभव सापसोड, शिवसिंह सिसोदिया यांच्यासह पद्माकर चिंचोलकर, सुनील होनराव, हनुमंतबापू नागटिळक, सतीश आंबेकर, ज्ञानोबा भिसे, सुकेश भंडारे, डॉ बाबासाहेब घुले, सुरज शिंदे, विष्णुदास शिंदे, प्रताप पाटील, भैरवनाथ पिसाळ, आदिनाथ मुळे, विजय मलवाडे, अशोक सावंत, मनोज कराड, पुंडलिक बेंबडे, चंद्रकांत वांगस्कर, विजय गंभीरे, अमर चव्हाण, लक्ष्मण यादव, विनायक मगर, फुलचंद अंधारे, श्रीकृष्ण जाधव आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

